॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ सार्थ श्रीदासबोध ॥

॥ विवेकवैराग्यनाम दशक बारावा ॥ १२ ॥

॥ श्रीरामसमर्थ ॥ आधीं प्रपंच करावा नेटका । मग घ्यावें परमार्थविवेका । येथें आळस करूं नका । विवेकीहो ॥ १ ॥ प्रपंच सांडून परमार्थ कराल । तेणें तुम्ही कष्टी व्हाल । प्रपंच परमार्थ चालवाल । तरी तुम्ही विवेकी ॥ २ ॥ प्रपंच सांडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खायाला । मग तया करंट्याला । परमार्थ कैंचा ॥ ३ ॥ परमार्थ सांडून प्रपंच करिसी । तरी तूं यमयातना भोगिसी । अंतीं परम कष्टी होसी । यमयातना भोगितां ॥ ४ ॥ साहेबकामास नाहीं गेला । गृहींच सुखावून बैसला । तरी साहेब कुटिती तयाला । पाहाती लोक ॥ ५ ॥ तेव्हां महत्वचि गेलें । दुर्जनाचें हासें जालें । दुःख उदंड भोगिलें । आपुल्या जीवें ॥ ६ ॥ तैसेंचि होणार अंतीं । म्हणोन भजावें भगवंतीं । परमार्थाची प्रचीती । रोकडी घ्यावी ॥ ७ ॥ संसारीं असतांच मुक्त । तोचि जाणावा संयुक्त । अखंड पाहे युक्तायुक्त । विचारणाहे ॥ ८ ॥ प्रपंचीं जो सावधान । तोचि परमार्थ करील जाण । प्रपंचीं जो अप्रमाण । तो परमार्थीं खोटा ॥ ९ ॥ म्हणोनी सावधानपणें । प्रपंच परमार्थ साधणें । ऐसें न करितां भोगणें । नाना दुःखें ॥ १० ॥

आधीं प्रपंच नेटका (धड, शिस्तीचा) करावा आणि मग परमार्थ, विवेक स्वस्थ चित्तानें पहावा. विवेकी स्त्रीपुरुष हो ! यांत हयगय करूं नका. प्रपंचाकडे दुर्लक्ष्य करून परमार्थ करूं म्हणाल तर कष्ट पावाल; प्रपंच व परमार्थ दोन्ही चालवाल तरच तुम्ही विवेकी खरे. प्रपंचाकडे दुर्लक्ष करून परमार्थ कराल तर खायला अन्न मिळणार नाहीं, आणि मग असल्या विक्षिप्तचित्त करंट्यांचें परमार्थाकडे लक्ष तरी कसें लागावें ? उलटपक्षीं परमार्थाची हेळसांड करून प्रपंचांतच डोकें खुपसून राहाल, तर अंतीं यमयातनेचे परमकष्ट भोगावे लागतील (१–४). आपल्या मालकाच्या, वरिष्ठाच्या (साहेब) कामास गेला नाहीं, सुखानें सुस्तावून घरींच पडला तर साहेब (धनी) चांगला चोप देतो हें प्रत्यक्ष आहे ; यामुळें धन्यापाशीं पत जाते, दुर्जनांकडून झालेल्या कुचाळ्या ऐकून घ्याव्या लागतात, व स्वतः फार दुःख सोसावें लागतें ; तसेंच सर्वांचा खरा साहेब जो परमेश्वर त्याचा संतोष जोडला नाहीं तर संसाराचा फजिता होऊन यमदूतांकडून मार खावा लागतो म्हणून परमेश्वराला भजावें व परमार्थाचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा संसारांत असून (पद्मपत्रमिवांभसा) जो मुक्त आहे तोच योगी जाणावा, कां कीं निरंतर आत्मानुसंधान तोच ठेवूं शकतो म्हणून निजात्मतत्वीं सावध असेल तोच परमार्थ करील (व त्याचा संसार नेटका होतो). याप्रमाणें ज्याचा प्रपंच नेटका त्याचा परमार्थही नेटका व ज्याचा प्रपंच धड नाहीं त्याचा परमार्थही खोटा. म्हणून स्वरूपीं सावध राहून (संसाराचें खरें रूप जाणून) प्रपंच व परमार्थ त्यांनीं सावधपणें साधावे;

पर्णाळी पाहोन उचले । जीवसृष्टि विवेकें चाले । आणि पुरुष होऊन भ्रमले । यासी काय म्हणावें ॥ ११ ॥ म्हणोन असावी दीर्घ सूचना । अखंड करावी चाळणा । पुढील होणार अनुमाना । आणून सोडावें ॥ १२ ॥ सुखी असतो खबर्दार । दुःखी होतो बेखबर । ऐसा हा लोकिक विचार । दिसतचि आहे ॥ १३ ॥ म्हणोन सर्वसावधान । धन्य तयाचें महिमान । जनीं राखे समाधान । तोचि येक ॥ १४ ॥ चाळणेचा आळस केला । तरी अवचिता पडेल घाला । ते वेळे सावरायाला । अवकाश कैंचा ॥ १५ ॥ म्हणोन दीर्घसूचनेचे लोक । त्यांचा पाहावा विवेक । लोकांकरितांचि लोक । शाहाणे होती ॥ १६ ॥ परी ते शाहाणे वोळखावे । गुणवंतांचे गुण घ्यावे । अवगुण देखोन सांडावे । जनामध्यें ॥ १७ ॥ मनुष्य पारखूं राहेना । आणि कोणाचें मन तोडीना । मनुष्यमात्र अनुमाना । जाणून पाहे ॥ १८ ॥ दिसे सकळांसी सारिखा । पाहातां विवेकी नेटका । कामी निकामी लोकां । बरें जाणें ॥ १९ ॥ जाणोन पाहिजेत सर्व । हेंचि तयाचें अपूर्व । ज्याचें त्यापरी गौरव । राखों जाणे ॥ २० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विमळलक्षणनाम समास प्रथम ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥ ऐका संसारासी आले हो । स्त्रीपुरुष निस्पृह हो । सुचितपणें पाहो । अर्थांतर ॥ १ ॥ काय म्हणते वासना । काय कल्पिते कल्पना ।

असें न केल्यास नाना दुःखें भोगावीं लागतात (५–१०). पानावरील यःकश्चित् आळी (पर्णाळी, तृणजलूका) पुढील पायांनीं चांचपून पाहून सुरक्षित जागा आहे असें पाहून मग मागील पाय पुढें चालण्यासाठीं उचलते, याप्रमाणें सामान्य जीवजंतु सुद्धां मागचा पुढचा विचार करून वागतात; आणि शहाणेसुतें लोकभ्रमांत राहून संसार करितात (आणि संसार नेटका झाला असें मानतात) याला काय म्हणावें ? म्हणून दीर्घसूचना (दूरदर्शीपणा) असली पाहिजे, ती पाहिजे तर अखंड चाळणा (सार कोणतें असार कोणतें याचा विचार) ठेवली पाहिजे म्हणजे पुढें होणाऱ्या गोष्टी जाणून सिद्धांत बमला पाहिजे. जो सावध (खबरदार) तो सुखी असतो व गैरसावध मनुष्य दुःखी होतो· हें तर व्यवहारांतही दिसतें. म्हणून प्रपंच व परमार्थ दोन्ही सावधपणानें करितो तोच धन्य होय, आत्महित साधून जनांचें समाधान त्यालाच राखतां येतें. चाळणेचा आळस केला म्हणजे सारासार विचारानें असाराचा त्याग व सारभूत ब्रह्मवस्तूंचा अंगिकार केला नाहीं तर मृत्युसारखा महाप्रसंग पडला असतां सावरावयाला कोण येईल ? म्हणून दूरदर्शी लोकांचा विवेक पहावा. परमार्थी मन ठेवून ते प्रपंच कसा करितात हें पाहावें म्हणजे 'एकाचें पाहून एक शहाणा' या न्यायानें तसेंच वागतां येतें (११–१६). असो. शहाणे लोक ओळखावे (परमार्थी सावध राहून प्रपंचही दक्षतेनें करणारे), पहावेत, त्यांचे गुण घेऊन त्यांना अनुसरावें, सामान्यजनांत दोष असतील त्यांकडे लक्ष देऊं नये. मनुष्यमात्राला शहाणा बिनचूक यथार्थ जाणतो पण कोणाचेंही मन तोडीत नाहीं. तो सर्वांना सारखा दिसतो पण त्याचा विवेक पहाल तर तो चोख असतो. कामी (उद्योगी, कामाला लावण्यासारखा) कोण, निकामी (आळशी, रिकामटेकडा) कोण हें तो जाणून दोघांचें हितच करीत असतो, अशा दूरदर्शी शाहण्यांप्रमाणें ज्याला सर्वसावध राहतां येतें त्याचाच प्रपंच नेटका होतो (१७–२०). [द. १२, स० १].

जन्म घेऊन संसाराला आलेल्या स्त्रीपुरुष (संसारी) व निस्पृह (विरक्त) जनहो ! मी सांगतों तें ऐका व अर्थाचें मनन करून पहा. वासनेचे, कल्पनेचे अनंत रंग चित्तावर उठत असतात. खाणें, पिणें, नेसणें, लेणें, या सर्व गोष्टी अगदीं

अंतरींचे तरंग नाना । प्रकारें उठती ॥ २ ॥ बरें खावें बरें जेवावें । बरें ल्यावें बरें नेसावें । मनासारिखें असावें । सकळ कांहीं ॥ ३ ॥ ऐसें आहे मनोगत । तरी तें कांहींच न होत । बरें करितां अकस्मात । वाईट होतें ॥ ४ ॥ येक सुखी येक दुःखी । प्रत्यक्ष वर्ततें लौकिकीं । कष्टी होऊनियां सेखीं । प्रारब्धावरी घालिती ॥ ५ ॥ अचुक यत्न करवेना । म्हणोन केलें तें सजेना । आपला अवगुण जाणवेना । कांहीं केल्या ॥ ६ ॥ जो आपला आपण नेणे । तो दुसऱ्याचें काय जाणे । न्याय सोडितां दैन्यवाणे । होती लोक ॥ ७ ॥ लोकांचें मनोगत कळेना । लोकांसारिखें वर्तवेना । मूर्खपणें लोकीं नाना । कळह उठती ॥ ८ ॥ मग ते कळो वाढती । परस्परें कष्टी होती । प्रेत्न राहातां अंतीं । श्रमचि होय ॥ ९ ॥ ऐसी नव्हे वर्तणुक । परीक्षावे नाना लोक । समजलें पाहिजे नेमक । ज्याचें त्यापरी ॥ १० ॥ शब्दपरीक्षा अंतरपरीक्षा । कांहीं येक कळे दक्षा । मनोगत नतद्रक्षा । काय कळे ॥ ११ ॥ दुसऱ्यास शब्द ठेवणें । आपला कैपक्ष घेणें । पाहों जातां लौकिक लक्षणें । बहुतेक ऐसीं ॥ १२ ॥ लोकीं बरें म्हणायाकारणें । भल्यांस लागतें सोसणें । न सोसितां भंडवाणें । सहजचि होये ॥ १३ ॥ आपणास जें मानेना । तेथें कदा राहावेना । उरी तोडून जावेना । कोणीयेकें ॥ १४ ॥ बोलतो खरें चालतो खरें । त्यास मानिती लहानथोरें । न्याय अन्याय

मनासारख्या व्हाव्या असें तुम्हांला मनापासून वाटतें पण मनोगतासारखें कांहींच होत नाहीं. उलट सरळ करितां वांकडेंच होतें. असा तुम्हांला अनुभव आहे (१–४). असें कां होतें, यांत आपला कांहीं दोष आहे कीं काय याचा विचार केला पाहिजे–एक सुखी, एक दुःखी असें व्यवहारांत आपण नित्य पाहतों, जे दुःखी होतात ते याचा दोष आपल्या प्रारब्धाला देतात पण (समर्थ सांगतात) यत्न करण्यांतच कोठें तरी चुका होतात म्हणून केलेलें काम यशस्वी होत नाहीं आणि आपल्या चुकांचा दोष टाळण्यासाठीं म्हणा किंवा स्वतःचे दोष उमगत नाहींत म्हणून म्हणा, हे लोक प्रारब्धाला नांवें ठेवतात. ज्याला स्वतःचेच दोष कळत नाहींत तो दुसऱ्यांचे काय जाणणार ? न्याय सोडील त्याच्या कपाळीं दैन्य हें ठेवलेलेंच. नियम सोडून वागणारास दैन्य प्राप्त झालें तर त्यांत नवल नाहीं. लोकांचें मनोगत हातीं घेतां येत नाहीं, लोकांसारखें वागतां येत नाहीं व याच्या मूर्खपणानें लोकांत अनेक मतें व अनेक पक्ष उभे राहतात. उभयपक्षीं कलह वाढत जातात. दोन्ही पक्ष दुःख पावतात, दोघांचे प्रयत्न शिथिल होतात व शेवटीं दोन्ही कष्टी होतात. लोकांत वागण्याची ही पद्धत नव्हे. अनेक प्रकारचे लोक व त्यांचे मनोभाव आणि स्वभावविशेष कळले पाहिजेत. ज्याचे त्यापरी वागतां आलें पाहिजे. शब्दपरीक्षा, अंतरपरीक्षा झाली पाहिजे, दक्ष असेल त्याला कांहीं तरी कळेल, करंट्याला परेंगित कसें कळावें ? (अनेकांचें मनोगत कळून तदनुसार ज्याचें त्यापरी वागतां आलें पाहिजे. हें ज्याला साधलें त्याचे यत्न यशस्वी होऊन तो सुखी होतो; हें साधत नाहीं तो अर्थातच दुःखी होतो) (५–११). दुसऱ्याला किंवा दुसऱ्या पक्षाला नांवें ठेवायचीं व आपल्याचा कैवार घ्यायचा हें लौकिक लक्षणच सर्वत्र दिसतें पण सर्वांकडून भलें म्हणून घेणाराला सोसावें लागतें; सोसलें नाहीं तर कलहउद्वेग उत्पन्न होतात. आपणांस जेथील वागणूक किंवा मतें रुचत नाहींत तेथें माणसाला राहवत नाहीं व भीड तोडून जाववत नाहीं; पण ज्याच्या बोलण्याचालण्यांत खरेपणा आहे (त्याला पक्षभेदांचा ताप होतच नाहीं कां कीं) त्याला लहानथोर सारखेच मानतात व न्याय कोणता अन्याय कोणता याचा निर्णय लोकांत परस्परच होत असतो. (१२–१५).

परस्परें । सहजचि कळे ॥ १५ ॥ लोकांस कळेना तंवरी । विवेकें क्षमा जो न करी । तेणेंकरितां बरोबरी । होत जाते ॥ १६ ॥ जंवरी चंदन झिजेना । तंवरी सुगंध कळेना । चंदन आणि वृक्ष नाना । सगट होती ॥१७॥ जंव उत्तम गुण न कळे । तों या जनास काय कळे । उत्तम गुण देखतां निवळे । जगदांतर ॥ १८ ॥ जगदांतर निवळत गेलें । जगदांतरीं सौख्य जालें । मग जाणावें वोळले । विश्व जन ॥ १९ ॥ जनीं जनार्दन वोळला । तरी काय उणें तयाला । राजी राखावें सकळांला । कठीण आहे ॥ २० ॥ पेरिलें तें उगवतें । उसिणें द्यावें घ्यावें लागतें । वर्म काढितां भंगतें । परांतर ॥ २१ ॥ लोकीं बरेपण केलें । तेणें सौख्य वाढलें । उत्तरासारिखें आलें । प्रत्योत्तर ॥ २२ ॥ हें आवघें आपणांपासीं । येथें बोल नाहीं जनांसी । सिकवावें आपल्या मनासी । क्षणक्षणा ॥ २३ ॥ खळ दुर्जन भेटला । क्षमेचा धीर बुडाला । तरी मोनेंचि स्थळत्याग केला । पाहिजे साधकें ॥ २४ ॥ लोक नाना परीक्षा जाणती । अंतरपरीक्षा नेणती । तेणें प्राणी करंटे होती । संदेह नाहीं ॥ २५ ॥ आपणास आहे मरण । म्हणोन राखावें बरेंपण । कठिण आहे लक्षण । विवेकाचें ॥ २६ ॥ थोर लहान समान । आपले पारिखे सकळ जन । चढतें वाढतें संनेधान । करितां बरें ॥ २७ ॥ बरें करितां बरें होतें । हें तों प्रत्ययास येतें । आतां पुढें सांगावें तें । कोणास काय ॥ २८ ॥

लोकांना कळत नाहीं, तोंवर विवेकानें क्षमाशीलपणा धरिला पाहिजे, न धरल्यास बरोबरी होते. चंदन झिजत नाहीं तोंवर त्याचा सुगंधही कळत नाहीं; चंदन, बोरी व बाभळी सारख्याच होतात. लोकांना उत्तम गुण कळले नाहींत तर कोणाचेंही महत्त्व वाटत नाहीं, उत्तम गुण कळल्यावर सर्वांचीं मनें शांत होतात. लोकांचीं मनें निवळत गेलीं, लोकांच्या मनांत याच्याविषयीं आदरयुक्त प्रेम उत्पन्न झालें म्हणजे मग सारे लोक वश होतात. जनीं जनार्दन भरला आहे तो प्रसन्न झाल्यावर मग उणें काय ? असें सर्वांना राजी राखतां येणें फार कठिण आहे (१६–२०). पेरावें तें उगवतें, उसनें द्यावें घ्यावें लागतें, कोणाचेंही वर्म काढलें तर त्याचें मन दुखावलें जातें. भलेपणाच्या वागणुकीनें सर्व लोक सुखी होतात, उत्तरासारखें प्रत्युत्तर येतें (तुमच्या भलेपणाची फेड लोक तुमच्याशीं भलेपणानें वागूनच करितात.) हें सर्व आपणाकडे येतें, तेथें लोकांना दोष देतां येत नाहीं, म्हणून क्षणक्षणां आपल्या मनाला शिकवून शहाणें करावें (शांति क्षमा धरिल्यानें व भलेपणानें लोकांशीं वागल्यानें लोक वश होतात. चिणचिण करून पक्षपातित्व केल्यानें कलह माजतात म्हणून भल्यानें शांतीनें सोसायला शिकलें पाहिजे. वादानें भेद मोडत नाहींत तर सोशिकपणानें, शांततेनें सर्वांना पोटांत घेऊन भेदातीत झाल्यानें लोक वश होतात. खरा कार्यकर्ता लोकनायक कसा असावा हें या समासांत सांगितलें आहे). भलेपणाची ज्यांच्यापाशीं किंमत होत नाहीं अशा दुष्ट दुर्जनांशीं गांठ पडली व वेळेला आपली सहनशीलताही ढळूं लागली तर भल्यानें मुकाट्यानें (मौनें कलह करून व कुभावनांचें बीज पेरून) तेथून पाय काढावा म्ह० स्थळ त्याग करावा (२१–२४). लोक अनेक विषयांत निष्णात (पारखी) असतात, पण परांतर पारखूं जाणत नाहींत म्हणून करंटे होतात यांत संशय नाहीं. हट्टाला पेटूं नये, आपल्यालाही एक दिवस मरायचें आहे हें जाणून भलेपण राखावें. हें विवेकाचें काम आहे, हवें त्यांस साधणारें नाहीं. आपल्यापेक्षां लहान, मोठे अथवा आपल्या बरोबरीचे, स्वजन अथवा परजन कोणीही असोत –सर्वांशीं चढत्यावाढत्या स्नेहानें वागतां आलें पाहिजे. भलेपणानें भलेपण वाढतें ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे, आतां यापेक्षां

हरिकथानिरूपण । बरेपणें राजकारण । प्रसंग पाहिल्याविण । सकळ खोटें ॥ २९ ॥ विद्या उदंड सिकला । प्रसंगमान चुकताचि गेला । तरी मग तये विद्येला । कोण पुसे ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे प्रत्ययनिरूपणनाम समास द्वितीय ॥ २ ॥

॥ श्रीराम ॥ पृथ्वीमध्यें बहुत लोक । तेहीं पाहावा विवेक । इहलोक आणि परलोक । बरा पाहावा ॥ १ ॥ इहलोक साधायाकारणें । जाणत्याची संगती धरणें । परलोक साधायाकारणें । सद्गुरु पाहिजे ॥ २ ॥ सद्गुरुसी काय पुसावें । हेंहि कळेना स्वभावें । अनन्यभावें येकभावें । दोनी गोष्टी पुसाव्या ॥ ३ ॥ दोनी गोष्टी त्या कोण । देव कोण आपण कोण । या गोष्टीचें विवरण । केलेंचि करावें ॥ ४ ॥ आधीं मुख्य देव तो कोण । मग आपण भक्त तो कोण । पंचीकरण महावाक्यविवरण । केलेंचि करावें ॥ ५ ॥ सकळ केलियाचें फळ । शाश्वत वोळखावें निश्चळ । आपण कोण हा केवळ । शोध घ्यावा ॥ ६ ॥ सारासारविचार घेतां । पदार्थास नाहीं शाश्वतता । आधीं कारण भगवंता । वोळखिलें पाहिजे ॥ ७ ॥ निश्चळ चंचळ आणी जड । अवघा मायेचा पवाड । यामध्यें वस्तु जाड । जाणार नाहीं ॥ ८ ॥ तें परब्रह्म धुंडावें । विवेकें त्रैलोक्य हिंडावें । माईक विचारें खंडावें । परीक्षवंतीं ॥ ९ ॥ खोटें सांडून खरें घ्यावें । परीक्षवंतीं परीक्षावें । मायेचें अवघेंचि जाणावें । रूप माईक ॥ १० ॥ पंचभूतिक हे माया । माईक जाय विलया । पिंडब्रह्मांड अष्टकाया । नासिवंत ॥ ११ ॥ दिसेल तितुकें

अधिक सांगावयाचें काय राहिलें आहे? हरिकथा व अध्यात्मनिरूपण, तसेंच भलेपणाचें राजकारण—हे सर्व प्रसंग (जनस्थलमान) पाहून करावे, प्रसंग ध्यानांत न आणतां केल्यास निष्फल होतें. विद्या पुष्कळ शिकला पण प्रसंगानुसार वागणें चुकत गेला तर त्या विद्येचा उपयोग काय? (२५–३०) [द० १२, स० २]

ह्या पृथ्वीवर बहुत मनुष्यें आहेत. माणसांनीं इहलोक (प्रवृत्ति) व परलोक (निवृत्ति) या दोहींचा नीट विचार करावा. इहलोक साधण्यासाठीं जाणत्याची संगत धरावी व परलोकप्राप्तीसाठीं सद्गुरुचरण सेवावे (१–२). सद्गुरूला काय विचारावें हें सहज कळत नाहीं. त्याला दोन गोष्टी विचाराव्या. ‘देव कोण व आपण कोण’ या त्या दोन गोष्टी. मुख्य देव कोणता व आपण भक्त कोण, तात्पर्य देवभक्ताचा विचार पुसावा व त्यासाठीं पंचीकरण समजून घ्यावें व महावाक्याचा विचार करावा. सर्व श्रमांचें साफल्य हेंच कीं निश्चळ शाश्वत परब्रह्म ओळखावें व आपण कोण याचा शोध घ्यावा (३–६). सार कोणतें व असार कोणतें हें पाहतां पदार्थमात्र तितुका असार म्ह. अशाश्वत, याला कारण सारभूत भगवंत याहून वेगळा आहे. अचल ब्रह्म, चंचल अंतरात्मा व जड पदार्थ हा सर्व मायावी पसारा आहे, शाश्वत ब्रह्म याहून निराळें आहे. विवेकानें त्रैलोक्यभर फिरावें, त्याला शोधावें व मायिक विवेकानें निरसावें. पारखी लोक खोटें टाकून खरें घेतात, तसें विवेकीजन मायेचें सारेंच मायिक जाणून शाश्वत ब्रह्म स्वीकारतात. माया पंचभौतिक आहे, पिंडब्रह्मांड मायिक आहे म्हणून

नासेल । उपजेल तितुकें मरेल । रचेल तितुकें खचेल । रूप मायेचें ॥ १२ ॥ वाढेल तितुकें मोडेल । येईल तितुकें जाईल । भूतांस भूत खाईल । कल्पांतकाळीं ॥ १३ ॥ देहधारक तितुके नासती । हे तों रोकडी प्रचिती । मनुष्येंविण उत्पत्ति । रेत कैंचें ॥ १४ ॥ अन्न नस्तां रेत कैंचें । औषधी नस्तां अन्न कैंचें । औषधीस जिणें कैंचें । पृथ्वी नस्तां ॥ १५ ॥ आप नस्तां पृथ्वी नाहीं । तेज नस्तां आप नाहीं । वायो नस्तां तेज नाहीं । ऐसें जाणावें ॥ १६ ॥ अंतरात्मा नस्तां वायो कैंचा । विकार नस्तां अंतरात्मा कैंचा । निर्विकारीं विकार कैंचा । बरें पहावें ॥ १७ ॥ पृथ्वी नाहीं आप नाहीं । तेज नाहीं वायो नाहीं । अंतरात्मा विकार नाहीं । निर्विकारीं ॥ १८ ॥ निर्विकार जें निर्गुण । तेचि शाश्वताची खूण । अष्टधा प्रकृति संपूर्ण । नासिवंत ॥ १९ ॥ नासिवंत समजोन पाहिलें । तों तें अस्तांचि नस्तें जालें । सारासारें कळों आलें । समाधान ॥ २० ॥ विवेकें पाहिला विचार । मनास आलें सारासार । येणेंकरितां विचार । सदृढ झाला ॥ २१ ॥ शाश्वत देव तो निर्गुण । ऐसी अंतरीं बाणली खूण । देव कळला मी कोण । कळलें पाहिजे ॥ २२ ॥ मी कोण पाहिजे कळलें । देहतत्व तितुकें शोधिलें । मनोवृत्तीचा ठाईं आलें । मीतूंपण ॥ २३ ॥ सकळ देहाचा शोध घेतां । मीपण दिसेना पाहातां । मीतूंपण तत्वता । तत्वीं मावळलीं ॥ २४ ॥ दृश्य पदार्थचि वोसरे । तत्वें तत्व तेंव्हां सरे । मीतूंपण कैंचें उरे । तत्वता वस्तु ॥ २५ ॥ पंचीकरण तत्वविवरण । महावाक्यें वस्तु आपण ।

हें सारें नाशवंत आहे. जें दिसतें तें नासतें, जन्मतें तें मरतें, रचतें तें खचतें, वाढतें तितकें मोडतें, येतें तितकें जातें हें सर्व नाशवंत आहे. कल्पांतीं पृथिव्यादि भूतांचा एकमेकांत लय होतो (७–१३). देहधारी सारे प्राणी नित्य मरतांना आपण पाहतों. मनुष्याच्या रक्तरेतापासून माणसांची उत्पत्ति होते हेंही स्पष्ट आहे. अन्न नाहीं तर रेत कुठचें, औषधी नाहीं तर अन्न कुठचें, पृथ्वी नाहीं तर औषधी कुठची, आप नाहीं तर पृथ्वी कुठची, तेज नाहीं तर आप कुठचें, वायु नाहीं तर तेज कुठचें, आकाश नाहीं तर वायु कुठचा ? आकाश म्ह. अंतरात्मा हाही परब्रह्मीं ' एकोहं बहु स्याम् ' हा विकार झाला नसता तर कोठून येता ? पण आधीं निर्विकार ब्रह्माच्या ठिकाणीं विकार संभवतो का हें पहा बरें ! त्याच्या ठिकाणीं पृथ्वीपासून अंतरात्म्यापर्यंत पंचभूतांपैकीं कांहींएक नाहीं. तात्पर्य, निर्विकार ब्रह्म तें सार व त्यावांचून बाकीची अष्टधा प्रकृति सारी असार म्ह. नाशवंत, विवकानें नाशवंत सृष्टीकडे पाहिले म्हणजे ती असतांच नाहींशी होऊन जाते, व शाश्वताचें समाधान प्राप्त होतें. सारासार विवेकानें हाच विचार दृढ करावा. शाश्वत निर्गुण ब्रह्म तो देव ही खूण बाणली, आतां मी कोण याचा विचार केला पाहिजे (१४–२२). मीपण देहसंगानें उद्भवतें म्हणून देह कोणत्या तत्त्वांचा झाला हें पाहिलें तों मीतूंपण हा मनाचा एक धर्म आहे इतकें कळलें. सगळा देह शोधून पाहिला तों तत्त्वें तत्त्वांत मिसळून गेल्यावर मीपण कांहीं सांपडलें नाहीं, द्दश्याचा लय किंवा निरास होतांच तत्त्वांत तत्त्वें लीन होऊन गेलीं, मग मीतूंपण कुठचें उरणार ? सत्य वस्तु तेवढी उरली. पंचीकरण, तत्त्वविवरण व महावाक्यविचार ह्या तीन गोष्टी झाल्या कीं आपला म्ह. देहाचा संग सोडून (निःसंगपणें)

निसंगपणें निवेदन । केलें पाहिजे ॥ २६ ॥ देवाभक्तांचें मूळ । शोधून पाहातां सकळ । उपाधीवेगळा केवळ । निरुपाधी आत्मा ॥ २७ ॥ मीपण तें बुडालें । विवेकें वेगळेपण गेलें । निवृत्तिपदास प्राप्त जालें । उन्मनीपद ॥ २८ ॥ विज्ञानीं राहिलें ज्ञान । ध्येयें राहिलें ध्यान । सकळ कांहीं कार्याकारण । पाहोन सांडिलें ॥ २९ ॥ जन्ममरणाचें चुकलें । पाप अवघेंचि बुडालें । यमयातनेचें जालें । निसंतान ॥ ३० ॥ निबंध अवघाचि तुटला । विचारें मोक्ष प्राप्त जाला । जन्म सार्थकचि वाटला । सकळ कांहीं ॥ ३१ ॥ नाना किंत निवारले । धोके अवघेचि तुटले । ज्ञानविवेकें पावन जाले । बहुत लोक ॥ ३२ ॥ पतितपावनाचे दास । तेहि पावन करिती जगास । ऐसी हे प्रचित मनास । बहुतांच्या आली ॥ ३३ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे भक्तनिरूपणनाम समास तृतीय ॥ ३ ॥

॥ श्रीराम ॥ महद्भाग्य हातासी आलें । परंतु भोगूं नाहीं जाणितलें । तैसें वैराग्य उत्पन्न जालें । परी विवेक नाहीं ॥ १ ॥ आदळतें आफळतें । कष्टी होतें दुःखी होतें । ऐकतें देखतें येतें । वैराग्य तेणें ॥ २ ॥ नाना प्रपंचाच्या वोढी । नाना संकटें सांकडी । संसार सांडून देशधडी । होय तेणें ॥ ३ ॥ चिंतेपासुनी सुटला । पराधीनतेपासुनी पळाला । दुःखत्यागें मोकळा जाला । रोगी जैसा ॥ ४ ॥ परी तो होऊं नये मोकाट । नष्ट भ्रष्ट आणी चाट । सीमाच नाहीं सैराट । गुरूं जैसे ॥ ५ ॥ विविकेंविण वैराग्य

आत्मनिवेदन होऊन देवाभक्तांचें मूळ हातीं येतें–आत्मा निरुपाधिक एकाकी आहे त्याशीं अनन्यता होते (२३–२७). तत्त्वनिरसन झालें त्यांत तत्त्वांबरोबर मीपण गेलें, विवेकानें जीवशिवभेद मावळला, वृत्तिरहित पदप्राप्ति होऊन मन उन्मन झालें. ज्ञान विज्ञानांत विसरून गेलें, ध्यान ध्येयांत बुडालें, कार्यकारण विचारणा खुंटली, जन्ममरणाचें भय संपलें, पाप (पुण्यही) नाहींसें झालें, यमयातना चुकली. सारे बंध सुटून विवेकानेंच मोक्ष हातीं आला, जन्मसाफल्याचें समाधान झालें. कुतर्क संपले, संकटें गेलीं. याप्रमाणें ज्ञानविवेकानें अनेक जीव उद्धरले आहेत. परमात्मा पतीतांना पावन करणारा आहे, त्याचे दासही पतीतांना पावन करण्यास समर्थ होतात–या गोष्टीची प्रचीति बहुतांस आली आहेच (२८–३३). [दं० १२, स० ३]

एखाद्याला मोठें ऐश्वर्य प्राप्त व्हावें पण त्याला तें भोगावें कसें हें माहीत नसावें म्हणजे तें प्राप्त होऊनही उपयोग नाहीं, त्याप्रमाणें विवेकावांचून वैराग्यही निष्फळ होय. घरांत कजाग बायकोची आदळ आपट पाहिली, दुःखी कष्टी जीव पाहिले किंवा त्यांच्या अनंत यातनांच्या गोष्टी ऐकल्या म्हणजे मनुष्य संसाराला विटतो. प्रपंचांतल्या हजारों ओढी, अडचणी, संकटें पाहून मनुष्य संसार सोडून घरादारांचा त्याग करून जोगी होतो. याप्रमाणे तो संसारांतल्या काळज्या व परस्वाधीनपणा यांपासून पळून जाऊन रोगमुक्त झालेल्या रोग्याप्रमाणें मनुष्य दुःखक्लेशांपासून मोकळा होईल पण एवढ्यानें भागत नाहीं. तो अनर्गळ (मोकाट), पापी, आचारशून्य (भ्रष्ट), वात्रट (चाट) व मोकळे सुटलेल्या जनावराप्रमाणें अत्यंत उनाड असा न व्हावा म्हणून वैराग्याला विवेकाची जोड मिळाली पाहिजे. विवेकरहित वैराग्य म्हणजे जाणून बुजून

केलें। तरी अविवेकें अनर्थी घातलें। अवघें व्यर्थचि गेलें। दोहींकडे ॥ ६ ॥ ना प्रपंच ना परमार्थ। अवघें जिणेंचि जालें व्यर्थ। अविवेकें अनर्थ। ऐसा केला ॥ ७ ॥ कां व्यर्थचि ज्ञान बडबडिला। परी वैराग्ययोग नाहीं घडला। जैसा कारागृहीं अडकला। पुरुषार्थ सांगे ॥ ८ ॥ वैराग्येंविण ज्ञान। तो व्यर्थचि साभिमान। लोभदंभें घोळसून। कासावीस केला ॥ ९ ॥ श्वान बांधलें तरी भुंके। तैसा स्वार्थमुळें थिंके। पराधीक देखों न सके। साभिमानें ॥ १० ॥ हें येकेंविण येक। तेणें उगाच वाढे शोक। आतां वैराग्य आणि विवेक। योग ऐका ॥ ११ ॥ विवेकें अंतरीं सुटला। वैराग्यें प्रपंच तुटला। अंतर्बाह्य मोकळा जाला। निःसंग योगी ॥ १२ ॥ जैसें मुखें ज्ञान बोले। तैसीच सर्व क्रिया चाले। दीक्षा देखोनी चकीत जाले। सुचिस्मंत ॥ १३ ॥ आस्था नाहीं त्रैलोक्याची। स्थीत बाणली वैराग्याची। यत्न-विवेकधारणेची। सीमा नाहीं ॥ १४ ॥ संगीत रसाळ हरिकीर्तन। ताळबद्ध तानमान। प्रेमळ आवडीचें भजन। अंतरापासुनी ॥ १५ ॥ तत्काळचि सन्मार्ग लागे। ऐसा अंतरीं विवेक जागे। वक्तृत्व करितां न भंगें। साहित्य प्रत्ययाचें ॥ १६ ॥ सन्मार्गें जगास मिळाला। म्हणिजे जगदीश वोळला। प्रसंग पाहिजे कळला। कोणीयेक ॥ १७ ॥ प्रखर वैराग्य उदासीन। प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान। स्नानसंध्या भगवद्भजन। पुण्यमार्ग ॥ १८ ॥ विवेक

अनर्थपरंपरा ओढवून घेणें होय. कां कीं मग वैराग्य नाहीं व विवेकही नाहीं, धड प्रपंच नाहीं व परमार्थही नाहीं असें होऊन दोहींकडे जिणें व्यर्थ होतें. विवेक नसला म्हणजे असा अनर्थ होतो (१–७). किंवा शब्दशास्त्र पुष्कळ पढला व सांगूं लागला म्ह. थोडा फार विवेक बोलूं लागला पण चित्तांत वैराग्य नसेल तरी तें व्यर्थ होय. विषयांचा व प्रपंचाचा दास असलेल्या मनुष्यानें दुसऱ्यांस विवेक सांगणें म्ह. बंदिवासांत पडलेल्या पराधीन जीवानें आपल्या पराक्रमाच्या गोष्टी सांगण्यासारखें हास्यास्पद होय. वैराग्यावांचून ज्ञान म्हणजे केवळ प्रौढी होय. लोभदंभाचा गुलाम बनलेला हा मूर्ख सांखळदंडानें बांधलेला कुत्रा उगाच भोंकत असतो तसा स्वार्थानें अंध झालेला व गर्वानें परोत्कर्ष सहन न करणारा हा ज्ञान बडबडत असला तरी तें फुकट होय. तात्पर्य, विवेक आणि वैराग्य यांपैकीं एक उणें असेल तरी दुःखशोक टळत नाहीं, दोहोंचा संयोग झाला म्हणजे काय बहार होते ती ऐका (८–११). विवेकानें आंतलें बंध तुटतात व वैराग्यानें बाह्य प्रपंच सुटतो. याप्रमाणें अंतर्बाह्य मोकळा झालेला निःसंग पुरुष खरा योगी होय. तो विचार करून बोलतो व बोलण्यासारखें वागतो. त्याची दीक्षा पाहूनच सदाचारी सज्जन संतोष पावतात. त्रैलोक्याच्या राज्यापर्यंत कोणत्याही पदार्थाची लालसा नाहीं इतकें कडकडीत वैराग्य त्याच्या ठिकाणीं बाणलेलें असतें. लोकोपकारक प्रयत्न, विवेक, धारणा हे त्याच्यापाशीं निस्सीम असतात. गायनयुक्त प्रेमळ कीर्तन, तालसुराची उत्तम माहिती, तानमान, मनापासून निरपेक्ष भजन असा त्याचा कीर्तनाचा रंग व विवेक पाहून लोक तत्काळ परमार्थ मार्गाला लागतात, आणि त्याच्या वक्तृत्वाच्या भरांत अनुभवाचीं साधनें (साधनमार्ग) मोडत नाहींत. सन्मार्गाचें आचरण करीत असतां जनांच्या मनीं भरला म्हणजे जनार्दन प्रसन्न झाला असेंच समजावें. पण याला प्रसंगवेळ, तानमान सर्व कांहीं कळलें पाहिजे. अचळ वैराग्य, निर्लोभ निर्दंभ व निर्द्वंद्व स्थिति (उदासीनता), मुरलेलें ब्रह्मज्ञान, स्नानसंध्या भगवद्भजन, सदाचार—हें

वैराग्य तें ऐसें । नुस्तें वैराग्य हेंकाडपिसें । शब्दज्ञान येळिलसें । आपणचि वाटे ॥ १९ ॥ म्हणोनी विवेक आणि वैराग्य । तेंचि जाणिजे महद्भाग्य । रामदास म्हणे योग्य । साधु जाणती ॥ २० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विवेकवैराग्यनाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥ रेखेचें गुंडाळें केलें । मात्रुकाक्षरीं शब्द जाले । शब्द मेळऊन चाले । श्लोक गद्य प्रबंद ॥ १ ॥ वेदशास्त्रें पुराणें । नाना काव्यें निरूपणें । ग्रंथभेद अनुवादणें । किती म्हणोनी ॥ २ ॥ नाना ऋषी नाना मतें । पाहों जातां असंख्यातें । भाषा लिपी जेथ तेथें । काय उणें ॥ ३ ॥ वर्ग ऋचा श्रुति स्मृति । अधे स्वर्ग स्तबक जाती । प्रसंग मानें समास पोथी । बहुधा नामें ॥ ४ ॥ नाना पदें नाना श्लोक । नाना बीर नाना कडक । नाना साख्या दोहडे अनेक । नामाभिधानें ॥ ५ ॥ डफगाणें माचिगाणें । दंडिगाणें कथागाणें । नाना मानें नाना जसनें । नाना खेळ ॥ ६ ॥ ध्वनि घोष नाद रेखा । चहुं वाचामध्यें देखा । वाचारूपेंहि ऐका । नाना भेद ॥ ७ ॥ उन्मेष परा ध्वनि पश्यंती । नाद मध्यमा शब्द चौथी । वैखरीपासून उमटती । नाना शब्दरत्नें ॥ ८ ॥ आकार उकार मकार । अर्धमात्राचें अंतर । औटमात्रा तदनंतर । बावन मात्रुका ॥ ९ ॥ नामभेद रागज्ञान । नृत्यभेद ताळज्ञान । अर्थभेद तत्वज्ञान । विवंचना ॥ १० ॥ तत्वांमध्यें मुख्य तत्व । तें जाणावें शुद्धसत्व । अर्धमात्रा महत्तत्व ।

सर्व जेथें आहे तेथें विवेक व वैराग्य दोन्हीं आहेत असें समजावें. नुसतें वैराग्य म्हणजे हेकाडपणा होय व नुसतें शब्दज्ञान म्ह. विवेकाच्या गोष्टी पांचट (येळील, शिळ्या) होत. म्हणून विवेक आणि वैराग्य दोन्ही असणें हेंच महद्भाग्य होय. विवेकवैराग्यसंपन्न असा पुरुषच दैवाचा पुतळा होय हें सर्व खरे सत्पुरुष जाणत असतात (१२–२०). [द० १२, स० ४].

रेषांचें गुंडाळें करून त्यांत स्वरव्यंजनादि घालून अक्षर बनतें, व अनेकाक्षरांचे शब्द बनून त्यांचे पुढें गद्यपद्यादि प्रकार होतात. वेद, शास्त्रें, पुराणें, नानाविध काव्यें, निरूपणें इ० ग्रंथांचे भेद किती प्रकारचे आहेत म्हणून सांगावें ? अनेक ऋषी आणि त्यांचीं अनेक मतें यांचा विचार पाहातां हीं असंख्य आहेत. जेथें भाषा व लिपी आहे तेथें काय कमी ? वर्ग, (ऋग्वेदांतील अध्यायांचे पोटभेद), ऋचा (वेदांतील मंत्र), श्रुति, स्मृति, अध्याय, सर्ग, स्तबक (चंपूआदिकरून ग्रंथांतील भाग), जाति, प्रसंग, माने, समास, पोथी इ० ग्रंथविभागाचीं अनेक नांवें आहेत. पदें, श्लोक, बीर व कडक (हिंदुस्थानी भाषेंत हे छंद आहेत), साख्या, दोहरे अशीं अनेक नांवें आहेत. डफगाणें, माचीगाणें (माची म्ह० ढोलकें), दिंडीगाणें, कथागाणें, इ० गायनप्रकार तानमानाप्रमाणें व खेळांप्रमाणें नानाविध आहेत. ध्वनि, घोष, नाद, रेखा हे चारी वाणींत आहेत. वैखरी वाणींतही नाना प्रकार आहेत. परावाणीच्या ठिकाणीं उन्मेष म्ह० स्फुरण, पश्यन्तीच्या ठिकाणीं ध्वनि, मध्यमेच्या ठिकाणीं नाद व वैखरीच्या ठिकाणीं नाना रेषा व त्यापासून नाना शब्दरत्नें निर्माण होतात. अकार, उकार, मकार, अर्धमात्रा, मिळून साडेतीन (औट) मात्रा, व त्यापासून (ओंकारापासून) पुढें ५२ मात्रा (मातृका) म्ह० अपासून ज्ञपर्यंत १६ स्वर व ३६ व्यंजनें. नादभेद, रागज्ञान, ताल किंवा तान यांचें ज्ञान, अर्थभेद, तत्त्वज्ञानाचे अनेक प्रकार आहेत. (साडेतीन मात्रांचा ओंकार, त्यांत अकार तमोगुण, उकार रजोगुण, मकार सत्वगुण) व यांत मुख्य तत्त्व

मूळमाया ॥ ११ ॥ नाना तत्वें लहानथोरें । मिळोन अष्टहि शरीरें । अष्टधा प्रकृतीचें वारें । निघोन जातें ॥ १२ ॥ वारें नस्तां जैसें गगन । तैसें परब्रह्म सघन । अष्ट देहाचें निरसन । करून पाहावें ॥ १३ ॥ ब्रह्मांडपिंडउभार । पिंडब्रह्मांडसंहार । दोहींवेगळें सारासार । विमळब्रह्म ॥१४॥ पदार्थ जड आत्मा चंचळ । विमळब्रह्म तें निश्चळ । विवरोन विरे तत्काळ । तद्रूप होय ॥ १५ ॥ पदार्थ मनें काया वाचा । मी हा अवघाचि देवाचा । जड आत्मनिवेदनाचा । विचार ऐसा ॥ १६ ॥ चंचळकर्ता तो जगदीश । प्राणिमात्र त्याचा अंश । त्याचा तोचि आपणास । ठाव नाहीं ॥ १७ ॥ चंचळ आत्मनिवेदन । याचें सांगितलें लक्षण । कर्ता देव तो आपण । कोठेंचि नाहीं ॥ १८ ॥ चंचळ चळे स्वप्नाकार । निश्चळ देव तो निराकार । आत्मनिवेदनाचा प्रकार । जाणिजे ऐसा ॥ १९ ॥ ठावचि नाहीं चंचळाचा । तेथें आधीं आपण कैंचा । निश्चळ आत्मनिवेदनाचा । विवेक ऐसा ॥ २० ॥ तिहीं प्रकार आपण । नाहीं नाहीं दुजेपण । आपण नस्तां मीपण । नाहींच कोठें ॥ २१ ॥ पाहातां पाहातां अनुमानलें । कळतां कळतां कळों आलें । पाहातां अवघेंचि निवांत जालें । बोलणें आतां ॥ २२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आत्मनिवेदननाम समास पंचम ॥ ५ ॥

॥ श्रीराम ॥ ब्रह्म निर्मळ निश्चळ । शाश्वत सार अमळ विमळ । अवकाश घन पोकळ । गगनाऐसें ॥ १ ॥ तयास करणें ना धरणें । तयास

म्ह. अर्धमात्रा हा शुद्ध सत्वगुण यालाच महत्तत्व किंवा मूळमाया म्हणतात. शब्दसृष्टि या प्रकारची आहे. देहाचेही आठ प्रकार आहेत (चार देह पिंडाचे व चार ब्रह्मांडाचे). हे आठ देह नाना तत्त्वांचे बनले आहेत. मुख्य तत्त्वें म्ह० त्रिगुण व पंचभूतें मिळून अष्टधा प्रकृति, ही वायुरूप मूळमायेपासून झाली (१–१२). वायु नसतां जें आकाश तसें अष्टदेहांचा निरास करून घनदाट ब्रह्म आहे तें विवेकानें पाहावें. पिंडब्रह्मांडाची उभारणी व संहारणी (स्थूलदेहापासून मूळमायेपर्यंत अष्टदेहांचा विचार व निरास करून सारभूत विमल ब्रह्म शोधावें. पदार्थ जड, आत्मा (अंतरात्मा) चंचळ दोहींचा निरास करून निश्चळ परब्रह्म शोधावें), व त्याचें विवरण करितां करितां त्यांत विरून जावें म्हणजे तद्रूप व्हावें (१३–१५). यापुढें (जड आत्मनिवेदन, चंचळ आत्मनिवेदन व निश्चळ आत्मनिवेदन असे) आत्मनिवेदनाचे चढते तीन प्रकार सांगतों. देहापासून जगापर्यंत सर्व नानातत्त्वात्मक जड सृष्टि देवाची, मी व माझें हें कांहीं नाहीं याप्रमाणें कायावाचामनेंसहित देवाला शरण जाणें हें जड आत्मनिवेदन. चंचळ जो जीवात्मा तो त्याचा कर्ता जो जगदीश (कीं सारे प्राणी ज्याचे अंश आहेत) त्याचाच आहे, जीवात्मा वेगळा नाहीं, कर्ता देव तो आपण नाहीं हें चंचळ आत्मनिवेदन. आतां चंचळ हें स्वप्नाकार असून त्याचा ठावच नाहीं, एका निश्चळ ब्रह्मावेगळें दुसरें कांहीं एक नाहीं हें निश्चळ आत्मनिवेदन. तीनही प्रकारांत आपण कोठेंच नाहीं, (अर्थात् मीपण नाहीं) दुजेपण नाहीं, एकच एक परब्रह्म आहे (१६–२१). हें विवरतां विवरतां कळूं लागतें. कळतां कळतां अंतरीं ठसतें व निश्चळ ब्रह्माकार होतां सारें बोलणेंच खुंटतें (२२). [द० १२, स० ५].

ब्रह्म हें आकाशासारखेंच निर्मळ, निश्चळ, शाश्वत, निर्मर्याद व व्यापक आहे. त्याला करणें, धरणें, जन्मणें–मरणें,

जन्म ना मरणें । तेथें जाणणें ना नेणणें । शून्यातीत ॥ २ ॥ ते रचेना ना खचेना । तें होयेना ना जायेना । मायातीत निरंजना । पारचि नाहीं ॥ ३ ॥ पुढें संकल्प उठिला । षड्गुणेश्वर बोलिजे त्याला । अर्धनारीनटेश्वराला । बोलिजेतें ॥ ४ ॥ सर्वेश्वर सर्वज्ञ । साक्षी द्रष्टा ज्ञानघन । परेश परमात्मा जगजीवन । मूळपुरुष ॥ ५ ॥ ते मूळमाया बहुगुणी । अधोमुखें गुणक्षोभिणी । गुणत्रये तिजपासूनि । निर्माण जाले ॥ ६ ॥ पुढें विष्णु जाला निर्माण । जाणती कळा सत्वगुण । जो करिताहे पाळण । त्रैलोक्याचें ॥७॥ पुढें जाणीवनेणीवमिश्रित । ब्रह्मा जाणावा नेमस्त । त्याच्या गुणें उत्पत्ति होत । भुवनत्रयीं ॥ ८ ॥ पुढें रुद्र तमोगुण । सकळ संव्हाराचें कारण । सकळ कांहीं कर्तेपण । तेथेंचि आलें ॥ ९ ॥ तेथून पुढें पंचभूतें । पावलीं पष्ट दशेतें । अष्टधा प्रकृतीं स्वरूप तें । मुळींच आहे ॥ १० ॥ निश्चळीं जालें चळण । तेंचि वायोचें लक्षण । पंचभूतें आणि त्रिगुण । सूक्ष्म अष्टधा ॥ ११ ॥ आकाश म्हणिजे अंतरात्मा । प्रत्ययें पहावा महिमा । त्या आकाशापासून जन्मा । वायो आला ॥ १२ ॥ तया वायोच्या दोन्ही झुळुका । उष्ण सीतळ ऐका । सीतळापासून तारा मयंका । जन्म जाला ॥ १३ ॥ उष्णापासून रवि वन्ही । विद्युल्लता आदिकरूनि । सीतळ उष्ण मिळोनि । तेज जाणावें ॥ १४ ॥ तया तेजापासून जालें आप । आप आळोन पृथ्वीचें रूप । पुढें औषधी अमूप । निर्माण जाल्या ॥ १५ ॥ औषधीपासून नाना रस । नाना बीज अन्नरस । चौऱ्यांसि लक्ष योनींचा वास । भूमंडळी ॥ १६ ॥ ऐसी जाली सृष्टिरचना । विचार आणिला पाहिजे मना । प्रत्ययेंविण अनुमाना । पात्र होइजे ॥ १७ ॥ ऐसा जाला आकार । येणेंचि न्यायें

रचणें-खचणें, जाणणें–नेणणें, होणें–जाणें हें कांहींएक नाहीं. कां कीं तें मायातीत व अपार आहे (१–३). तेथें मी बहु व्हावें असा संकल्प उठला. आदिसंकल्प तीच मूळमाया. तिलाच षड्गुणैश्वर्यसंपन्न भगवान् म्हणतात. वायु व जाणीव या उभयरूपानें ती संपन्न असल्यामुळें अर्धनारी नटेश्वर हेंही तिचेंच नांव आहे. सर्वेश्वर, सर्वज्ञ, साक्षी, द्रष्टा, ज्ञानघन, परेश, परमात्मा, जगजीवन, मूळपुरुष, हीं सर्व नांवें मूळमायेचींच होत. ती मूळमायाच अधोमुखें गुणमाया होते, गुणमायेपासून त्रिगुण व त्रिगुणांचे देव-जाणता विष्णु, मध्यस्थ ब्रह्मा, व नेणता रुद्र या क्रमानें–होऊन तमोगुणरूप जो रुद्र त्यापासून पंचभूतें (आकाश–वायु–तेज–आप पृथ्वी या क्रमानें) निर्माण होतात. ही सूक्ष्म अष्टधा प्रकृति मूळमायेंतच अतिसूक्ष्म रूपानें आहे. तीच पुढें व्यक्त रूपाला येते. निश्चळ ब्रह्माच्या ठिकाणीं जो संकल्प उठला, जें पहिलें चळण झालें तीच मूळमाया. ती वायुस्वरूप आहे. त्रिगुणपंचभूतात्मक अष्टधा प्रकृति त्या वायुरूप मूळमायेंत सूक्ष्मरूपानें आहे. यांत आकाश म्ह. अंतरात्मा हा प्रत्ययानें पाहावा. आकाशापासून द्विविध वायु–उष्ण व शीतळ. शीतळ वायूपासून तारा व मयंक (चंद्र) हे झाले व उष्ण वायूपासून रवि, वन्हि, विद्युल्लता इ० झाले; तेजापासून आप, आप आळोन पृथ्वी, पृथ्वीपासून अनेक औषधी निर्माण झाल्या. औषधीपासून नाना रस, नानाबीज अन्नरस, व तेथून पुढें ८४ लक्ष योनि निर्माण झाल्या. याप्रमाणें सृष्टिरचनेचा विचार करावा (४–१७).

संव्हार । सारासारविचार । यास बोलिजे ॥ १८ ॥ जें जें जेथून निर्माण जालें । तें तें तेथेंचि निमालें । येणेंचि न्यायें संव्हारलें । महाप्रळईं ॥ १९ ॥ आद्य मध्य अवसान । जें शाश्वत निरंजन । तेथें लावावें अनुसंधान । जाणते पुरुषीं ॥ २० ॥ होत जाते नाना रचना । परी ते कांहींच तगेना । सारासारविचारणा । याकारणें ॥ २१ ॥ द्रष्टा साक्षी अंतरात्मा । सर्वत्र बोलती महिमा । परी हे सर्वसाक्षिणी अवस्था मां । प्रत्ययें पाहावी ॥ २२ ॥ मूळापासून सेवटवरी । अवघी मायेची भरोवरी । नाना विद्या कळाकुसरी । तयेमध्यें ॥ २३ ॥ जो उपाधीचा सेवट पावेल । त्यास भ्रम ऐसें वाटेल । जो उपाधीमध्यें आडकेल । त्यास काढिता कवण ॥ २४ ॥ विवेकप्रत्ययाचीं कामें । कैसीं घडतील अनुमानभ्रमें । सारासारविचाराचेन संभ्रमें । पाविजे ब्रह्म ॥ २५ ॥ ब्रह्मांडींचें महाकारण । ते मूळमाया जाण । अपूर्णास म्हणती ब्रह्म पूर्ण । विवेकहीन ॥ २६ ॥ सृष्टीमध्यें बहुजन । येक भोगिती नृपासन । येक विष्ठा टाकिती जाण । प्रत्येक्ष आतां ॥ २७ ॥ ऐसे उदंड लोक असती । आपणांस थोर म्हणती । परी ते विवेकी जाणती । सकळ कांहीं ॥ २८ ॥ ऐसा आहे समाचार । कारण पाहिजे विचार । बहुतांच्या बोलें हा संसार । नासूं नये ॥ २९ ॥ पुस्तकज्ञानें निश्चयो धरणें । तरी गुरु कासया करणें । याकारणें विवरणें । आपल्या प्रत्ययें ॥ ३० ॥ जो बहुतांच्या बोलें लागला । तो नेमस्त जाणावा बुडाला । येक साहेब नस्तां कोणाला । मुशारा मागावा ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सृष्टिक्रमनिरूपणनाम समास षष्ठ ॥ ६ ॥

याच न्यायानें संहाराचा विचार करावा, व तो करितांना ‘ जें जें जेथून निर्माण जालें । तें तें तेथेंच निमालें ’ हें तत्त्व लक्षांत ठेवावें. सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व लय–तीनही अवस्थांत शाश्वत स्वरूप अखंड आहे. तें सार, बाकीची माया असार, असा सारासारविवेक जागृत असावा. आदिमध्यावसानीं जें निरंजन शाश्वत परब्रह्म तेथें जाणत्यानें अनुसंधान ठेवावें. त्यालाच कोणी द्रष्टा, साक्षी, अंतरात्मा असें म्हणतात, पण साक्षित्वाची अवस्था आहे व ब्रह्म अवस्थातीत आहे हें प्रत्ययानें पाहावें. सृष्टिरचना मूळमायेंत होते व जाते, ती तगत नाहीं. ब्रह्म पलीकडे आहे. मूळमायेपासून शेवट–(स्थूला) पर्यंत सारा मायेचा विस्तार (भरोवरी) आहे. नानाविद्या, कलाकौशल्य सर्व मायेंतलें होय. जो उपाधि प्रांत गांठील त्याला सृष्टिरचना हा भ्रम वाटेल, जो उपाधींत भ्रमांत अडकेल त्याला सोडविणारा कोण आहे? हें अनुमानाचें कार्य नाहीं, विवेक-विचारानेंच ब्रह्मपद पावायचें असतें. ब्रह्मांडींचा महाकारण देह ती मूळमाया. ती अपूर्ण आहे, तिला अविवेकी ब्रह्म म्हणतात. सृष्टींत कांहीं नृपासन भोगणारे आहेत व कांहीं विष्ठा सावडणारे आहेत, असे अनेक लोक आहेत व सारेच आपणांस थोर म्हणवितात, पण विवेकीजन यथार्थ जाणतात. विवेकानें पूर्णब्रह्म पावावें. बहुतांच्या (मूढांच्या) नादीं लागून संसार नासूं नये, आपल्या प्रत्ययानें घ्यावें. पुस्तकें वाचून आत्मनिश्चय होता तर गुरूची गरज नव्हती, म्हणून गुरुमुखानें सृष्टिक्रमाची (उभारणी–संहारणीची) कथा समजून घ्यावी व स्वतःच्या प्रत्ययानें विवरावी. बहुतांच्या बोलीं लागून प्राणी निःसंशय बुडेल. म्हणून गुरुविश्वासानें जावें. एक धणी केला नाहीं तर पगार (मुशाहिरा) कोणापाशीं मागतां येईल ? (१८–३१) [द० १२, स० ६]

॥ श्रीराम ॥ न्यायें निष्ठुर बोलणें । बहुतांस वाटे कंटाळवाणें । मळमळ करितां जेवणें । विहित नव्हे ॥ १ ॥ बहुतीं विषय निंदिले । आणि तेचि सेवित गेले । विषयत्यागें देह चाले । हें तों घडेना ॥ २ ॥ बोलणें येक चालणें येक । त्याचें नांव हीनविवेक । येणें करितां सकळ लोक । हांसों लागती ॥ ३ ॥ विषयत्यागेंविण तों कांहीं । परलोक तो प्राप्त नाहीं । ऐसें बोलणें ठाईं ठाईं । बरें पाहा ॥ ४ ॥ प्रपंची खाती जेविती । परमार्थी काय उपवास करिती । उभयतां सारिखे दिसती । विषयाविषईं ॥ ५ ॥ देह चालतां विषय त्यागी । ऐसा कोण आहे जगीं । याचा निर्वाह मजलागीं । देवें निरोपावा ॥ ६ ॥ विषय अवघाचि त्यागावा । तरीच परमार्थ करावा । ऐसें पाहातां गोवा । दिसतो कीं ॥ ७ ॥ ऐसा श्रोता अनुवादला । वक्ता उत्तर देता जाला । सावध होऊन मन घाला । येतद्विषईं ॥ ८ ॥ वैराग्यें करावा त्याग । तरीच परमार्थयोग । प्रपंचत्यागें सर्व सांग । परमार्थ घडे ॥ ९ ॥ मागें ज्ञानी होऊन गेले । तेंहीं बहुत कष्ट केले । तरी मग विख्यात जाले । भूमंडळीं ॥ १० ॥ येरें मत्सर करितांच गेलीं । अन्न अन्न म्हणतां मिटकलीं । कितीयेक भ्रष्टलीं । पोटासाठीं ॥ ११ ॥ वैराग्य मुळींहून नाहीं । ज्ञान प्रत्ययाचें नाहीं । शुचि आचार तोही नाहीं । भजन कैंचें ॥ १२ ॥ ऐसें प्रकारींचे जन । आपणांस म्हणती सज्जन । पाहों जातां अनुमान । अवघाच दिसे ॥ १३ ॥ जयास नाहीं अनुताप । हेंचि येक पूर्वपाप । क्षणक्षणां विक्षेप । पराधीकपणें ॥ १४ ॥ मज नाहीं तुज साजेना । हें तों अवघे ठाउकें आहे जना । खात्यास नखातें देखों सकेना । ऐसें आहे ॥ १५ ॥ भाग्यपुरुष थोर थोर । त्यास निंदिती

प्रश्नः—जो उठतो तो विषयांची निंदा करीत सुटतो, आणि विषय कांहीं कोणी सोडीत नाहीं याबद्दल मला स्पष्ट विचारायचें आहे. न्यायनिष्ठुर बोलणें बहुतेकांस कंटाळवाणें वाटतें, पण मळमळ ठेवूं कशाला ? जेवायचें तर खुल्या मनानें जेवावें. विषयांची निंदा करावी, आणि विषय कांहीं सोडूं नयेत हा मिळमिळितपणा चांगला नाहीं. प्रपंची लोकांसारखेच परमार्थीही खातात, जेवतात, सर्व विषय भोगतात आणि पुन्हां आपली विषयांची निंदा करीत सुटतात. देह चालतां विषयत्यागी असा कोण आहे ? सर्वस्वीं विषयत्याग केल्याशिवाय परमार्थ साधायचा नाहीं असें असेल तर विषय सुटायला नकोत व परमार्थ साधायला नको ! (१–७) उत्तरः—वैराग्यपूर्वक विषयांचा त्याग करावा तरच परमार्थाचा लाभ होतो. प्रपंचत्याग केल्यानें सांग परमार्थ घडतो हें म्हणणें सर्वस्वीं खरें आहे, मोठमोठे ज्ञानी कष्ट केल्यानेंच विख्यात झाले आहेत (८–१०). अशा श्रेष्ठांचा कित्येक अन्नार्थी व पोटार्थी मत्सर करीत असतात. मूळमायेपासून तों सकल चराचर सृष्टीपर्यंत वैराग्य नाहीं, अनुभवाचें ज्ञान नाहीं, शुद्ध आचार व भजन नाहीं, असे हे लोक आपणांला सज्जन म्हणवितात, पण त्यांच्या-पाशीं अनुमानिक ज्ञानाशिवाय कांहीं नसतें. त्यांना खरा अनुताप नसतो. अनुताप नसणें हें त्यांच्या पूर्वपापाचें द्योतक आहे, वैराग्य व अनुताप नसल्यामुळें त्यांना परोत्कर्ष सहन होत नाहीं. मला नाहीं तर तुलाही नाहीं हा जनस्वभावच आहे. खात्यास (श्रीमंतास) न खाते (भिकारी) नांवें ठेवतात, त्यांना दुसऱ्यांचें कांहीं पाहवत नाहीं. भाग्यवंताची दिवाळखोर निंदा करितात, सावास देखोन चोर चरफडतात. मत्सरी लोकांनीं विरक्तांची निंदा व वैराग्याची टवाळी केली

दिवाळखोर । सावास देखतां चोर । चर्फडी जैसा ॥ १६ ॥ वैराग्यापरतें नाहीं भाग्य । वैराग्य नाहीं तें अभाग्य । वैराग्य नस्तां योग्य । परमार्थ नव्हे ॥ १७ ॥ प्रत्ययज्ञानीं वीतरागी । विवेकबळें सकळ त्यागी । तो जाणीजे महायोगी । ईश्वरी पुरुष ॥ १८ ॥ अष्टमा सिद्धींची उपेक्षा । करून घेतली योगदीक्षा । घरोघरीं मागे भिक्षा । महादेव ॥ १९ ॥ ईश्वराची बरोबरी । कैसा करील वेषधारी । म्हणोनियां सगट सरी । होत नाहीं ॥ २० ॥ उदास आणी विवेक । त्यास शोधिती सकळ लोक । जैसें लालची मूर्ख रंक । तें दैन्यवाणें ॥ २१ ॥ जे आचारापासून चेवले । जे विचारापासून भ्रष्टले । विवेक करूं विसरले । विषयलोभी ॥ २२ ॥ भजन तरी आवडेना । पुरश्चरण कदापि घडेना । भल्यांस त्यांस पडेना । येतन्निमित्य ॥ २३ ॥ वैराग्यें करून भ्रष्टेना । ज्ञान भजन सांडीना । व्युत्पन्न आणि वाद घेना । ऐसा थोडा ॥ २४ ॥ कष्ट करितां सेत पिके । उंच वस्त तत्काळ विके । जाणत्या लोकांच्या कौतुकें । उड्या पडती ॥ २५ ॥ येर ते अवघेचि मंदले । दुराशेनें खोटे जाले । कानकोंडें ज्ञान केलें । भ्रष्टाकारें ॥ २६ ॥ सबळ विषय त्यागणें । शुद्ध कार्याकारण घेणें । विषयत्यागाचीं लक्षणें । वोळखा ऐसीं ॥ २७ ॥ सकळ कांहीं कर्ता देव । नाहीं प्रकृतीचा ठाव । विवेकाचा अभिप्राव । विवेकी जाणती ॥ २८ ॥ शूरत्वविषईं खडतर । त्यास मानिती लहानथोर । कामगार आणि आंगचोर । येक कैसा ॥ २९ ॥ त्यागात्याग तार्किक जाणे । बोलाऐसें चालों जाणे । पिंडब्रह्मांड सकळ जाणे ।

म्हणून काय होणार आहे ? (११–१६) वैराग्यभाग्याहून श्रेष्ठ भाग्य नाहीं. वैराग्य नाहीं, तो अभागी (करंटा) होय. अंगीं वैराग्य असल्यावांचून कोणालाही परमार्थाची योग्यताच येत नाहीं. प्रत्ययाचें ज्ञान असलेला विरक्त पुरुष विवेकबळानें सर्वस्वत्याग करणारा झाला तर तो महायोगी ईश्वरी पुरुषच होय. अशा योग्यांचे मुकुटमणि म्हणजे अष्टमहासिद्धींची उपेक्षा करून योगदीक्षा घेणारे व घरोघर भिक्षा मागणारे भगवान् शंकर होत. ईश्वराची बरोबरी नुस्ता बाह्यवेषधारी कसा करूं शकेल ? म्हणून सार–गार एक करूं नये. उदास (विरक्त) व विवेकी पुरुष असतात त्यांना सर्व लोक शोधीत येतात, विषयांचे लालची दीन मूर्ख त्यांना कोण विचारतो ? (१७–२१) आचारविचारांपासून चेवलेले भ्रष्ट, विषयलोभी, अविवेकी लोक–कीं ज्यांना भजन आवडत नाहीं, पुरश्चरण घडत नाहीं. त्यांचें व भल्यांचें न पटल्यास नवल काय ! वैराग्यसंपन्न असून ज्यांचा आचार सुटला नाहीं, ज्ञानी असून ज्यांचे भजन (सगुणभक्ति) सुटलें नाहीं, व्युत्पन्न असून जे वाद करीत नाहींत असे पुरुष दुर्मिळ होत. कष्ट, मेहनत व मशागत केल्यानें शेत पिकतें. उत्तम वस्तु बाजारांत आली कीं तात्काळ विकली जाते, तिच्यावर जाणत्या लोकांच्या उड्या पडतात. बाकीचे सामान्य जीव रखडत बसतात, कां कीं ते दुराशेचे गुलाम होऊन आचारभ्रष्टतेमुळ त्यांचें ज्ञान, कानकोंडें झालेलें असतें (२२–२६). अशुद्ध शास्त्रनिषिद्ध (सबळ) विषयांचा सर्वस्वी त्याग करणें व शुद्ध विषय कार्याकारण सेवणें हें विषयत्यागाचें लक्षण होय (२७). विषयांविषयीं ज्यांचें वैराग्य प्रखर (खडतर) आहे अशा शूर वीरांना लहान थोर मानतात. कार्यकर्ते व चुकारतट्टु एक कसे होतील ? त्याग कोणता, कशाचा व कसा करायाचा, व अत्याग म्हणजे काय हे विवेककुशल (तार्किक) जाणतात. तेच बोलण्यासारखेच चालतात,

यथायोग्य ॥ ३० ॥ ऐसा जो सर्वजाणता । उत्तमलक्षणी पुरता । तयाचेनि सार्थकता । सहजचि होय ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विषयत्यागनिरूपणनाम समास सप्तम ॥ ७ ॥

॥ श्रीराम ॥ मूळमाया जगदीश्वर । पुढें अष्टधेचा विस्तार । सृष्टिक्रमें आकार । आकारला ॥ १ ॥ हें अवघेंच नस्तां निर्मळ । जैसें गगन अंतराळ । निराकारीं काळवेळ । कांहींच नाहीं ॥ २ ॥ उपाधीचा विस्तार जाला । येथें काळ दिसोन आला । येरवीं पाहातां काळाला । ठावचि नाहीं ॥ ३ ॥ येक चंचळ येक निश्चळ । यावेगळा कोठें काळ । चंचळ आहे तावत्काळ । काळ म्हणावें ॥ ४ ॥ आकाश म्हणिजे अवकाश । अवकाश बोलिजे विलंबास । त्या विलंबरूप काळास । जाणोनि घ्यावें ॥ ५ ॥ सूर्याकरितां विलंब कळे । गणना सकळांची आकळे । पळापासून निवळे । युगपरियंत ॥ ६ ॥ पळ घटिका प्रहर दिवस । अहोरात्र पक्ष मास । षड्मास वरि युगास । ठाव जाला ॥ ७ ॥ कृत त्रेत द्वापार कळी । संख्या चालिली भूमंडळीं । देवांचीं अयुष्यें आगळीं । शास्त्रीं निरोपिलीं ॥ ८ ॥ ते देवत्रयाची खटपट । सूक्ष्मरूपें विलगट । दंडक सांडितां चटपट । लोकांस होते ॥ ९ ॥ मिश्रित त्रिगुण निवडेना । तेणें आद्यंत सृष्टिरचना । कोण थोर कोण साना । कैसा म्हणावा ॥ १० ॥ असो हीं जाणत्याचीं कामें । नेणता उगाच गुंते भ्रमें । प्रत्ययें जाणजाणों वर्में । ठाईं पाडावीं ॥ ११ ॥ उत्पन्नकाळ सृष्टिकाळ । स्थितिकाळ संव्हारकाळ । आद्यंत अवघा काळ । विलंबरूपी ॥ १२ ॥ जें जें जये प्रसंगीं जालें । तें तें

पिंडब्रह्मांड सर्व कांहीं जाणतात. असा जो सर्वज्ञ, उत्तम गुणांनीं पूर्ण असतो त्याच्या योगानें सहजच सार्थकता प्राप्त होते (२८–३१). [द० १२, स० ७]

मूळमाया जगदीश्वर, तेथून अष्टधाप्रकृतीचा विस्तार होऊन क्रमानें सृष्टीची उभारणी झाली. गगनाप्रमाणें निराकार जें ब्रह्म तेथें काळवेळ कांहीं नाहीं, उपाधीचा विस्तार झाला त्यांत काळाची सत्ता दिसून आली. चंचळ आहे तोंवर काळाची कल्पना. आकाश = अवकाश = विलंब = काळ (१–५). सूर्यासाठीं पळापासून युगापर्यंतचा काळ गणतात. पळ, घटका, प्रहर, दिवस, अहोरात्र, पक्ष, मास, षण्मास, वर्ष, युग–हा मनुष्याच्या गणिताचा काळ ; त्याप्रमाणेंच कृत, त्रेता, द्वापार, कलि हा एक कालगणनेचा प्रकार ; देवादिकांचीं आयुष्यें वगैरे पुष्कळ आहेत. ब्रह्मादि तीन देवांचे उत्पत्त्यादि जे खेळ चालले आहेत ते सूक्ष्मरीतीनें सर्व जीवांच्या ठिकाणींही चालू आहेत. पण जीव, नीती, न्याय (दंडक) सोडतात म्हणून दुःख पावतात. तीन गुण इतके मिश्रित आहेत कीं ते वेगळे करितां येत नाहींत. आद्यंत सृष्टिरचना अशीच मिश्रगुणांची आहे, म्हणून त्यांत कोणाला थोर व कोणाला लहान म्हणावें ? असो. हीं जाणत्यांचीं कामें आहेत. नेणता उगाच भ्रमांत पडतो. अनुभवानें वर्में तेवढीं जाणावीं. उत्पत्तिकाळ, स्थितिकाळ, संहारकाळ, तसेंच सहा ऋतूंचे काळ, सुखदुःखानंदकाळ, प्रातः-

काळाचें नांव पडिलें। बरें नसेल अनुमानलें। तरी पुढें ऐका ॥ १३ ॥ पर्जन्यकाळ शीतकाळ। उष्णकाळ संतोषकाळ। सुखदुःखआनंदकाळ। प्रत्ययो येतो ॥ १४ ॥ प्रातःकाळ मध्यानकाळ। सायंकाळ वसंतकाळ। पर्वकाळ कठिणकाळ। जाणिजे लोकीं ॥ १५ ॥ जन्मकाळ बाळत्वकाळ। तारुण्यकाळ वृधाप्यकाळ। अंतकाळ विषमकाळ। वेळरूपें ॥ १६ ॥ सुकाळ आणि दुष्काळ। प्रदोषकाळ पुण्यकाळ। सकळवेळा मिळोन काळ। तयास म्हणावें ॥ १७ ॥ असतें येक वाटतें येक। त्याचें नांव हीन विवेक। नाना प्रवृत्तीचे लोक। प्रवृत्ति जाणती ॥ १८ ॥ प्रवृत्ति चाले अधोमुखें। निवृति धांवे ऊर्ध्वमुखें। ऊर्ध्वमुखें नाना सुखें। विवेकी जाणती ॥ १९ ॥ ब्रह्मांडरचना जेथून जाली। तेथें विवेकी दृष्टि घाली। विवरतां विवरतां लाधली। पूर्वापर स्थिति ॥ २० ॥ प्रपंचीं असोन परमार्थ पाहे। तोचि ये स्थितीतें लाहे। प्रारब्धयोगें करून राहे। लोकांमध्यें ॥ २१ ॥ सकळांचें येकचि मूळ। येक जाणते येक बाष्कळ। विवेकें करून तत्काळ। परलोक साधावा ॥ २२ ॥ तरीच जन्माचें सार्थक। भले पाहाती उभय लोक। कारण मुळींचा विवेक। पाहिला पाहिजे ॥ २३ ॥ विवेकहीन जे जन। ते जाणावे पशुसमान। त्यांचें ऐकतां भाषण। परलोक कैंचा ॥ २४ ॥ बरें आमचें काये गेलें। जें केलें तें फळास आलें। पेरिलें तें उगवलें। भोगिती आतां ॥ २५ ॥ पुढेंहि करी तो पावे। भक्तियोगें भगवंत फावे। देव भक्त मिळतां दुणावे। समाधान ॥ २६ ॥ कीर्ति करून नाहीं मेले। ते उगेच आले आणि गेले। शाहाणे होऊन भुलले। काय सांगावें ॥ २७ ॥ येथील येथें अवघेंचि राहातें। ऐसें प्रत्ययास येतें। कोण काये घेऊन जातें।

काळ, मध्याह्नकाळ, सायंकाळ, पर्वकाळ, कठिणकाळ, बाल्यतारुण्यादि दशांचे काळ, सुकाळ आणि दुष्काळ, अंतकाळ, विषमकाळ– ‘ सकळ वेळा मिळोन काळ। तयास म्हणावें ’(६–१७). असतें एक व वाटतें एक याचें नांव हीनविवेक. प्रवृत्तीचे लोक असे अविचारी असतात म्हणून त्यांना प्रवृत्ति अधोमुख चालली आहे हें कळत नाहीं. विवेकी लोक हें जाणतात. निवृत्ति ऊर्ध्वमुख परमसुखदायक आहे हें ते जाणतात. विवेकी नर मूळ जें ऊर्ध्वमुख आहे तिकडे म्ह० ब्रह्मांडरचना जेथून झाली तेथें दृष्टि ठेवतात, व विवरतां विवरतां उगमाजवळ जातात. प्रपंचांत राहून जो परमार्थ पाहतो त्यालाही ही स्थिति मिळते. प्रारब्धामुळें लोकांत राहतो, व बाकी तो लोकांवेगळाच असतो. सर्वांचें मूळ एकच आहे, तथापि लोकांत कांहीं जाणते व कांहीं बाष्कळ असतात. विवेकानें तत्काळ परलोक (उगम) साधावा. भले उभय लोक साधतात. त्यांच्या जन्माचें सार्थक होतें, कां कीं ते मुळींचा विवेक पाहतात. अविवेकी जन पशुतुल्यच, त्यांच्या संगतींत परलोक नाहीं. आमचें कांहीं जात नाहीं. पेरिलें तें उगवतें, करावें तें भरावें हा न्यायच आहे. भक्ति केली तर देव मिळतो, देव व भक्त एक होतां समाधान वाढतें. जन्मास आल्यासरसी कीर्ति मागें न ठेवतां मरूं नये, शहाणे मिथ्या प्रवृत्तीला भुलून राहतात हें नवल आहे. सर्व येथल्या येथेंच राहतें, कोणी येथलें बरोबर कांहीं नेत नाहीं हा तर अनुभव आहे ना? म्हणून पदार्थांविषयीं

सांगाना कां ॥ २८ ॥ पदार्थीं असावें उदास । विवेक पाहावा विशेष सावकास । येणें करितां जगदीश । अलभ्य लाभे ॥ २९ ॥ जगदीशापरता लाभ नाहीं । कार्याकारण सर्व कांहीं । संसार करित असतांही । समाधान ॥ ३० ॥ मागां होते जनकादिक । राज्य करितांहि अनेक । तैसेचि आतां पुण्यश्लोक । कित्येक असती ॥ ३१ ॥ राजा असतां मृत्य आला । लक्ष कोटी कबुल जाला । तरी सोडिना तयाला । मृत्य कांहीं ॥ ३२ ॥ ऐसें हें पराधेन जिणें । यामध्यें दुखणें बाहाणें । नाना उद्वेग चिंता करणें । किती म्हणोनी ॥ ३३ ॥ हाट भरला संसाराचा । नफा पाहावा देवाचा । तरीच कांहीं या कष्टाचा । परियाये होतो ॥ ३४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे काळरूपनाम समास अष्टम ॥ ८ ॥

॥ श्रीराम ॥ दुर्बळ नाचारी वोडगस्त । आळसी खादाड रिणगस्त । मूर्खपणें अवघें वेस्त । कांहींच नाहीं ॥ १ ॥ खाया नाहीं जेवाया नाहीं । ल्याया नाहीं नेसाया नाहीं । अंथराया नाहीं पांघराया नाहीं । कोंपट नाहीं अभागी ॥ २ ॥ सोयरे नाहीं धायेरे नाहीं । इष्ट नाहीं मित्र नाहीं । पाहातां कोठें ओळखी नाहीं । आश्रयेंविण परदेसी ॥ ३ ॥ तेणें कैसें करावें । काय जीवेसीं धरावें । वांचावें कीं मरावें । कोण्या प्रकारें ॥ ४ ॥ ऐसें कोणीयेकें पुसिलें । कोणीयेकें उत्तर दिधलें । श्रोतीं सावध ऐकिलें । पाहिजे आतां ॥ ५ ॥ लहानथोर काम कांहीं । केल्यावेगळें होत नाहीं । करंट्या सावध पाहीं । सदेव होसी ॥ ६ ॥ अंतरीं नाहीं सावधानता । येत्न ठाकेना पुरता ।

उदास असावें व पदार्थांवेगळा जो परमात्मा त्याचा विवेक पहावा म्हणजे त्याचा लाभ होतो. परमात्मलाभापेक्षां अपर लाभ नाहीं, सर्व कांहीं इहलोकीं कार्याकारण मिळालेलें येथल्या येथेंच राहतें, हें जाणून संसार करीत असला तरी जीवास समाधान होतें. मागें जनकादिक राज्य करीत असतांही परमात्मसुख भोगीत होते, आतांही असे पुण्यश्लोक आहेत. (या ओंवीचा संबंध शिवाजी महाराजांकडे आहे काय ?). मृत्यु आला असतां लक्षावधि रुपये देऊं करणाऱ्या राजालाही मृत्यु सोडीत नाहीं. दुखणींबाणीं, उद्वेग, चिंता, मृत्यु या सर्वांमुळें जिणे कालवश म्ह. पराधीन आहे असेंच ठरतें. हा संसाराचा बाजार (हाट) भरला आहे यांत देवाचा नफा पहावा; देवाची जोड झाल्यानें संसारक्लेशांचा परिहार होतो (१८–३४). [द० १२, स० ८]

प्रश्नः— दुर्बळ, अनाचारी, ओडगस्त, आळशी, खादाड, कर्जबाजारी, मूर्खपणानें सर्व गमावून बसलेला, जवळ कांहींच उरलें नाहीं असा कोणी एक माणूस आहे. त्याच्याजवळ खायला अन्न नाहीं, अंगावर घ्यायला वस्त्र नाहीं, अंथरूण पांघरूण नाहीं, बसावयास कोंपट नाहीं असा तो पूर्ण करंटा आहे. सोयरेधायरे इष्टमित्र त्याला कोणीच नाहींत, कोणाची ओळख नाहीं, निराश्रित परदेशी आहे. त्यानें काय करावें ? हृदयीं काय धरावें ? जगावें का मरावें ? व तें कोणत्या प्रकारें (१–४). असा कोणीएकानें प्रश्न केला व त्याला कोणीएकानें उत्तर दिलें. उत्तरः—लहानमोठें काम नाहीं, केल्यावांचून होत नाहीं, करंट्या ! लहानथोर न म्हणतां काम करावयास लाग म्हणजे तुझेंही नशीब उघडेल. जो अंतरीं सावध नाहीं व

सुखसंतोषाची वार्ता । तेथें कैंची ॥ ७ ॥ म्हणोन आळस सोडावा । येत्न साक्षेपें जोडावा । दुश्चितपणाचा मोडावा । थारा बळें ॥ ८ ॥ प्रातःकाळीं उठत जावें । प्रातःस्मरामि करावें । नित्य नेमें स्मरावें । पाठांतर ॥ ९ ॥ मागील उजळणी पुढें पाठ । नेम धरावा निकट । बाष्कळपणाची वटवट । करूं नये ॥ १० ॥ दिशेकडे दुरी जावें । शुचिष्मंत होऊन यावें । येतां कांहीं तरी आणावें । रितें खोटें ॥ ११ ॥ धूतवस्त्रें घालावीं पिळून । करावें चरणक्षाळण । देवदर्शन देवार्चन । यथासांग ॥ १२ ॥ कांहीं फळाहार घ्यावा । पुढें वेवसाय करावा । लोक आपला परावा । म्हणत जावें ॥ १३ ॥ सुंदर अक्षर ल्याहावें । पष्ट नेमस्त वाचावें । विवरविवरों जाणावें । अर्थांतर ॥ १४ ॥ नेमस्त नेटकें पुसावें । विशद करून सांगावें । प्रत्ययेंविण बोलावें । तेंचि पाप ॥ १५ ॥ सावधानता असावी । नीतिमर्यादा राखावी । जनास माने ऐसी करावी । क्रियासिद्धि ॥ १६ ॥ आलियाचें समाधान । हरिकथा निरूपण । सर्वदा प्रसंग पाहोन । वर्तत जावें ॥ १७ ॥ ताळ धाटी मुद्रा शुद्ध । अर्थप्रमेय अन्वय शुद्ध । गद्यपद्यें दृष्टांत शुद्ध । अन्वयाचे ॥ १८ ॥ गाणें वाजवणें नाचणें । हस्तन्यास दाखवणें । सभारंजकें वचनें । आडकथा छंदबंद ॥ १९ ॥ बहुतांचें समाधान राखावें । बहुतांस मानेल तें बोलावें । विरंग पडों नेदावें । कथेमध्यें ॥ २० ॥ लोकांस उदंड वाजी आणूं नये । लोकांचें उकलावें हृदय । तरी मग स्वभावें होय । नामघोष ॥ २१ ॥ भक्ति ज्ञान वैराग्य योग । नाना साधनांचे प्रयोग । जेणें तुटे भवरोग । मननमात्रें ॥ २२ ॥ जैसें

पुरा प्रयत्न करीत नाहीं त्याला सुखसंतोष कोठून मिळणार ! म्हणून आळस व दुश्चितपणा सोडून झटून प्रयत्न करावा (५-८). आतां काय करावें तें सांगतों. प्रातःकाळीं उठावें, प्रातःस्मरण करून नित्यनेमाचें पाठांतर करावें. मागील उजळणी करून पुढें पाठ करीत जावें. बाष्कळपणाचीं भाषणें करूं नयेत. शौचादि देहधर्म सारावयास गांवाबाहेर लांब जावें. स्नानाचमनादि करून शुद्ध होऊन यावें, पण येतांना कांहीं तरीं घेऊन यावें, रिकाम्या हातानें येऊं नये. धूतवस्त्रें पिळून वाळत घालावीं, हातपाय धुवावे व देवदर्शन, देवपूजन यथाशास्त्र संपूर्ण करावें. थोडा फराळ करून आपल्या उद्योगाला लागावें. परक्या माणसांना आपलेसें करून घ्यावें हें मुख्य सूत्र ध्यानीं धरून व्यवसाय करावा. सुंदर अक्षर लिहावें, स्पष्ट सावकाश वाचावें, मनन करकरून सगळा अर्थ जाणून घ्यावा. कोणाला कांहीं विचारावयाचें असल्यास योग्य रीतीनें बरवे-पणानें पुसावें, कोणीं विचारल्यास स्पष्ट प्रांजळ सांगावें, अनुभवावांचून कांहींही बोलणें पाप आहे असें मानावें. सर्व सावध असावें, नीतिन्याय राखावा, लोकांस मानेल असें वागून दाखवावें (कर्म सिद्धीस नेऊन दाखवावें) म्ह० अपेशी असें म्हणून घेऊं नये. जो कोणी येईल त्याचें समाधान करावें, हरिकथा निरूपण करावें. सर्वकाळीं प्रसंग पाहून वागावें (९-१७). ताल, छंद, हावभाव सर्व निर्मळ असावें. श्लोकार्थ, सिद्धांत व अन्वय बिनचूक सांगावें. गद्यपद्यांतील सुंदर प्रत्ययाचे दृष्टांत द्यावे. गाणें, वजावणें, हावभावांसहित भाषण, मनोरंजक वचनें, उपकथा, विविधछंदांतील पद्यें—हीं सर्व अशा चातुर्यानें उपयोजावीं कीं बहुतेकांस संतोष वाटावा. बहुतांस मानेल तें बोलावें, कथेंत बेरंग होऊं देऊं नये, फार कंटाळा येईल असें बोलूं नये. जनांचीं हृदयें उकलून लोक सहज स्फूर्तीनें नामघोष करितील असें बोलावें. बोलण्यांत भक्तिज्ञानवैराग्ययोग व अनेक साधनांचे मार्ग विशद करून सांगावे, कीं त्या श्रवणाच्या मननानें

बोलणें बोलावें । तैसेंचि चालणें चालावें । मग महंतलीळा स्वभावें । आंगीं बाणे ॥ २३ ॥ युक्तिवीण साजिरा योग । तो दुराशेचा रोग । संगतीच्या लोकांचा भोग । उभा ठेला ॥ २४ ॥ ऐसें न करावें सर्वथा । जनांस पाववूं नये व्यथा । हृदईं चिंतावें समर्था । रघुनाथासी ॥ २५ ॥ उदासवृत्तीस मानवे जन । विशेष कथानिरूपण । रामकथा ब्रह्मांड भेदून । पैलाड न्यावी ॥ २६ ॥ सांग महंती संगीत गाणें । तेथें वैभवास काय उणें । नभामाजी तारांगणें । तैसे लोक ॥ २७ ॥ आकलबंद नाहीं जेथें । अवघेंचि विस्कळित तेथें । येकें आकलेविण तें । काय आहे ॥ २८ ॥ घालून अकलेचा पवाड । व्हावें ब्रह्मांडाहून जाड । तेथें कैचें आणिलें द्राड । करंटपण ॥ २९ ॥ येथें आशंका फिटली । बुद्धि येत्नीं प्रवेशली । कांहींयेक आशा वाढली । अंतःकरणीं ॥३०॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे येत्नासिकवणनाम समास नवम ॥९॥

॥ श्रीराम ॥ आपण यथेष्ट जेवणें । उरलें तें अन्न वाटणें । परंतु वायां दवडणें । हा धर्म नव्हे ॥ १ ॥ तैसें ज्ञानें तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जनास सांगावे । तरतेन बुडों नेदावें । बुडतयासी ॥ २ ॥ उत्तम गुण स्वयें घ्यावे । ते बहुतांस सांगावें । वर्तल्याविण बोलावे । ते शब्द मिथ्या ॥ ३ ॥ स्नान संध्या देवार्चन । येकाग्र करावें जपध्यान । हरिकथा निरूपण । केलें पाहिजे ॥ ४ ॥ शरीर परोपकारीं लावावें । बहुतांच्या कार्यास यावें । उणें पडों नेदावें । कोणियेकाचें ॥ ५ ॥ आडलें जाकसलें जाणावें । यथानशक्ति कामास यावें । मृदवचनें बोलत जावें । कोणीयेकासीं ॥ ६ ॥ दुसऱ्याच्या

भवरोग निवारण व्हावे. स्वतः आपण बोलण्यासारखें चालावें म्हणजे महंतलीला सहज अंगीं बाणतात. युक्तीवांचून (जीवपरमात्मसंयोगावांचून) योग म्हणजे ती दुराशेची पोथी होय, संगतीच्या लोकांचा त्यानें भोग मात्र ओढवतो (अभेदभक्ति म्ह. युक्ति दुराशा म्ह. लोभ). असें करूं नये. जनांवर ओझें घालून त्यांना त्रास देऊं नये. चित्तांत रामस्मरण ठेवावें. उदासवृत्ती (निरपेक्ष निर्दंभ वागणें) लोकांना आवडतें. विशेषेंकरून अध्यात्मनिरूपण करावें व श्रीरामकथेनें ब्रह्मांड भेदावें. महंतांचीं सर्व लक्षणें अंगांत असून त्यांना गायनविद्येची जोड असेल तर मग वैभवास कमी कांहींच नाहीं. अशा पुरुषाभोंवतीं आकाशांतल्या ताऱ्यांप्रमाणें असंख्य लोक गोळा होतील. पण बुद्धि मोठी पाहिजे. अकलेवांचून कोणाला काय साधायचें आहे. जेथें अकलेचा बंद नाहीं तेथें साराच गोंधळ. अकलेवांचून गुण असून माणूस वायां जातो. म्हणून अकलेचा तणावा मोठा असावा व ब्रह्मांस पोटांत घेऊन त्यापेक्षां मोठें व्हावें, म्हणजे करंटेपणा कोठें राहील ? (१८–२९) शंकेचें निरसन झालें .बुद्धि प्रयत्नशील झाली, श्रोत्यांच्या मनांत कर्तृत्वाचा उत्साह भरला (३०). [द० १२, स० ९]

आपण पोटभर जेवावें व उरलेलें अन्न लोकांस वांटावें, पण तें वायां दवडूं नये. त्याप्रमाणें आपण ज्ञानसमाधान पावावें व तेंच ज्ञान जनांस द्यावें. पोहणारानें बुडत्यांना बुडूं देऊं नये. सर्वांचे उत्तम गुण घ्यावे, तेच घेण्यास लोकांस सांगावें. स्वतः बोलण्याप्रमाणें चालावें नाहीं तर बोलणें फोल होतें. स्नानसंध्या, देवपूजा, जपध्यान, कीर्तननिरूपण हें श्रद्धेनें करावें, शरीर परोपकारांत झिजवावें, अनेकांच्या उपयोगी पडावें, कोणाचेंही उणें राहूं देऊं नये. आडलेंगांजलें (जाकसलें) जाणावें, यथाशक्ति उपयोगी पडावें, सर्वांशीं मधुर बोलावें. परदुःखानें दुःखी व्हावें, परसुखानें सुखी व्हावें, गोड बोलून

दुःखें दुखवावें । परसंतोषें सुखी व्हावें । प्राणिमात्रांस मेळवून घ्यावें । बऱ्या शब्दें ॥ ७ ॥ बहुतांचे अन्याय क्षमावे । बहुतांचे कार्यभाग करावे । आपल्यापरीस व्हावे । परावे जन ॥ ८ ॥ दुसऱ्याचें अंतर जाणावें । तदनुसारचि वर्तावें । लोकांस परीक्षीत जावें । नाना प्रकारें ॥ ९ ॥ नेमकाचि बोलावें । तत्काळचि प्रतिवचन द्यावें । कदापि रागास न यावें । क्षमारूपें ॥ १० ॥ आलस्य अवघाच दवडावा । यत्न उदंडचि करावा । शब्दमत्सर न करावा । कोणीयेकाचा ॥ ११ ॥ उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा । शब्द निवडून बोलावा । सावधपणें करीत जावा । संसार आपला ॥ १२ ॥ मरणाचें स्मरण असावें । हरिभक्तीस सादर व्हावें । मरोन कीर्तीस उरवावें । येणें प्रकारें ॥ १३ ॥ नेमकपणें वर्तों लागला । तो बहुतांस कळों आला । सर्व आर्जवी तयाला । काय उणें ॥ १४ ॥ ऐसा उत्तम गुणी विशेष । तयास म्हणावें पुरुष । जयाच्या भजनें जगदीश । तृप्त होये ॥ १५ ॥ उदंड धिःकारून बोलती । तरी चळों नेदावी शांति । दुर्जनासी मिळोन जाती । धन्य ते साधु ॥ १६ ॥ उत्तम गुणीं शृंघारला । ज्ञानवैराग्यें शोभला । तोचि येक जाणावा भला । भूमंडळीं ॥ १७ ॥ स्वयें आपण कष्टावें । बहुतांचें सोसित जावें । झिजोन कीर्तीस उरवावें । नाना प्रकारें ॥ १८ ॥ कीर्ती पाहों जातां सुख नाहीं । सुख पाहातां कीर्ती नाहीं । विचारेंविण कोठेंचि नाहीं । समाधान ॥ १९ ॥ परांतरास न लावावा ढका । कदापि पडों नेदावा चुका । क्षमासीळ तयाच्या तुका । हानि नाहीं ॥ २० ॥ आपलें अथवा परावें । कार्य अवघेंच करावें । प्रसंगीं कामास चुकवावें । हें विहित नव्हे ॥ २१ ॥ बरें बोलतां सुख वाटतें । हें तों प्रत्यक्ष

प्राणिमात्रांना वश करून घ्यावें. दुसऱ्याच्या हातून आगळीक झाली तर क्षमा करावी, अनेकांचीं कामें करावीं, स्वजनांप्रमाणेंच परजनासही आपला वेध लावावा. दुसऱ्याच्या मनोगताप्रमाणें वागावें, नाना प्रकारें लोकांची परीक्षा करावी. थोडें व मुद्दयाचें बोलावें. उत्तर तत्काळ द्यावें, क्षमाशीलपणा धरून रागास येऊं नये. सारा आळस झाडून प्रपंच उद्योग करावा, कोणाचा शब्द-मत्सर करूं नये. उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा, विवंचून नेमका शब्द बोलावा, आपला संसार सावधपणानें करावा. मरणाचें स्मरण ठेवून हरिभजनीं तत्पर असावें. याप्रमाणें वागल्यास मरणोत्तरही नांव निघतें. नियमितपणें शिस्तीनें वागणारा लोकांस कळून आला कीं सर्व लोक त्याचें आर्जव करूं लागतात. त्याला काय उणें आहे ? असा उत्तम गुणांनीं युक्त तोच पुरुष खरा, त्याच्या भक्तीनें परमात्मा संतुष्ट होतो (१–१५). लोक पुष्कळ धिक्कार करून बोलले तरी शांति ढळूं देऊं नये. दुर्जनांत सुद्धां मिळून जातात ते साधु धन्य होत. उत्तमगुणालंकृत ज्ञानवैराग्यसंपन्न असा जो पुरुष तोच त्रैलोक्यांत धन्य होय. स्वतः कष्ट करावे, बहुतांचे सोसावे, अनेक प्रकारीं (काय-वाचा-मनानें) झिजून कीर्ति उरवावी. कीर्ति पाहतां सुख नाहीं सुख (आळसाचें !) पाहतां कीर्ति नाहीं, विवेकावांचून समाधान नाहीं. दुसऱ्याचें मन दुखवूं नये, यांत अगदीं चुकूं नये, क्षमाशील पुरुषाचें महत्त्व केव्हांही कमी होत नाहीं. आपलें असो, दुसऱ्याचें असो सर्व कार्य करावें, प्रसंगीं अंग चुकवणें अयोग्य होय. गोड बोललें कीं सुख वाटतें हा आपला अनुभव आहेच, आपल्यासारखेंच दुसऱ्यास मानावें. कठोर

कळतें । आत्मवत परावें तें । मानीत जावें ॥ २२ ॥ कठिन शब्दें वाईट वाटतें । हें तों प्रत्ययास येतें । तरी मग वाईट बोलावें तें । काय निमित्य ॥ २३ ॥ आपणास चिमोटा घेतला । तेणें कासावीस जाला । आपणावरून दुसऱ्याला । राखत जावें ॥ २४ ॥ जे दुसऱ्यास दुःखकरी । ते अपवित्र वैखरी । आपणास घात करी । कोणियेके प्रसंगीं ॥ २५ ॥ पेरिलें तें उगवतें । बोलण्या-सारिखें उत्तर येतें । तरी मग कर्कश बोलावें तें । काये निमित्य ॥ २६ ॥ आपल्या पुरुषार्थवैभवें । बहुतांस सुखी करावें । परंतु कष्टी करावें । हे राक्षसी क्रिया ॥ २७ ॥ दंभ दर्प अभिमान । क्रोध आणी कठिण वचन । हें अज्ञानाचें लक्षण । भगवद्गीतेंत बोलिलें ॥ २८ ॥ जो उत्तम गुणें शोभला । तोचि पुरुष महाभला । कित्येक लोक तयाला । शोधीत फिरती ॥ २९ ॥ क्रियेविण शब्दज्ञान । तेंचि श्वानाचें वमन । भले तेथें अवलोकन । कदापी न करिती ॥ ३० ॥ मनापासून भक्ति करणें । उत्तम गुण अगत्य धरणें । तया महापुरुषाकारणें । धुंडीत येती ॥ ३१ ॥ ऐसा जो महानुभाव । तेणें करावा समुदाव । भक्तियोगें देवाधिदेव । आपुला करावा ॥ ३२ ॥ आपण अवचित मरोन जावें । मग भजन कोणें करावें । याकारणें भजनास लावावे । बहुत लोक ॥ ३३ ॥ आमची प्रतिज्ञा ऐसी । कांहीं न मागावें शिष्यासी । आपणामागें जगदीशासी । भजत जावें ॥ ३४ ॥ याकारणें समुदाव । जाला पाहिजे महोत्साव । हातोपातीं देवाधिदेव । वोळेसा करावा ॥ ३५ ॥ आतां समुदायाकारणें । पाहिजेत दोनी लक्षणें । श्रोतीं येथें सावधपणें । मन घालावें ॥ ३६ ॥ जेणें बहुतांस घडे भक्ति ।

शब्दांनीं आपल्यालाही जर वाईट वाटतें तर आपणही दुसऱ्यास वाईट कां बोलावें ? आपल्याला कोणी चिमटा घेतला तर जीव कासावीस होतो ; आत्मवत् दुसऱ्याला पाहावें. दुसऱ्याचें अंतःकरण भेदणारी वाणी अपवित्र होय ; ती क्वचित् आपलाही घात करिते. पेरावें तेंच उगवतें, बोलावें तसेंच प्रत्युत्तर येतें, मग कर्कश काय म्हणून बोलावें ? आपल्या कर्तृत्वानें व वैभवानें बहुतांस सुखी करावें, पण उलट कष्टी करावें हें तर राक्षसी कर्म होय. दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, कठिण वचन हें अज्ञानाचें लक्षण आहे असें देव गीतेंत (अ. १६–४) बोलले आहेत. उत्तम गुणांच्या भल्या पुरुषाला लोक धुंडीत फिरतात. क्रियेवीण शब्दज्ञान तें कुत्र्याच्या वमनासारखें तुच्छ होय, भले लोक त्याकडे ढुंकूनही पाहत नाहींत (१६–३०). मनापासून देवाची भक्ति करितो, उत्तम गुण अवश्य घेतो अशा पुरुषाला लोक शोधीत फिरतात. अशा महापुरुषानें समुदाय करावा व भक्तियोगानें देवाधिदेव आपुलासा करावा. आपण मेल्यावर मग भजन कोण करील म्हणून जनसमुदाय भक्तिमार्गाला लावावा. आमची तर अशी प्रतिज्ञा आहे कीं शिष्यांपाशीं कांहीं मागायचें नाहीं, त्यांनीं फक्त आपल्यामागें भक्तिमार्ग चालवावा, याकरितां समुदाय व महोत्सव सुरू करून देव हातोपातीं बोलता होईल अशी उपासना वाढवावी (३१–३५). आतां समुदायासाठीं दोन लक्षणें सांगतों तीं ध्यानीं धरावीं (प्रबोधशक्ति व बोलण्याप्रमाणें क्रिया हीं होत). प्रबोधशक्तीच्या योगानें बहुत जन भक्तीला लागतात, तिच्या साह्यानें

ते हे रोकडी प्रबोधशक्ति । बहुतांचें मनोगत हातीं । घेतलें पाहिजे ॥ ३७ ॥ मागां बोलिले उत्तम गुण । तयास मानिती प्रमाण । प्रबोधशक्तिचें लक्षण । पुढें चाले ॥ ३८ ॥ बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करून बोलणें । तयाचीं वचनें प्रमाणें । मानिती जनीं ॥ ३९ ॥ जें जें जनास मानेना । तें तें जनहि मानीना । आपण येकला जन नाना । सृष्टीमध्यें ॥ ४० ॥ म्हणोन सांगाती असावे । मानत मानत शिकवावे । हळु हळु सेवटा न्यावे । विवेकानें ॥ ४१ ॥ परंतु हीं विवेकाचीं कामें । विवेकी करील नेमें । इतर ते बापुडे भ्रमें । भांडोंच लागले ॥ ४२ ॥ बहुतांसी भांडतां येकला । सैन्यावांचून पुरवला । याकारणें बहुतांला । राजी राखावें ॥ ४३ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्य-संवादे उत्तमपुरुषनिरूपणनाम समास दशम ॥ १० ॥

लोक वेधावेत. मागें सांगितलेल्या उत्तम गुणांना म्ह. अशा गुणी पुरुषाला लोक मानतातच, पण प्रबोधशक्तीचें वर्म आतां सांगतों. तें हें कीं जो बोलल्याप्रमाणें चालतो, स्वतः करून मग सांगतो त्याच्या प्रबोधावर म्ह. उपदेशवचनांवर लोकांचा विश्वास बसतो (३६–३९). जें जनांस मानवत नाहीं ते जन मानीतही नाहींत आणि मग जन एकीकडे व हा एकीकडे असें होतें; म्हणून सोबत्यांना मानत मानत शिकवून मार्गावर आणावें. हें विवेकी बिनचूक करितात, इतर बापडे जीव समुदाय करायला जातात व भांडणें मात्र पिकवितात. सैन्यावांचून एकटा काय भांडणार ? म्हणून समस्तांना राजी राखावें (४४–४३). [द० १२, स० १०].

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ सार्थ श्रीदासबोध ॥

॥ नामरूप दशक तेरावा ॥ १३ ॥

॥ श्रीरामसमर्थ ॥ आत्मानात्मविवेक करावा । करून बरा विवरावा । विवरोन सदृढ धरावा । जीवामध्यें ॥ १ ॥ आत्मा कोण अनात्मा कोण । त्याचें करावें विवरण । तेंचि आतां निरूपण । सावध ऐका ॥ २ ॥ च्यारी खाणी च्यारी वाणी । चौऱ्यांसि लक्ष जीवप्राणी । संख्या बोलिली पुराणीं । वर्तती आतां ॥ ३ ॥ नाना प्रकारींचीं शरीरें । सृष्टींत दिसतीं अपारें । तयामध्यें निर्धारें । आत्मा कवणु ॥ ४ ॥ दृष्टीमध्यें पाहातो । श्रवणामध्यें ऐकतो । रसनेमध्यें स्वाद घेतो । प्रत्यक्ष आतां ॥ ५ ॥ घ्राणामध्यें वास घेतो । सर्वांगीं तो स्पर्शतो । वाचेमध्यें बोलवितो । जाणोनि शब्द ॥ ६ ॥ सावधान आणि चंचळ । चहुंकडे चळवळ । येकलाचि चालवी सकळ । इंद्रियद्वारां ॥ ७ ॥ पाय चालवी हात चालवी । भृकुटी पालवी डोळा घालवी । संकेतखुणा बोलवी । तोचि आत्मा ॥ ८ ॥ धिटाइ लाजवी खाजवी । खोंकवी वोकवी थुंकवी । अन्न जेवून उदक सेवी । तोचि आत्मा ॥ ९ ॥ मळमूत्रत्याग करी । शरीरमात्र सावरी । प्रवृत्तिनिवृत्ति विवरी । तोचि आत्मा ॥ १० ॥ ऐके देखे हुंगे चाखे । नाना प्रकारें वोळखे । संतोष पावे आणी धाके । तोचि आत्मा ॥ ११ ॥ आनंद विनोद उद्वेग चिंता । काया छाया माया ममता । आत्मत्वें पावे नाना व्यथा । तोचि आत्मा ॥ १२ ॥ पदार्थाची आस्था धरी । जनीं वाईट

आत्मा कोण व अनात्मा कोण याचा विचार करून व चांगलें मनन करून चित्तांत दृढ धरावें. मनन किंवा विवरण कसें करावें तें सावधपणें ऐका (१–२). चार खाणी चार वाणींच्या मिळून ८४ लक्ष जीवयोनि आहेत असें पुराणांतून सांगितलें आहे. सृष्टींत नाना प्रकारचीं अनंत शरीरें दिसतात त्यांत आत्म्याचा निश्चय कसा करायचा? डोळ्यांनीं पाहतो, कानांनीं ऐकतो, रसनेनें स्वाद घेतो, नाकानें वास घेतो, सर्वांगीं स्पर्शतो, वाचेनें शब्द जाणून उच्चारतो, सावधपणें एकलाच सर्व इंद्रियांच्या द्वारें चळवळ करितो, पाय चालवतो, हात हालवितो, भोंवया चढवितो, डोळे फिरवितो, संकेतचिन्हांनीं बोलवितो – हें सर्व करितो तो आत्मा, धिटाईनें वागतो, लाजतो, खाजवतो, खोकवतो, ओकवतो, थुंकवितो, अन्नोदक सेवन करितो, मळमूत्र त्याग करितो, सर्व शरीरावयव सांवरून धरितो, प्रपंचपरमार्थाचें विवरण करितो, ऐकतो, देखतो, हुंगतो, चाखतो, नाना प्रकारांनीं ओळखतो, समाधान पावतो व भितो, हर्षशोक, विनोद, चिंता, काया, छाया, माया, ममता या सर्व विकारांशीं आपलेपणानें एकत्व पावून पीडा पावतो -- तो आत्मा नाना पदार्थांची आवड धरितो, जनांत बरें वाईट

बरें करी । आपल्यां राखे पराव्यां मारी । तोचि आत्मा ॥ १३ ॥ युध्य होतां दोहींकडे । नाना शरीरीं वावडे । परस्परें पाडी पडे । तोचि आत्मा ॥ १४ ॥ तो येतो जातो देहीं वर्ततो । हांसतो रडतो प्रस्तावतो । समर्थ करंटा होतो । व्यापासारिखा ॥ १५ ॥ होतो लंडी होतो बळकट । होतो विद्यावंत होतो धट । न्यायवंत होतो उद्धट । तोचि आत्मा ॥ १६ ॥ धीर उदार आणि कृपण । वेडा आणि विचक्षण । उच्छक आणि साहिष्ण । तोचि आत्मा ॥ १७ ॥ विद्या कुविद्या दोहींकडे । आनंदरूप वावडे । जेथें तेथें सर्वांकडे । तोचि आत्मा ॥ १८ ॥ निजे उठे बैसे चाले । धांवे धाबडी डोले तोले । सोइरे धायेरे केले । तोचि आत्मा ॥ १९ ॥ पोथी वाची अर्थ सांगे । ताळ धरी गाऊं लागे । वाद्वेवाद् वाउगे । तोचि आत्मा ॥ २० ॥ आत्मा नस्तां देहांतरीं । मग तें प्रेत सचराचरीं । देहसंगें आत्मा करी । सर्व कांहीं ॥ २१ ॥ येकेंविण येक काय । कामा नये वायां जाय । म्हणोनि हा उपाय । देहयोगें ॥ २२ ॥ देह अनित्य आत्मा नित्य । हाचि विवेक नित्यानित्य । अवघें सूक्ष्माचें कृत्य । जाणती ज्ञानी ॥ २३ ॥ पिंडीं देहधर्ता जीव । ब्रह्मांडीं देहधर्ता शिव । ईश्वरतनुचतुष्टय सर्व । ईश्वर धर्ता ॥ २४ ॥ त्रिगुणापर्ता जो ईश्वर । अर्धनारीनटेश्वर । सकळ सृष्टीचा विस्तार । तेथून जाला ॥ २५ ॥ बरवें विचारून पाही । स्त्री पुरुष तेथें नाहीं । चंचळरूप येतें कांहीं । प्रत्ययासी ॥ २६ ॥ मुळींहून सेवटवरी । ब्रह्मादि पिपिलिका देहधारी । नित्यानित्यविवेक चतुरीं । जाणिजे ऐसा ॥ २७ ॥ जड तितुकें अनित्य । आणि सूक्ष्म तितकें नित्य । यांहीमध्यें

करितो, स्वकीयांना रक्षून परकीयांना मारतो, युद्धप्रसंगीं उभयपक्षीयांच्या शरीरांत शिरून पाडतो व पडतो येतो–जातो देहांत वर्ततो, हंसतो–रडतो–पस्तावा पावतो, उद्योगाच्या मानानें सभाग्य किंवा करंटा होतो, दुर्बळ व सबळ विद्वान व दांडगा, न्यायी व अन्यायी धीरोदार व कृपण, वेडा व शहाणा (विचक्षण) उच्छृंखळ व सहिष्णु, सर्व कांहीं होतो तो आत्मा. आत्मा ज्ञानांत अज्ञानांत सुखानें सर्वांत वावरतो. निजतो, उठतो, बसतो, चालतो, धांवतो, डोलतो, तोलतो, सोयरेधायरे करितो, पोथी वाचतो व अर्थ सांगतो, ताल धरितो व गातो, वादविवाद करितो व निवांत बसतो–हें सर्व करणारा तो आत्मा (१–२०). आत्म्यावांचून देह म्हणजे तें प्रेतच, देहसंगानें आत्माच सर्व कांहीं करितो. एकावांचून एक काय होत म्हणून देहयोगानें आत्मा सर्व करितो. आतां अनित्य (नाशवंत) व आत्मा नित्य असा विवेक करणें यालाच आत्मानात्मविवेक किंवा नित्यानित्यविवेक म्हणतात, व हा सूक्ष्म विचार ज्ञात्यांपाशीं असतो. पिंडांत चार देह धरणारा त्याला जीव म्हणतात, व ब्रह्मांडीं चार देह धरणारा त्याला शिव किंवा ईश्वर म्हणतात. ह्या अष्टदेहांपकीं आठवा देह म्ह० मूळमाया किंवा मूळपुरुष तो त्रिगुणातीत आहे. त्याला अर्धनारीनटेश्वर म्हणतात व सकळ सृष्टिविस्ताराचा तो उगम आहे, सूक्ष्म विचार करून पहा म्हणजे कळेल कीं तो स्त्री नाहीं व पुरुषही नाहीं, तर चंचळ आहे. त्याचें चंचळ रूप प्रत्ययास येतें. मूळमायेपासून स्थूलपिंडापर्यंत, किंवा ब्रह्मदेवापासून मुंगीपर्यंत जेवढे देह आहेत ते सारे अनित्य व त्यांना वागविणारा आत्मा तो नित्य. जड तेवढें अनित्य व सूक्ष्म तें नित्य हाच नित्यानित्यविवेक होय. पिंडाचे चार देह–स्थूल, सूक्ष्म, कारण

नित्यानित्य । पुढें निरोपिलें ॥ २८ ॥ स्थूळ सूक्ष्म वोलांडिलें । कारण महाकारण सांडिलें । विराट हिरण्यगर्भ खंडिलें । विवेकानें ॥ २९ ॥ अव्यांकृत मूळप्रकृती । तेथें जाऊन बैसली वृत्ती । ते वृत्ति व्हावया निवृत्ति । निरूपण ऐका ॥ ३० ॥ आत्मानात्माविवेक बोलिला । चंचळात्मा प्रत्यया आला । पुढिलिये समासीं निरोपिला । सारासारविचार ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आत्मानात्माविवेकनाम समास प्रथम ॥ १ ॥

॥ श्रीरामसमर्थ ॥ ऐका सारासारविचार । उभारलें जगडंबर । त्यांत कोण सार कोण असार । विवेकें वोळखा ॥ १ ॥ दिसेल तें नासेल । आणि येईल तें जाईल । जें असतचि असेल । तेंचि सार ॥ २ ॥ मागां आत्मानात्माविवेक बोलिला । अनात्मा वोळखोन सांडिला । आत्मा जाणतां लागला । मुळींचा मूळतंतु ॥ ३ ॥ मुळीं जे राहिली वृत्ति । जाली पाहिजे निवृत्ति । सारासारविचार श्रोतीं । बरा पाहावा ॥ ४ ॥ नित्यानित्यविवेक केला । आत्मा नित्यसा निवडिला । निवृत्तिरूपें हेत उरला । निराकारीं ॥ ५ ॥ हेत म्हणिजे तो चंचळ । निर्गुण म्हणिजे निश्चळ । सारासारविचारें चंचळ । होऊन जातें ॥ ६ ॥ चळे म्हणोनि तें चंचळ । न चळे म्हणोनि निश्चळ । निश्चळीं उडे चंचळ । निश्चयेंसी ॥ ७ ॥ ज्ञान आणि उपासना । दोनी येकचि पाहाना । उपासनेकरितां जना । जगदुद्धार ॥ ८ ॥ द्रष्टा साक्षी जाणता । ज्ञानघन चैतन्यसत्ता । ज्ञान देवचि तत्वता । बरें पाहा ॥ ९ ॥ त्या ज्ञानाचें विज्ञान होतें । शोधून पाहा बहुत मतें । चंचळ अवघें नासतें । येणें प्रकारें

व महाकारण – हे ओलांडून पुढें ब्रह्मांडाचे विराट, हिरण्यगर्भ व अव्याकृत हे तीन देह मागें टाकून चौथा देह जो मूळप्रकृति (मूळमाया) तेथें वरील नित्यानित्यविवेकानें वृत्ति जाऊन बसली ; तेथूनही ती वृत्ति सोडवून तिचि निवृत्ति कशी करावयाची हें पुढें सांगतों. आत्मा कोण व अनात्मा कोण व आत्मा चंचळरूप कां आहे हें ध्यानांत ठेवून आतां सारासार विवेक सांगतों तिकडे अवधान द्यावें (२१–३१). [द० १३, स० १].

जगडंबर उभारलें आहे त्यांत सार कोण असार कोण हें विवेकानें पाहावें म्ह. सारासार विचार करावा. जें दिसतें तें नासतें व येतें तें जातें, पण जें अखंड असतेंच असतें तें सार. मागें अनात्मा ओळखून सोडला व आत्मा पाहतां मूळमायेपाशीं गेलों. तिच्या ठायीं जी वृत्ति राहिली ती निवृत्ति झाली म्हणजे सार सांपडलें. आत्मा नित्य म्हणून घेतला व तेथें निवृत्तिरूपानें निराकारीं हेतु उरला. हेतु हा चंचळ व परब्रह्म निर्गुण व निश्चळ. आधीं जडनिरासें चंचळ प्रचीतीस येतें व चंचळनिरासें निश्चळ अनुभवास येतें हा सारासार विवेक. जड व चंचळ या दोहींचा निरास होऊन निश्चळाशीं तद्रूप होणें हें सार. चळतें तें चंचळ व चळत नाहीं तें निश्चळ. निश्चळाशीं तद्रूप होणें म्हणजे चंचळाचा निरास होणें होय (१–७). चंचळ (मूळमाया) हेंच ज्ञान व हीच उपासना. उपासनेनेंच जनांचा उद्धार होतो. चंचळ (देव) यालाच साक्षी, द्रष्टा, जाणता, ज्ञानघन, असें म्हणतात. त्या ज्ञानाचेंच (चंचळाचेंच) विज्ञान (निश्चळ) होतें. नानामतांचें पर्यवसान हेंच आहे.

॥ १० ॥ नासिवंत नासेल किं नासेना । ऐसा अनुमानचि आहे मना । तरी
तो पुरुष सहसा ज्ञाना । अधिकारी नव्हे ॥ ११ ॥ नित्य निश्चयो केला ।
संदेह उरताचि गेला । तरी तो जाणावा वाहावला । महामृगजळीं ॥ १२ ॥
क्षयचि नाहीं जो अक्षई । व्यापकपणें सर्वाठाईं । तेथें हेत संदेह नाहीं ।
निर्विकारीं ॥ १३ ॥ जें उदंड घनदाट । आद्य मध्य सेवट । अचळ अढळ
अतुट । जैसें तैसें ॥ १४ ॥ पाहातां जैसें गगन । गगनाहून तें सघन ।
जनचि नाहीं निरंजन । सदोदित ॥ १५ ॥ चर्मचक्षु ज्ञानचक्षु । हा तों
अवघाच पूर्वपक्षु । निर्गुण ठाईंचा अलक्षु । लक्षवेना ॥ १६ ॥ संगत्यागेंविण
कांहीं । परब्रह्म होणार नाहीं । संगत्याग करून पाहीं । मौन्यगर्भा ॥ १७ ॥
निरसतां अवघेंचि निरसलें । चंचळ तितुकें निघोन गेलें । निश्चळ परब्रह्म
उरलें । तेंचि सार ॥ १८ ॥ आठवा देह मूळमाया । निरसोन गेल्या अष्ट
काया । साधु सांगती उपाया । कृपाळुपणें ॥ १९ ॥ सोहं हंसा तत्वमसि । तें
ब्रह्म तूं आहेसी । विचार पाहातां स्थिति ऐसी । सहजचि होते ॥ २० ॥
साधक असोन ब्रह्म उरलें । तेथें वृत्तिशून्य जालें । सारासार विचारिलें ।
येणें प्रकारें ॥ २१ ॥ तापेना ना निवेना । उजळेना ना काळवंडेना । डहुळेना
ना निवळेना । परब्रह्म तें ॥ २२ ॥ दिसेना ना भासेना । उपजेना ना नासेना ।
तें येईना ना जाईना । परब्रह्म तें ॥ २३ ॥ तें भिजेना ना वाळेना । तें
विझेना ना जळेना । जयास कोणीच नेईना । परब्रह्म तें ॥ २४ ॥ जें
सन्मुखचि चहुंकडे । जेथें दृश्य भासे उडे । धन्य साधु तो पवाडे । निर्विकारीं
॥ २५ ॥ निर्विकल्पीं कल्पनातीत । तोचि वोळखावा संत । येर अवघेंचि

याप्रमाणें चंचळाचा निरास होतो (८–१०). नाशिवंताबद्दल साशंक असणें म्हणजे ज्ञानाधिकार नाहीं असें दर्शविणें होय. निश्चळाचा रोज निश्चय करितो व रोज पुन्हां साशंक होतो तो मृगजळांत बुडाला असें समजावें (११–१२). अक्षय, सर्वव्यापी, हेतुसंदेहरहित, आदिमध्यावसानरहित, अचळ, अढळ, गगनाहून सघन असें तें निश्चळ ब्रह्म आहे (१३–१५). चर्मचक्षु, ज्ञानचक्षु, हा सारा पूर्वपक्ष आहे. निर्गुण व निश्चळ ब्रह्म हें मुळीं अलक्ष्य आहे, तेथें त्रिपुटी नाहीं. चंचळाचाही संग सोडल्याशिवाय ब्रह्मपदप्राप्ति नाहीं, संग सोडून अनिर्वचनीय ब्रह्मसुख भोगावें. चंचळ निरसून गेल्यावर निश्चळ उरतें तेंच सार (त्यावांचून बाकी सारें असार). स्थूळापासून मूळमायेपर्यंत आठही देह निरसून गेल्यावर संतगुरु उपाय सांगतात तो हा :—सोहं हंसः (सः अहं अहं सः) म्ह. ते ब्रह्म मी आहें व मीच ब्रह्म आहें हें जाण. तें ब्रह्म तूंच आहेस याचा ध्यास घेतां घेतां सहज ब्रह्मानुभव होतो. ब्रह्म होऊन बाह्य साधनें करीत असतां वृत्तिरहित पद सारासार-विचारानें प्राप्त होतें (१६–२१). परब्रह्म तापत नाहीं व निवत नाहीं, उजळत नाहीं व काळवंडत नाहीं, मळत नाहीं व निवळत नाहीं, दिसत (नेत्रांना) किंवा भासत (मनाला) नाहीं, उपजत नाहीं व नासत नाहीं, येत नाहीं व जात नाहीं, भिजत नाहीं व वाळत नाहीं, विझत नाहीं व जळत नाहीं. त्याला कोणीच नेत नाहीं. जें चहूंकडे सन्मुख ओत-प्रोत भरलें आहे, दृश्य व भास ज्यापुढें उडून जातो, अशा निश्चळ निर्विकार परब्रह्मीं स्थिरावलेला सत्पुरुष धन्य होय.

असंत । भ्रमरूप ॥ २६ ॥ खोटें सांडून खरें घ्यावें । तरीच परीक्षवंत म्हणावें । असार सांडून सार घ्यावें । परब्रह्म तें ॥ २७ ॥ जाणतां जाणतां जाणीव जाते । आपली वृत्ति तद्रूप होते । आत्मनिवेदन भक्ति ते । ऐसी आहे ॥ २८ ॥ वाच्यांशें भक्ति मुक्ति बोलावी । लक्ष्यांशें तद्रूप विवरावी । विवरतां हेतु नुरावी । ते तद्रूपता ॥ २९ ॥ सद्रूप चिद्रूप आणि तद्रूप । सस्वरूप म्हणिजे आपलें रूप । आपलें रूप म्हणिजे अरूप । तत्वनिरसनाउपरी ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सारासारनिरूपणनाम समास द्वितीय ॥ २ ॥

॥ श्रीराम ॥ ब्रह्म घन आणी पोकळ । आकाशाहून विशाळ । निर्मळ आणी निश्चळ । निर्विकारी ॥ १ ॥ ऐसेंचि असतां कित्येक काळ। तेथें आरंभला भूगोळ । तया भूगोळाचें मूळ । सावध ऐका ॥ २ ॥ परब्रह्म असतां निश्चळ । तेथें संकल्प उठिला चंचळ। तयास बोलिजे केवळ । आदिनारायण ॥ ३ ॥ मूळमाया जगदीश्वर । त्यासीच म्हणिजे षड्गुणेश्वर । अष्टधा प्रकृतींचा विचार । तेथें पाहा ॥ ४ ॥ ऐलिकडे गुणक्षोभिणी । तेथें जन्म घेतला त्रिगुणी । मूळ वोंकाराची मांडणी । तेथून जाणावी ॥ ५ ॥ अकार उकार मकार । तिनी मिळोन वोंकार । पुढें पंचभूतांचा विस्तार । विस्तारला ॥ ६ ॥ अवकाश म्हणिजेतें अंतरात्म्यासी । तयापासून जन्म वायोसी । वायोपासून तेजासी । जन्म जाला ॥ ७ ॥ वायोचा कातरा घसवटे । तेणें उष्णे वन्हि पेटे । सूर्यबिंब तें प्रगटे । तये ठाईं ॥ ८ ॥ वारा वाजतो शीतळ । तेथें निर्माण जालें जळ । तें जळ आळोन भूगोळ । निर्माण जाला ॥ ९ ॥ त्या भूगोळाचे पोटीं । अनंत

निर्विकल्प ब्रह्माला कल्पिणारा तोच संत होय, बाकीचे भ्रमरूप पामर होत. व्यवहारकुशल खोटें टाकून खरें घेतात, संत असार सांडून सार घेतात – यांसच परीक्षावंत म्हणतात, जाणतां जाणतां जाणीव (ज्ञातवृत्ति) ज्ञेय जें ब्रह्मस्वरूप त्यांत विरून जाते, वृत्ति तद्रूप होऊन निवृत्त होते, यालाच आत्मनिवेदनभक्ति म्हणतात. वाचेनें भक्ति मुक्ति बोलावी, लक्ष्यांश ध्यानीं आणून विवरण करावें, व विवरतां विवरतां हेतुरहित होऊन विरून जावें. सद्रूप, चिद्रूप, तद्रूप, म्हणजे स्वस्वरूप म्हणजे तत्त्वनिरसनांत उरलेलें अरूप किंवा निर्विकल्प परब्रह्मस्वरूप (२२–३०). [द० १३, स० २].

ब्रह्म घनदाट, पोकळ, निर्मळ, निर्विकार व आकाशाहून मोठें. असें असतां कांहीं काळानें तेथून सृष्टिरचना झाली. कशी तें ऐका (१–२). निश्चळ ब्रह्मीं संकल्प उठला. तो चंचळ आदिनारायण, मूळमाया, जगदीश्वर, षड्गुणेश्वर हीं सर्व त्या आदिसंकल्पाचींच नांवें आहेत. अष्टधा प्रकृतीचें मूळ तें. मूळमायेच्या अलीकडे गुणमाया, तेथून त्रिगुण झाले. तेथून मूळ ॐकाराची मांडणी झाली. अ, उ, म् मिळून ओम्. पुढें पंचभूतें विस्तारलीं (१–६). त्यांपैकीं आकाश म्हणजेच अंतरात्मा. त्यापासून वायु व वायुपासून तेज. दोन दिशांकडून येणाऱ्या वायूच्या (कातरा) घसटण्यानें उष्ण अग्नि पेटतो व तेथें सूर्यबिंब उत्पन्न होतें. शीतळ वायूच्या झुळकांपासून जळ झालें व त्या जळाचा आळून भूगोळ झाला. पृथ्वीपाण्याच्या

बीजांचिया कोटी । पृथ्वी पाण्या होतां भेटी । अंकुर निघती ॥ १० ॥ पृथ्वी वल्ली नाना रंग । पत्रापुष्पांचे तरंग । नाना स्वाद ते मग । फळें जालीं ॥ ११ ॥ पत्रें पुष्पें फळें मुळें । नाना वर्ण नाना रसाळें । नाना धान्यें अन्नें केवळें । तेथून जालीं ॥ १२ ॥ अन्नापासून जालें रेत । रेतापासून प्राणी निपजत । ऐसी हे रोकडी प्रचीत । उत्पत्तीची ॥ १३ ॥ अंडज जारज स्वेदज उद्भिज । पृथ्वी पाणी सकळांचें बीज । ऐसें हें नवल चोज । सृष्टि-रचनेचें ॥ १४ ॥ च्यारी खाणी च्यारी वाणी । चौऱ्यांसि लक्ष जीवयोनी । निर्माण जाले लोक तिनी । पिंडब्रह्मांड ॥ १५ ॥ मुळीं अष्टधा प्रकृती । अवघें पाण्यापासून जन्मती । पाणी नस्तां मरती । सकळ प्राणी ॥ १६ ॥ नव्हे अनुमानाचें बोलणें । याचा बरा प्रत्ययो घेणें । वेदशास्त्रें पुराणें । प्रत्ययें घ्यावीं ॥ १७ ॥ जें आपल्या प्रत्यया येना । तें अनुमानिक घ्यावेना । प्रत्ययाविण सकळ जना । वेवसाय नाहीं ॥ १८ ॥ वेवसाये प्रवृत्ती निवृत्ती । दोहींकडे पाहिजे प्रचिती । प्रचितीविण अनुमानें असती । ते विवेकहीन ॥ १९ ॥ ऐसा सृष्टिरचनेचा विचार । संकळित बोलिला प्रकार । आतां विस्ताराचा संव्हार । तोहि ऐका ॥ २० ॥ मुळापासून सेवटवरी । अवघा आत्मारामचि करी । करी आणि विवरी । यथायोग्य ॥ २१ ॥ पुढें संहार निरोपिला । श्रोतीं पाहिजे ऐकिला । इतुक्याउपरी जाला । समास पूर्ण ॥ २२ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे उभारणीनिरूपणनाम समास तृतीय ॥ ३ ॥

॥ श्रीराम ॥ पृथ्वीस होईल अंत । भूतांस मांडेल कल्पांत । ऐसा समाचार साद्यंत । शास्त्रीं निरोपिला ॥ १ ॥ शत वरुषें अनावृष्टि ।

संयोगानें अनंत प्रकारचीं बीजें वाढून त्यांचे अंकुर निघाले. नानारंगांच्या अनेक वेली होऊन त्यांना पत्रें, पुष्पें व विविध रसांचीं फळें आलीं. पत्रें, पुष्पें, फळें, मूळें – विविध रंगांचीं व विविधरसांचीं – होऊन अनेक धान्यें व अन्नें निर्माण झालीं. अन्नापासून रेत व रेतापासून प्राणी निर्माण झाले. जारज, अंडज, स्वदेज व उद्भिज या चार कोटींचे प्राणी झाले तथापि पृथ्वी व पाणी हें सर्वांचें बीज होय. अशी ही सृष्टीच्या उभारणीची मौजेची कथा आहे. पिंडब्रह्मांड मिळून ८४ लक्ष जीवयोनि निर्माण झाल्या (७–१५). अष्टधा प्रकृत्यात्मक सर्व प्राणी पाण्यापासून जन्मले ; पाण्यावांचून जीव मरतात हें उघड आहे. हें सारें बोलणें प्रत्ययाचें आहे, अनुमानाचें नाहीं. वेद, शास्त्र व पुराणें यांचे सिद्धांतही प्रत्ययानें घ्यावे. जें अनुभवाला येत नाहीं तें केवळ अनुमानिक भाषण मानूं नये. अनुभवावांचून जगांत व्यवहार चालत नाहीं. प्रवृत्तीच्या अथवा निवृत्तीच्या सर्व व्यवसायांत अनुभव पाहिजे, प्रचीतीविण अनुमान कामाचें नाहीं. सृष्टिरचनेची उभारणी सांगितली आतां संहारणी ऐका. आदीपासून अंतापर्यंत सर्व कांहीं आत्माराम करितो व तोच त्याचा विचारही करितो (१६–२२). [द० १३, स० ३].

पृथ्वीचा अंत होईल व पंचभूतांचा कल्पांत होईल असें शास्त्रांतून सविस्तर वर्णन केलें आहे. शंभर वर्षें अवर्षण

तेणें जळे हे सृष्टि । पर्वत माती ऐसी पृष्टी । भूमीची तरके ॥ २ ॥ बारा कळीं सूर्यमंडळा । किरणांपासून निघती ज्वाळा । शत वरुषें भूगोळा । दहन होय ॥ ३ ॥ सिंधुरवर्ण वसुंधरा । ज्वाळा लागती फणिवरा । तो आहाळोन सरारां । विष वमी ॥ ४ ॥ त्या विषाच्या ज्वाळा निघती । तेणें पाताळें जळती । महापावकें भस्म होती । पाताळ लोक ॥ ५ ॥ तेथें महाभूतें खवळती । प्रळयवात सुटती । प्रळयेपावक येकवटती । चहुंकडे ॥ ६ ॥ तेथें अक्रा रुद्र खवळले । बारा सूर्य कडकडिले । पावकमात्र येकवटले । प्रळयेकाळीं ॥ ७ ॥ वायो विजांचे तडाखे । तेणें पृथ्वी अवघी तरखे । कठिणत्व अवघेंचि फांके । चहूंकडे ॥ ८ ॥ तेथें मेरूची कोण गणना । कोण सांभाळिल कोणा । चंद्र सूर्य तारांगणा । मूस जाली ॥ ९ ॥ पृथ्वीनें विरी सांडिली । अवघी धगधगायमान जाली । ब्रह्मांडभटी जळोन गेली । येकसरां ॥ १० ॥ जळोनि विरी सांडिली । विशेष महावृष्टी जाली । तेणें पृथ्वी विराली । जळामध्यें ॥ ११ ॥ भाजला चुना जळीं विरे । तैसा पृथ्वीस धीर न धरे । विरी सांडूनियां त्वरें । जळीं मिळाली ॥ १२ ॥ शेष कूर्म वराह गेला । पृथ्वीचा आधार तुटला । सत्व सांडून जळाला । मिळोन गेली ॥ १३ ॥ तेथें प्रळयमेघ उचलले । कठिण घोषें गर्जिन्नले । अखंड विजा कडकडिले । ध्वनि घोष ॥ १४ ॥ पर्वतप्राय पडती गारा । पर्वत उडती ऐसा वारा । निबिड तया अंधकारा । उपमाचि नाहीं ॥ १५ ॥ सिंधु नद्या एकवटल्या । नेणो नभींहून रिचवल्या । संधिच नाहीं धारा मिळाल्या । अखंड पाणी ॥ १६ ॥ तेथें मत्स्य कूर्म सर्प पडती । पर्वतासारिखे दिसती । गर्जना होतां मिसळती । जळांत जळें ॥ १७ ॥ सप्त सिंधु

पडून ही सृष्टि जळेल व पृथ्वीची पाठ इतकी फाटून जाईल कीं तिच्या भगदाडांत मोठमोठे पर्वत गडप होतील (मातील). सूर्यमंडळ बारा कळांनीं तळपेल व त्याच्या किरणांतून ज्वाळा निघून शंभर वर्षें भूगोल जळत राहील. पृथ्वी लालभडक होऊन तिच्या ज्वाळा शेषाला लागतील व तो होरपळून भडाभड विष ओकत राहील. त्याच्या ज्वाळा भडकून पाताळें व पाताळलोक जळून खाक होतील. त्यामुळें पंचभूतें खवळून प्रळयवात व प्रळयाग्नि एकदम पेटतील. प्रळयकाळीं अकरा रुद्र व बारा सूर्य खवळून पावक मात्र एकमय होतील, वारें व विजा यांच्या तडाख्यांनीं पृथ्वीच्या ठिकऱ्या उडून तिचें कठिनत्व नष्ट होईल. तेथें मेरूची कोण प्रतिष्ठा ? कोण कोणाला सांभाळील ? चंद्र, सूर्य व तारांगणें यांची आटून एक मूस होईल ! पृथ्वीचें काठिण्य मोडून धगधगूं लागेल. ब्रह्मांडाची भट्टी जळून जाईल. पृथ्वीनें जळून विरी सांडली कीं महावृष्टि होऊन भाजलेला चुना पाण्यांत विरून जातो त्याप्रमाणें पृथ्वीच्या कणांनाही धीर धरवणार नाहीं व ती सारी जळमय होईल. शेष, कूर्म, वराह यांचा पृथ्वीचा आधार सुटून तो आपलें सत्त्व सोडून जळांत मिळून जाईल (१–१३). तेव्हां भयंकर गर्जना करीत प्रळयमेघ उठतील व एकसारखा विजांचा कडकडाट होईल. पर्वतप्राय गारा पडून वाऱ्यानें पर्वत उडून जातील. असे भयंकर झंजावात सुटून निबिड अंधकारानें ब्रह्मांड व्यापून जाईल. समुद्र व नद्या आकाशांतून रिचवल्याप्रमाणें एकवटून

आवरणीं गेले । आवरणवेढे मोकळे जाले । जळरूप जालियां खवळले । प्रळयपावक ॥ १८ ॥ ब्रह्मांडऐसा तप्तलोहो । शोषी जळाचा समूहो । तैसें जळास जालें पाहो । मोठें अपूर्व ॥ १९ ॥ तेणें आटोन गेलें पाणी । असंभाव्य माजला वन्ही । तया वन्हीस केली झडपणी । प्रळयवातें ॥ २० ॥ दीपास पालव घातला । तैसा प्रळयपावक विझाला । पुढें वायो प्रबळला । असंभाव्य ॥ २१ ॥ उदंड पोकळी थोडा वारा । तेणें वितळोन गेला सारा । पंचभूतांचा पसारा । आटोपला ॥ २२ ॥ महद्भूत मूळमाया । विस्मरणें वितुळे काया । पदार्थमात्र राहावया । ठाव नाहीं ॥ २३ ॥ दृश्य हलकालोळें नेलें । जड चंचळ वितुळलें । याउपरी शाश्वत उरलें । परब्रह्म तें ॥ २४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे प्रळयनाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥ कोणी येक दोघें जण । पृथ्वी फिरती उदासीन । काळक्रमणें लागून । कथा आरंभिली ॥ १ ॥ श्रोता पुसे वक्तयासी । काहाणी सांगा जी बरवीसी । वक्ता म्हणे श्रोतयासी । सावध ऐकें ॥ २ ॥ येकें स्त्रीपुरुषें होतीं । उभयतांमध्यें बहुप्रीति । येकरूपेंचि वर्तती । भिन्न नाहीं ॥ ३ ॥ ऐसा कांहीं येक काळ लोटला । तयांस येक पुत्र जाला । कार्यकर्ता आणि भला । सर्वविषईं ॥ ४ ॥ पुढें त्यासही जाला कुमर । तो पित्याहून आतुर । कांहीं तदर्ध चतुर । व्यापकपणें ॥ ५ ॥ तेणें व्याप उदंड केला । बहुत कन्यापुत्र व्याला । उदंड लोक संचिला । नाना प्रकारें ॥ ६ ॥ त्याचा पुत्र

सर्वत्र पाणीच पाणी होऊन जाईल. त्यांतून पर्वतप्राय मासे, कांसव व सर्प पडून प्रचंड गर्जना होऊन जळांत जळें मिसळून जातील. सप्तसमुद्रांचीं आवरणें व वेढे फुटून महाजळें एकमेकांत मिसळून सारें जळमयच होईल. मग ब्रह्मांडाएवढा तापलेल्या लोखंडाचा गोळा प्रगट होऊन तो सारें जळ शोषून टाकील व जळाचा थेंबही उरणार नाहीं (१४–१९). पाणी आटून गेल्यावर असंभाव्य वन्हि भडकेल व प्रळयकाळचा महावात सुटून तो सारा वन्हि ग्रासून टाकील. पदरानें दिवा मालवावा त्याप्रमाणें प्रळयाग्नि विझून असंभाव्य प्रचंड वारे उठतील. पण ते वारे त्याहून मोठ्या अशा आकाशांत वितळून पार नाहींसे होतील. याप्रमाणें पंचभूतांचा बाजार सारा उधळून जाईल. शेवटीं ब्रह्मांडींचा चौथा देह जी मूळमाया म्ह. महद्भूत तिचें स्फुरण नाहींसें होऊन साराच प्रपंच आटून कोणत्याही पदार्थाला किंवा भूताला राहायला वाव उरणार नाहीं. याप्रमाणें पंचभौतिक दृश्य सृष्टि महाप्रळयानें उडविली कीं जड गेलें व चंचळही गेलें असें होऊन निश्चळ परब्रह्म तेवढेंच उरेल (२०–२४). [द० १३, स० ४].

उदासवृत्तीचे दोन साधु पृथ्वीप्रदक्षिणा करावयास बाहेर पडले असतां मौजेनें वेळ जावा म्हणून त्यांनीं एक गोष्ट सांगावयास आरंभ केला. त्यांपैकीं एक झाला वक्ता व एक झाला श्रोता. श्रोता म्हणाला–' चांगलीशी एक गोष्ट (काहणी, कथा) सांगा. ' वक्ता म्हणाला-' सांगतों ऐक ' (१–२). एक होतें स्त्रीपुरुषांचें जोडपें (प्रकृतिपुरुष, शिवशक्ति, अर्धनारी नटेश्वर, मूळमाया किंवा मूळ पुरुष). त्या उभयतांमध्यें अत्यंत प्रेम होतें ; इतकें कीं उभयतां एकरूपानें वागत होते, त्यांमध्यें अगदीं भेदभाव नव्हता. असा कांहीं काळ गेल्यावर त्यांना एक पुत्र झाला (विष्णु). तो कार्य कर्ता (जाणीव

जेष्ठ । तो अज्ञान आणि रागिट । अथवा चुकतां नीट । संव्हार करी ॥ ७ ॥ पिता उगाच बैसला । लेंकें बहुत व्याप केला । सर्वज्ञ जाणता भला । जेष्ठ पुत्र ॥ ८ ॥ नातु त्याचें अर्ध जाणे । पणतु तो कांहींच नेणें । चुकतां संव्हारणें । महाक्रोधी ॥ ९ ॥ लेंक सकळांचें पाळण करी । नातु मेळवी वरिच्यावरी । पणतु चुकल्यां संव्हार करी । अकस्मात ॥ १० ॥ नेमस्तपणें वंश वाढला । विस्तार उदंडची जाला । ऐसा बहुत काळ गेला । आनंदरूप ॥ ११ ॥ विस्तार वाढला गणवेना । वडिलांस कोणीच मानीना । परस्परें किंत मना । बहुत पडिला ॥ १२ ॥ उदंड घरकळहो लागला । तेणें कित्येक संहार जाला । विपट पडिलें थोरथोरांला । बेबंद जालें ॥ १३ ॥ नेणपणें भरीं भरले । मग ते अवघेच संहारले । जैसे यादव निमाले । उन्मत्तपणें ॥ १४ ॥ बाप लेंक नातु पणतु । सकळांचा जाला निपातु । कन्या पुत्र हेतु मातु । अणुमात्र नाहीं ॥ १५ ॥ ऐसी काहाणी जो विवरला । तो जन्मापासून सुटला । श्रोता वक्ता धन्य जाला । प्रचीतीनें ॥ १६ ॥ ऐसी काहाणी अपूर्व जे ते । उदंड वेळ होत जाते । इतुकें बोलोन गोसावी ते । निवांत जाले ॥ १७ ॥ आमची काहाणी सरो । तुमचे अंतरीं भरो ।

किंवा ज्ञान असलेला) व अत्यंत भला (सत्त्वगुणी) निघाला, पुढें त्यालाही एक पुत्र झाला (ब्रह्मा). तो बापाहून अधिक उत्साही (आतुर, सृष्ट्युत्पत्तीच्या उलाढाल्या करणारा) पण अर्धचतुर बापाहून निम्मा चतुर, (जाणीव व नेणीव या गुणांनीं युक्त) असा व्यापक (रजोगुणी) झाला. त्यानें व्याप फार केला, व त्याला कन्या पुत्र पुष्कळ झाले, अनेक लोक त्यानें निर्माण केले (सप्तलोकांतील सर्व स्त्रीपुरुष किंवा नरमादी त्या ब्रह्मदेवाचींच लेकरें होत). याप्रमाणें तो लोकसंग्रहकर्ता निघाला. त्याचा वडील मुलगा (शंकर) हा अज्ञान (नेणीवरूप) व रागीट निघाला. कोठें चूक आढळली कीं संहार करायचा असा तो तमोगुणी होता. असें हें कुटुंब एकत्र नांदत होतें. पुत्रनातुपणतु गृहप्रपंच चालवीत आहेत हें पाहून बाप (मूळपुरुष) उगीच बसला (वृद्धानें दुसरें काय करायचें ?). लेकानें (विष्णूनें) व्याप फार केला, तो जाणता, सर्वज्ञ, भला अशी त्याची ख्याति झाली. नातु (ब्रह्मदेव) अर्धा शाहणा व चटपट्या व पणतु (शंकर) महाक्रोधी (तमोगुणी) व संहारकर्ता असा हा त्या वृद्धाचा (मूळपुरुषाचा) संसार थाटला. लेक सर्वांचें पालनपोषण करी, नातु वरचेवर भर टाकी व पणतु संहार करी (ब्रह्मदेवानें असंख्य प्राणी व अनेक सृष्टि घडाव्या, विष्णूनें त्यांचें पोषण करावें व शंकरानें संहार करावा असें चाललें). याप्रमाणें मूळपुरुषाचा वंश वाढला, पुष्कळच विस्तार झाला, असा बहुत काळ आनंदांत गेला. अगणित विस्तार वाढला, अनंत ब्रह्मांडें व असंख्य जीव निर्माण झाले ; पण पुढें पुढें अवाढव्य वाढलेल्या या मूळपुरुषाच्या साम्राज्यांत अंतःकलह सुरू झाले. वडिलांचा बोज कनिष्ठ ठेवीनासे झाले. आतां परस्परांचीं मनें परस्परांविषयीं कलुषित होऊन वैमनस्यें वाढलीं. एकोपा मोडून जो तो फुटून वागूं लागला. वडिलांशीं कनिष्ठ मिळून होते तोंवर शोभा होती, पण आतां तो मनु बदलला. गृहकलह सुरू झाले, त्यांमुळें सर्वांचाच संहार होण्याचा समय पातला, मोठमोठ्यांत परस्पर वैमनस्य उत्पन्न झालें. यादव उन्मत्त होऊन आपापसांत भांडून सारेच मेले. त्याप्रमाणें अहंकाराच्या भरीं भरल्यामुळें सर्वांचाच संहार झाला. बाप-लेक-नातु-पणतु सर्वांचा संहार होऊन कोणाचेंच अपत्य मागें न राहतां निर्वंश झाला (३–१५). या काहणीचें जो मनन करील (व सृष्टीच्या उभारणीसंहारणीचें मर्म समजेल) तो जन्ममरणापासून सुटेल, याची प्रचीति घेतील तर श्रोतेवक्ते उभयतां धन्य होतील, अशी अपूर्व काहणी (युगायुगाच्या ठायीं) उदंड वेळ होत असते. इतकें बोलून वक्ता गप बसला (१६–१७). आमची काहणी सरो, तुमचे हृदयीं भरो, या बोलण्याचें वर्म कोणी

ऐसें बोलणें विवरो । कोणी तरी ॥ १८ ॥ चुकत वांकत आठवलें । इतुकें संकळित बोलिलें । न्यूनपूर्ण क्षमा केलें । पाहिजे श्रोतीं ॥ १९ ॥ ऐसी काहाणी निरंतर । विवेकें ऐकती जे नर । दास म्हणे जगदुद्धार । तेचि करिती ॥ २० ॥ त्या जगदुद्धाराचें लक्षण । केलें म्हणे पाहिजे विवरण । सार निवडावें निरूपण । यास बोलिजे ॥ २१ ॥ निरूपणीं प्रत्ययें विवरावें । नाना तत्वकोडें उकलावें । समजतां समजतां व्हावें । निःसंदेह ॥ २२ ॥ विवरोन पाहातां अष्ट देह । पुढें सहजचि निःसंदेह अखंड निरूपणें राहे । समाधान ॥ २३ ॥ तत्वांचा गल्बला जेथें । निवांत कैंचें असेल तेथें । याकारणें गुल्लीपरतें । कोणियेकें असावें ॥ २४ ॥ ऐसा सूक्ष्म संवाद । केलाचि करावा विशद । पुढिले समासीं लघुबोध । सावध ऐका ॥ २५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे काहाणीनिरूपणनाम समास पंचम ॥ ५ ॥

॥ श्रीराम ॥ जें बोलिजेती पंचतत्वें । त्यांचीं अभ्यासाया नांवें । तदुपरी स्वानुभवें । रूपें जाणावीं ॥ १ ॥ यामध्यें शाश्वत कोण । आणी अशाश्वत कोण । ऐसें करावें विवरण । प्रत्ययाचें ॥ २ ॥ पंचभूतांचा विचार । नांवरूप सारासार । तोचि बोलिला निर्धार । सावध ऐका ॥ ३ ॥ पृथ्वी आप तेज वायो आकाश । नांवें बोलिलीं सावकास । आतां रूपाचा विश्वास । श्रवणें धरावा ॥ ४ ॥ पृथ्वी म्हणिजे ते धरणी । आप म्हणिजे तें पाणी । तेज म्हणिजे अग्नि तरणी । सतेजादिक ॥ ५ ॥ वायो म्हणिजे तो वारा । आकाश म्हणिजे पैस सारा । आतां शाश्वत तें विचारा । आपले मनीं ॥ ६ ॥ येक शीत चांचपावें । म्हणिजे वर्म पडे ठावें । तैसें थोड्या अनुभवें । बहुत जाणावें ॥ ७ ॥

तरी उमगो. चुकतवांकत आठविलें तें संक्षेपानें कथन केलें आहे, यांत न्यून पूर्ण असल्यास श्रोत्यांनीं क्षमा करावी. ही काहणी निरंतर होत असते; जे विवेकानें पाहातील ते जगदुद्धार करितील. जगदुद्धाराचें लक्षण सांगितलें पाहिजे. सर्व बोलण्याचें सार काढून घ्यावें याचें नांव निरूपण. तत्त्वरहस्य विवरतां विवरतां जीवीं धरून निःसंदेह व्हावें. अष्टदेह निरसनानें समाधान पावावें. तत्त्वांच्या गलबल्यांत समाधान नाहीं म्हणून त्या गोंधळाच्या पार व्हावें (१८–२५). [द० १३, स० ५].

पंचतत्त्वें ज्यांना म्हणतात त्यांचीं नांवें आधीं लक्षांत ठेवावींत व मग आपल्या अनुभवानें त्यांच्या रूपांचा विचार करावा. त्यांमध्यें शाश्वत कोण व अशाश्वत कोण याचा विचार करावा. पंचभूतांचीं नामरूपें व त्यांतील सारासारविचार ऐका (१–३). पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश हीं पंचभूतांचीं नांवें सांगितलीं. आतां रूपें ऐका. पृथ्वी म्ह० धरणी, आप म्ह० पाणी, तेज म्ह० अग्नी, सूर्य, वन्हि इ० सतेज पदार्थ, वायु, म्ह० वारा, आकाश म्ह० पोकळी (पैस); आतां शाश्वत कोण त्याचा मनांत विचार आणा. एक शीत चांचपलें म्हणजे साऱ्या भाताची परीक्षा होते, तसें थोड्याशा अनुभवा-

पृथ्वी रचते आणि खचते। हें तों प्रत्ययास येतें । नाना रचना होत जाते। सृष्टिमध्यें ॥ ८ ॥ म्हणोनी रचतें तें खचतें। आप तेंहि आटोन जातें। तेजहि प्रगटोन विझतें। वारेंहि राहे ॥ ९ ॥ अवकाश नाममात्र आहे। तेंहि विचारितां न राहे। एवं पंचभूतिक राहे। हें तों घडेना ॥ १० ॥ ऐसा पांचाभूतांचा विस्तार। नासिवंत हा निर्धार। शाश्वत आत्मा निराकार। सत्य जाणावा ॥ ११ ॥ तो आत्मा कोणास कळेना। ज्ञानेंविण आकळेना। म्हणोनियां संतजनां। विचारावें ॥ १२ ॥ विचारितां सज्जनासी। ते म्हणती कीं अविनासी। जन्म मृत्य आत्मयासी। बोलोंच नये ॥ १३ ॥ निराकारीं भासे आकार। आणी आकारीं भासे निराकार। निराकार आणी आकार। विवेकें वोळखावा ॥ १४ ॥ निराकार जाणावा नित्य। आकार जाणावा अनित्य। यास बोलिजे नित्यानित्य। विचारणा ॥ १५ ॥ सारीं भासे असार। आणि असारीं भासे सार। सारासार विचार। शोधून पाहावा ॥ १६ ॥ पंचभूतिक तें माइक। परंतु भासे अनेक। आणि आत्मा येक। व्यापून असे ॥ १७ ॥ चहुं भूतांमधें गगन। तैसें गगनीं असें सघन। नेहटून पाहातां अभिन्न। गगन आणि वस्तु ॥ १८ ॥ उपाधीयोगेंचि आकाश। उपाधी नस्तां निराभास। निराभास तें अविनाश। तैसें गगन ॥ १९ ॥ आतां असो हे विवंचना। परंतु जें पाहातां नासेना। तें गे तेंचि अनुमाना। विवेकें आणावें ॥ २० ॥ परमात्मा तो निराकार। जाणिजे हा विचार सार। आणि आपण कोण हा विचार। पाहिला पाहिजे ॥ २१ ॥ देहास अंत येतां। वायो जातो तत्वता। हें लटिकें म्हणाल तरी आतां। श्वासोच्छ्वास धरावा ॥ २२ ॥ श्वास कोंडतां

वरून पुष्कळ जाणावें. पृथ्वीला उत्पत्तिनाश आहे हा अनुभवच आहे, किंबहुना सृष्टींत ज्या ज्या रचना होतात, त्यांना त्यांना नाश हा आहेच. पाणी आटतें, तेज प्रगटून विझतें, वारा थांबतो. तात्पर्य, जें जें रचतें तें तें खचतें. आकाश हें नाममात्र आहे, विचारांतीं तेंही टिकत नाहीं. सारांश पंचभूतात्मक जेवढें आहे तेवढें सारें अशाश्वत आहे, राहत नाहीं, नाशवंत आहे, आणि आत्मा मात्र शाश्वत, निराकार व सत्य आहे (४–११). त्या आत्म्याचें स्वरूप ज्ञानाशिवाय कळत नाहीं व ज्ञान संतांपाशीं असतें म्हणून शाश्वत आत्मस्वरूप संतांस विचारावें. संतांस विचारितां ते आत्मा अविनाशी, जन्ममृत्युरहित आहे असें सांगतात. निराकारीं आकार व आकारीं निराकार भासतो म्हणून आकार व निराकार काय तें विवेकें जाणावें. निराकार नित्य आहे व आकार अनित्य आहे याला नित्यानित्यविचार म्हणतात. सारांत असार व असारांत सार भासतें म्हणून सारासारविचार शोधून पाहावा. पंचभूतिक मायिक व अनेक आहे व आत्मा शाश्वत, एक व व्यापक आहे. पृथिव्यादि चारही भूतांत आकाश आहे तसें आकाशांत ब्रह्म घनदाट भरलें आहे. नीट विचार पाहतां आकाश व ब्रह्म भिन्न दिसत नाहींत. उपाधि आहे म्हणून आकाश व उपाधि नाहीं म्हणून ब्रह्म, ज्याला उपाधि किंवा भास नाहीं तें ब्रह्म, आकाशही तसेंच आहे. विचारानें पाहतां जें नाश पावत नाहीं तें विवेकानें अनुमानाच्या टप्यांत आणून सोडावें. परमात्मा निराकार आहे हेंच सार होय, आतां आपण कोण हा विचार पाहावा (१२–२०). देहांतसमयीं शरीरांतून वायु निघून जातो, हें म्हणणें पटत नसल्यास क्षणभर श्वास दाबून धरावा ! श्वास कोंडला कीं देह पडतो, देह पडला

देह पडे । देह पडतां म्हणती मडें । मढ्यास कर्तृत्व न घडे । कदाकाळीं ॥ २३ ॥ देहावेगळा वायो न करी । वायो वेगळा देह न करी । विचार पाहातां कांहींच न करी । येकावेगळें येक ॥ २४ ॥ उगेंच पाहातां मनुष्य दिसे । विचार घेतां कांहींच नसे । अभेद भक्तीचें लक्षण ऐसें । वोळखावें ॥ २५ ॥ कर्ता आपण ऐसें म्हणावें । तरी आपले इच्छेसारिखें व्हावें । इच्छेसारिखें न होतां मानावें । अवघेंच वाव ॥ २६ ॥ म्हणोन कर्ता नव्हे किं आपण । तेथें भोक्ता कैंचा कोण । हें विचाराचें लक्षण । अविचारें न घडे ॥ २७ ॥ अविचार आणि विचार । जैसा प्रकाश आणि अंधार । विकार आणि निर्विकार । येक नव्हे कीं ॥ २८ ॥ जेथें नाहीं विवंचना । तेथें कांहींच चालेना । खरें तेंचि अनुमाना । कदा न ये ॥ २९ ॥ प्रत्ययास बोलिजे न्याये । अप्रत्यये तो अन्याये । जात्यंधासी परीक्षा काय । नाना रत्नांची ॥ ३० ॥ म्हणोनी ज्ञाता धन्य धन्य । जो निर्गुणेंसी अनन्य । आत्मनिवेदनें मान्य । परम पुरुष ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे लघुबोधनाम समास षष्ठ ॥ ६ ॥

॥ श्रीराम ॥ निर्मळ निश्चळ निराभास । तयास दृष्टांत आकाश । आकाश म्हणिजे अवकाश । पसरला पैस ॥ १ ॥ आधीं पैस मग पदार्थ । प्रत्ययो पाहतां यथार्थ । प्रत्ययेविण पाहतां व्यर्थ । सकळ कांहीं ॥ २ ॥ ब्रह्म म्हणिजे तें निश्चळ । आत्मा म्हणिजे तो चंचल । तयास दृष्टांत केवळ । वायो जाणावा ॥ ३ ॥ घटाकाश दृष्टांत ब्रह्माचा । घटबिंब दृष्टांत आत्म्याचा । विवरतां अर्थ दोहींचा भिन्न आहे ॥ ४ ॥ भूत म्हणिजे जितुकें जालें । जालें तितुकें

कीं त्याला मढें म्हणतात, मढ्याच्या ठिकाणीं कर्तृत्व नाहीं हें तर उघड आहे. देहावेगळा वायु किंवा वायुवेगळा देह म्हणजे एकमेकावांचून एकमेक कांहींच करूं शकत नाहींत. वरवर पाहतां मनुष्य दिसतें, पण विचार पाहतां देह म्ह० एक पंचभूतांचें गांठोडें अर्थात् नाशवंत आहे असें दिसून निर्गुण ब्रह्माशिवाय कोठेंही कांहीं एक नाहीं हें कळून अभेदभक्तीचें लक्षण अंगीं जडतें. ‘ मी कर्ता ’ असें म्हणावें तर आपल्या इच्छेप्रमाणें घडलें पाहिजे, पण आपले इच्छेप्रमाणें होत नाहीं म्हणून ‘ मी कर्ता ’ हें म्हणणे फुकट आहे. मी कर्ता नाहीं तर भोक्ता कोण याचा विचार करावा ; अविचारानें हें कळायचें नाहीं. विचार व अविचार म्ह० प्रकाश व अंधार होय. तात्पर्य, विकार आणि अविकार एक नाहीं. जेथें विचार नाहीं तेथें कांहींच चालत नाहीं, सत्यवस्तु कांहीं अनुमानास येत नाहीं. प्रत्यय म्ह० न्याय व अप्रत्यय म्ह० अन्याय. जन्मांधाला नानारत्नांची परीक्षा होणें नाहीं. तात्पर्य ‘ मी कर्ता, मी भोक्ता, ’ इ० विकार मिथ्या होत, आत्मा निर्विकार व निर्गुण आहे त्याशीं अनन्य होणारा अभेदभक्त परम धन्य होय (२१–३१). [द० १३, स० ६].

निर्मळ, निश्चळ व निराभास अशा ब्रह्माला दृष्टांत एक आकाशाचा शोभतो. आकाश = अवकाश = पैस = पोकळी. आधीं आकाश मग त्यांत पदार्थ म्ह० इतर चार भूतें. हें प्रत्ययानें पहावें, प्रत्ययावांचून सर्व व्यर्थ आहे. आकाशीं वायु किंवा घटकाशीं घटाबिंब तसा निश्चळ ब्रह्मीं चंचळ आत्मा. दोहोंत भेद आहे. भूत जें झालें तें बरें जें होतें

निमालें। चंचल आलें आणी गेलें। ऐसें जाणावें ॥ ५ ॥ अविद्या जड आत्मा चंचळ। जड कर्पूर आत्मा अनळ। दोनी जळोन तत्काळ। विझोन जाती ॥ ६ ॥ ब्रह्म आकाश निश्चळ जाती। आत्मा वायो चंचळ जाती। परीक्षवंत परिक्षिती। खरें कीं खोटें ॥ ७ ॥ जड अनेक आत्मा येक। ऐसा आत्मानात्मविवेक। जगा वर्तविता जगन्नायक। तयास म्हणावें ॥ ८ ॥ जड अनात्मा चेतवी आत्मा। सर्वी वर्ते सर्वात्मा। अवघा मिळोन चंचळात्मा। निश्चळ नव्हे ॥ ९ ॥ निश्चळ तें परब्रह्म। जेथें नाहीं दृश्यभ्रम। विमळ ब्रह्म तें निर्भ्रम। जैसें तैसें ॥ १० ॥ आधीं आत्मानात्मविवेक थोर। मग सारासारविचार। सारासारविचारें संव्हार। प्रकृतीचा ॥ ११ ॥ विचारें प्रकृति संव्हारे। दृश्य अस्तांच वोसरे। अंतरात्मा निर्गुणीं संचरे। अध्यात्मश्रवणें ॥ १२ ॥ चढता अर्थ लागला। तरी अंतरात्मा चढतचि गेला। उतरल्या अर्थें उतरला। भूमंडळीं ॥ १३ ॥ अर्थासारिखा आत्मा होतो। जिकडे नेला तिकडे जातो। अनुमानें संदेहीं पडतो। कांहींयेक ॥ १४ ॥ निसंदेह अर्थ चालिला। तरी आत्मा निसंदेहचि जाला। अनुमानअर्थें जाला। अनुमानरूपी ॥ १५ ॥ नवरसिक अर्थ चाले। श्रोते तद्रूपचि जाले। चाटपणें होऊन गेले। चाटचि आवघे ॥ १६ ॥ जैसा जैसा घडे संग। तैसे गुहराचे रंग। याकारणें उत्तम मार्ग। पाहोन धरावा ॥ १७ ॥ उत्तम अन्नें बोलत गेले। तरी मन अन्नाकारचि जालें। लावण्य वनितेचें वर्णिलें। तरी मन तेथेंचि बैसे ॥ १८ ॥

तें जातें याप्रमाणें पाहतां तेवढें नाशिवंत आहे; आलें आणि गेलें तें चंचळ. भूत म्ह० अविद्याकार्य तें जड व आत्मा चंचळ. जड तें कापूर व आत्मा अग्नि, म्ह० आत्मा अनात्म्यास जाळतो व आपणही तत्काळ जळून जातो. आकाश व ब्रह्म या दोहोंची जात निश्चळ व यांत होणारे वायु व आत्मा यांची जात चंचळ. परीक्षावंत याची यथार्थता जाणतील. जड अनेक व आत्मा एक हा आत्मानात्मविवेक, यांत आत्मा (अंतरात्मा) जगाला चालवितो म्हणून त्याला जगन्नायक म्हणतात. जड अनात्म्याला आत्मा चेतवतो, सर्व ब्रह्मांडाला सर्वात्मा चेतवतो, म्हणजे आत्मा व सर्वात्मा मिळून चंचळच, निश्चळ नव्हे (१–९). निश्चळ, विमळ निर्भ्रम असें ब्रह्म तें परब्रह्म. आधीं जड व चंचळ यांचा विवेक करावा, याला आत्मत्नात्मविवेक म्हणतात; मग सार (ब्रह्म) व असार (जड व चंचळ) यांचा विवेक करून दृश्यभासात्मक प्रकृति दूर सारावी. प्रकृति विचारानें दूर सारायची आहे, ती सारली कीं दृश्य असतांच वोसरून जातें, व चंचळ आत्मा अध्यात्मश्रवणानें निर्गुण विरून जातो (१०–१२). अंतरात्मा हा चंचळ असल्यामुळें ज्या संगीताला लागतो त्याशीं तद्रूप होतो; जड अनात्मसंगतीला लागला तर देहात्मभाव धरून अधोगतीला लागतो व निश्चळ संगतीला लागला तर उद्धरून जातो, आणि अनुमानतर्कांच्या मार्गाला लागला तर तर्कटी बनून संदेहांत पडतो. निश्चळाच्या मार्गे लागून निःसंदेह होतो व तर्कांच्या मार्गे लागून तर्कटी होतो. शृंगारवीरकरुणादि नवरसांचा रंग भरून देणारा एखादा वक्ता भेटला म्हणजे श्रोते तद्रूप होऊन जातात व श्रोतेवक्ते सारे चाट (चावट) बनतात. गुहरा नामक सरड्याचे रंग संगतीप्रमाणें पालटतात तसेंच आत्म्याचें समजावें, म्हणून उत्तम मार्ग (निश्चळाचा मार्ग) पाहून तसा संग धरावा (१३–१७). उत्तम पक्वान्नांचीं वर्णनें निघालीं कीं मन तदाकार होतें, स्त्रीच्या लावण्यवर्णनाचा प्रकार निघाला

पदार्थवर्णन आघवें । किती म्हणोन सांगावें । परंतु अंतरीं समजावें । होय किं नव्हे ॥ १९ ॥ जें जें देखिलें आणी ऐकिलें । तें अंतरीं सदृढ बैसलें । हित अनहित परीक्षिलें । परीक्षवंतीं ॥ २० ॥ याकारणें सर्व सांडावें । येक देवासीच धुंडावें । तरीच वर्म पडे ठावें । कांहींयेक ॥ २१ ॥ नाना सुखें देवें केलीं । लोकें तयास चुकलीं । ऐसीं चुकतांच गेलीं । जन्मवरी ॥ २२ ॥ सर्व सांडून शोधा मजला । ऐसें देवचि बोलिला । लोकीं शब्द अमान्य केला । भगवंताचा ॥ २३ ॥ म्हणोन नाना दुःखें भोगिती । सर्वकाळ कष्टी होती । मनीं सुखचि इच्छिती । परी तें कैचें ॥ २४ ॥ उदंड सुख जया लागलें । वेड तयास चुकलें । सुख सुख म्हणतांच मेलें । दुःख भोगितां ॥ २५ ॥ शाहण्यानें ऐसें न करावें । सुख होय तेंचि करावें । देवासी धुंडीत जावें । ब्रह्मांडापरतें ॥ २६ ॥ मुख्य देवचि ठाईं पडिला । मग काय उणें तयाला । लोक वेडे विवेकाला । सांडून जाती ॥ २७ ॥ विवेकाचें फळ तें सुख । अविवेकाचें फळ तें दुःख । यांत मानेल तें अवश्यक । केलें पाहिजे ॥ २८ ॥ कर्त्यासी वोळखावें । यास विवेक म्हणावें । विवेक सांडितां व्हावें । परम दुःखी ॥ २९ ॥ आतां असो हें बोलणें । कर्त्यास वोळखणें । आपलें हित विचक्षणें । चुकों नये ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे प्रत्ययविवरणनाम समास सप्तम ॥ ७ ॥

॥ श्रीराम ॥ श्रोता म्हणे वक्तयासी । कोण कर्ता निश्चयेंसी । सकळ सृष्टि ब्रह्मांडासी । कोणें केलें ॥ १ ॥ तंव बोलिले सभानायक । जे बोलिक येकाहून

कीं मन त्यांत तल्लीन होतें. अनंत पदार्थ आहेत ते किती म्हणून वर्णावेत, असो. तात्पर्य अंतरीं समजून घ्यावें. जें जें ऐकावें आणि पाहावें तें तें चित्तांत दृढ बसतें, म्हणून विवेकी जन आपलें हिताहित पाहून वागतात. तात्पर्य, एका निश्चळ देवालाच शोधावें व बाकीचें सर्व सोडून द्यावें तरच वर्म हातीं लागतें. सर्व सुखें देवानेंच केलीं आहेत पण लोक सुखाच्या मागें लागून सुखकर्त्या देवाला विसरतात व जन्मभर अशाच चुका करीत राहतात. सर्व सोडून मला एकाला शोधा असें भगवंतच गीतेंत (अ. १८–६६) बोलले आहेत, पण लोक देवाचा शब्द अमान्य करितात आणि दुःखी कष्टी होतात. निश्चळ देव सोडून चंचळ सुखाच्या नादीं लागतात पण तेथें सुख कोठें आहे? सर्व सुखाचें आगर अशा निश्चळ देवाला चुकतात व वेडे लोक दुसऱ्याच नादीं लागून सुख सुख म्हणतां दुःखच पावतात. शाहण्यानें असें करूं नये, खरें सुख ज्यांत आहे तेंच करावें, व त्यासाठीं ब्रह्मांडाच्या परतें (दृश्य ओलांडून) देवाला धुंडावें. सुखस्वरूप असा मुख्य देव (निश्चळ परब्रह्म) हातीं लागल्यावर सुखाला काय कमी आहे? पण वेडे लोक विचार सोडून भलतीकडेच जातात. विवेकाचें फळ सुख व अविवेकाचें फळ दुःख, यांत आवडेल तें घ्या. कर्त्याला ओळखणें याचें नांव विवेक. विवेक सोडून बाकी सारें दुःखच आहे. कर्त्याला ओळखण्यांत स्वहित आहे त्याला चुकूं नये (१८–३०). [द० १३, स० ७]

ह्या चराचर सृष्टीचा-ब्रह्मांडाचा कर्ता कोण? या एका श्रोत्याच्या प्रश्नास अनेक सभासद आपापल्या मताप्रमाणें व

येक। या बोलण्याचें कौतुक। श्रोतीं सादरें ऐकावें ॥ २ ॥ येक म्हणती कर्ता देव। येक म्हणती कोण देव। आपुलाला अभिप्राव। बोलते जाले ॥ ३ ॥ उत्तम मध्यम कनिष्ठ। भावार्थें बोलती पष्ट। आपुलाली उपासना श्रेष्ठ। मानिती जनीं ॥ ४ ॥ कोणियेक ऐसें म्हणती। कर्ता देव मंगळमूर्ती। येक म्हणती सरस्वती। सर्व करी ॥ ५ ॥ येक म्हणती कर्ता भैरव। येक म्हणती खंडेराव। येक म्हणती बीरदेव। येक म्हणती भगवती ॥ ६ ॥ येक म्हणती नरहरी। येक म्हणती बनशंकरी। येक म्हणती सर्व करी। नारायणु ॥ ७ ॥ येक म्हणती श्रीराम कर्ता। येक म्हणती श्रीकृष्ण कर्ता। येक म्हणती भगवंत कर्ता। केशवराज ॥ ८ ॥ येक म्हणती पांडुरंग। येक म्हणती श्रीरंग। येक म्हणती झोटिंग। सर्व करी ॥ ९ ॥ येक म्हणती मुंज्या कर्ता। येक म्हणती सूर्य कर्ता। येक म्हणती अग्नि कर्ता। सकळ कांहीं ॥ १० ॥ येक म्हणती लक्ष्मी करी। येक म्हणती मारुती करी। येक म्हणती धरत्री करी। सर्व कांहीं ॥ ११ ॥ येक म्हणती तुकाई। येक म्हणती यमाई। येक म्हणती सटवाई। सर्व करी ॥ १२ ॥ येक म्हणती भार्गव कर्ता। येक म्हणती वामन कर्ता। येक म्हणती परमात्मा कर्ता। येकचि आहे ॥ १३ ॥ येक म्हणती विरंणा कर्ता। येक म्हणती बस्वंणा कर्ता। येक म्हणती रेवंणा कर्ता। सर्व कांहीं ॥ १४ ॥ कोणी म्हणती खळ्या कर्ता। येक म्हणती स्वामी कार्तिक कर्ता। येक म्हणती वेंकटेश कर्ता। सर्व कांहीं ॥ १५ ॥ येक म्हणती गुरु कर्ता। येक म्हणती दत्त कर्ता। येक म्हणती मुख्य कर्ता। वोब्या जगन्नाथ ॥ १६ ॥ येक म्हणती ब्रह्मा कर्ता। येक म्हणती विष्णु कर्ता। येक म्हणती महेश कर्ता। निश्चयेंसी ॥ १७ ॥ येक म्हणती पर्जन्य कर्ता। येक म्हणती वायो कर्ता। येक म्हणती करून अकर्ता। निर्गुण देव ॥ १८ ॥ येक म्हणती

संप्रदायाप्रमाणें उत्तर देण्यास सज्ज झाले. कर्ता कोण ? कर्ता कोण म्हणजे काय ? कर्ता देव ! पण देव कोणता ? यावर अनेक-जण अमुक देव श्रेष्ठ, अमुक मध्यम, व अमुक कनिष्ठ असें आपापल्या संप्रदायाच्या अभिमानानें बोलते झाले (१–४). कोणी गणेशकर्ता, कोणी शारदा सर्वकर्त्री, याप्रमाणें अनेकजण अनेक देवांचीं नांवें घेऊं लागले. भैरव, खंडेराव, बीरदेव, भगवती, नरहरि, बनशंकरी, नारायण, श्रीराम, श्रीकृष्ण, केशवराज, पांडुरंग, श्रीरंग, सूर्य, अग्नि, लक्ष्मी, मारुती, धरित्री, भार्गव, वामन, परमात्मा, कार्तिकस्वामी, रेवण्णा, बस्वणा, व्यंकटेश, दत्त, गुरु, विष्णु, ब्रह्मा, शंकर, पर्जन्य, वायु, माया, जीव, प्रारब्ध, प्रयत्न, स्वभाव, याप्रमाणें प्रत्येकाचे अभिमानी उठले, व आपापल्या उपास्याला सृष्टीचें कर्तृत्व देऊं लागले. त्यांत म्हसोबा, झोटिंग, मुंज्या इ० देवतांचे अभिमानीही बोलूं लागले. कोणी 'निर्गुण देव करून अकर्ता' असें म्हणणारे निघाले. कोणी 'कोण कर्ता

माया करी । येक म्हणती जीव करी । येक म्हणती सर्व करी । प्रारब्धयोग
॥ १९ ॥ येक म्हणती प्रत्न करी । येक म्हणती स्वभाव करी । येक म्हणती
कोण करी । कोण जाणे ॥ २० ॥ ऐसा कर्त्याचा विचार । पुसतां भरला
बाजार । आतां कोणाचें उत्तर । खरें मानावें ॥ २१ ॥ जेहीं जो देव
मानिला । कर्ता म्हणती तयाला । ऐसा लोकांचा गल्बला । वोसरेना
॥ २२ ॥ आपुल्या साभिमानें । निश्चयेंचि केला मनें । याचा विचार पाहणें ।
घडेचिना ॥ २३ ॥ बहु लोकांचा बहु विचार । अवघा राहों द्या बाजार ।
परंतु याचा विचार । ऐसा आहे ॥ २४ ॥ श्रोतीं व्हावें सावधान । निश्चयें
तोडावा अनुमान । प्रत्ययो मानावा प्रमाण । जाणते पुरुषीं ॥ २५ ॥ जें जें
कर्तयानें केलें । तें तें त्याउपरी जालें । कर्त्यापूर्वीं आडळलें । न पाहिजे कीं
॥ २६ ॥ केलें तें पंचभूतिक । आणि पंचभूताक ब्रह्मादिक । तरी भूतांशें
पंचभूतिक । केलें तें घडेना ॥ २७ ॥ पंचभूतांस वेगळें करावें । मग
कर्त्यास वोळखावें । पंचभूतिक तें स्वभावें । कर्त्यांत आलें ॥ २८ ॥ पंचभूतां-
वेगळें निर्गुण । तेथें नाहीं कर्तेपण । निर्विकारास विकार कोण । लावूं शके
॥ २९ ॥ निर्गुणास कर्तव्य न घडे । सगुण जाल्यांत सांपडे । आतां कर्तव्यता
कोणेकडे । बरें पाहा ॥ ३० ॥ लटिक्याचा कर्ता कोण । हें पुसणेंचि
अप्रमाण । म्हणोनि हेंचि प्रमाण । जें स्वभावेंचि जालें ॥ ३१ ॥ येक सगुण
येक निर्गुण । कोठें लावूं कर्तेपण । या अर्थाचें विवरण । बरें पाहा
॥ ३२ ॥ सगुणें सगुण केलें । तरी तें पूर्वीच आहे जालें । निर्गुणास
कर्तव्य लाविलें । न वचे कीं कदा ॥ ३३ ॥ येथें कर्ताचि दिसेना । प्रत्ययो
आणावा अनुमाना । दृश्य सत्यत्वें असेना । म्हणोनियां ॥ ३४ ॥ केलें तें

कोण जाणे ? ' याप्रमाणें कानावर हात ठेवूं लागले. ' कर्ता कोण ' हा प्रश्न विचारासाठीं निघाला तोंच कर्त्यांचा असा बाजार भरला. ज्यांनीं जो देव मानला त्याला ते कर्ता म्हणूं लागले. असा लोकांचा गलबला (गोंधळ) झाला. जाणत्यांनीं प्रत्यय प्रमाण मानून विचाराची तड लावली पाहिजे (५–२५). असो. आतां प्रत्ययाचा विचार सांगतों. जें जें कर्त्यानें केलें तें तें कर्त्याच्या नंतर झालें, कर्त्याच्या पूर्वी न झालें पाहिजे हें तर खरें ना ? कर्ता आधीं आणि तदुपरि कार्य हें कबूल केलें पाहिजे. जें जें केलें तें तें पंचभौतिक आहे आणि ब्रह्मादि सकळ देव पंचभौतिक आहेत, म्हणून या देवांकडे पंचभौतिक सृष्टीचें कर्तृत्व येऊं शकत नाहीं. पंचभौतिक ब्रह्मांड वेगळें करून मग कर्ता कोण तें पाहिलें पाहिजे. पंचभौतिक हें कार्य असल्यामुळें त्याचा कर्ता पंचभौतिकाहून निराळा पाहिजे हें स्पष्ट आहे. पंचभूतांहून निराळें एक निर्गुण निर्विकार ब्रह्म आहे; पण त्या निर्विकारास विकार कोण लावूं शकेल ? निर्गुणाकडे कर्तृत्व देतां येत नाहीं व सगुण झाल्यांत (झालें त्यांत, कार्यांत) आलें तेव्हां आतां कर्तृत्व कोणाला द्यायचें ? सृष्टि लटकी म्ह० माया मिथ्या हा जर सिद्धान्त आहे, तर मिथ्या सृष्टीचा कर्ता कोण म्हणून काय विचारावें ? दृश्य सत्य नाहीं, मिथ्या आहे म्हणून त्याचा कोणी नाहीं; सृष्टि स्वभावेंचि झाली. ती मिथ्या असल्यामुळें तिचा कर्ता कोणी नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. केलें तें सारें लटिकें म्हणून कर्ता कोणी

अवघेंचि लटिकें । तरी कर्ता हें बोलणेंचि फिकें । वक्ता म्हणे रे विवेकें । बरें पाहा ॥ ३५ ॥ बरें पाहातां प्रत्ययो आला । तरी कां करावा गल्बला । प्रचीत आलिया आपणाला । अंतर्यामीं ॥ ३६ ॥ आतां असो हें बोलणें । विवेकी तोचि हें जाणे । पूर्वपक्ष लागे उडवणें । येरवी अनिर्वाच्य ॥ ३७ ॥ तंव श्रोता करी प्रश्न । देहीं सुखदुःखभोक्ता कोण । पुढें हेंचि निरूपण । बोलिलें असे ॥ ३८ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे कर्तानिरूपणनाम समास अष्टम ॥ ८ ॥

॥ श्रीराम ॥ आत्मयास शरीरयोगें । उद्वेग चिंता करणें लागे । शरीरयोगें आत्मा जगे । हें तों प्रगटचि आहे ॥ १ ॥ देह अन्नचि खायेना । तरी आत्मा कदापी जगेना । आत्म्याविण चेतना । देहास कैंची ॥ २ ॥ हें येकावेगळें येक । करूं जातां निरर्थक । उभययोगे कोणीयेक । कार्य चाले ॥ ३ ॥ देहाला नाहीं चेतना । आत्म्यास पदार्थ उचलेना । स्वप्नभोजनें भरेना । पोट कांहीं ॥ ४ ॥ आत्मा स्वप्नअवस्थेंत जातो । परंतु देहामध्येंहि असतो । निदसुरेपणें खाजवितो । चमत्कार पाहा ॥ ५ ॥ अन्नरसें वाढे शरीर । शरीरप्रमाणें विचार । वृद्धपणीं तदनंतर । दोनी लाहानाळती ॥ ६ ॥ उन्मत्त द्रव्य देह खातो । देहयोगें आत्मा भुलतो । विस्मरणें शुद्धि सांडितो । सकळ कांहीं ॥ ७ ॥ देहानें घेतलें वीष । आत्मा जाय सावकास । वाढणें मोडणें आत्मयास । नेमस्त आहे ॥ ८ ॥ वाढणें मोडणें जाणें येणें । सुखदुःख देहाचेनि गुणें । नाना प्रकारें भोगणें । आत्मयास घडे ॥ ९ ॥ वारुळ म्हणिजे पोकळ । मुंग्यांचे मार्गचि सकळ । तैसेंचि हें केवळ । शरीर जाणावें

दिसत नाहीं, हा जर प्रत्यय येतो तर उगाच उपासनेचा मिथ्या अभिमान घेऊन अमुक कर्ता म्हणून म्हणण्यांत काय अर्थ? सृष्टि मिथ्या व मिथ्याचा कर्ता कोणी नाहीं असा अंतरीं प्रत्यय येतो. हें विवेकाचें बोलणें आहे. पूर्वपक्ष उडवायला पाहिजे म्हणून अनेक कर्ते उभे केले. तत्त्वतः पाहतां 'अरे जे जालेंचि नाहीं.' त्याचा कर्ता कोण आढळणार? (२६–३७) हें उत्तर ऐकून एका श्रोत्यानें प्रश्न केला कीं कर्ता कोणी नाहीं तर मग देहीं जें सुख दुःख होतें त्याचा भोक्ता कोण? याचें उत्तर पुढें देतों (३८). [द० १३, स० ८]

शरीराचा योग घडल्यामुळें आत्म्यास दुःखचिंता कराव्या लागतात, व तो शरीरामुळेंच जगतो हें उघड आहे. देह अन्न खाणार नाहीं तर आत्मा जगणार नाहीं व आत्म्यावांचून देहाला चेतनाही नाहीं. एकावीण एक व्यर्थ आहे, उभय योगानें कार्य चालतें. देहास चेतना नाहीं, आत्म्याला पदार्थ उचलत नाहीं, स्वप्नभोजनानें कांहीं पोट भरत नाहीं. आत्मा स्वप्नांत व जागृतींत असतो, झोपेंत अंग खाजवितो. अन्नरसानें शरीर वाढतें, शरीराबरोबर विचार वाढतो, वृद्धपणीं शरीर व विचार दोन्ही क्षीण होतात. उन्मत्त द्रव्य सेवन करणाऱ्या देहाच्या संगतीनें आत्मा भुलतो व स्वतःची शुद्धि सोडतो. देहानें विष घेतलें कीं आत्मा जातो. वाढणें, मोडणें, येणेंजाणें, सुखदुःख भोगणें हें देहामुळें आत्म्यास आहे. मुंग्यांचे मार्गांमुळें पोकळ बनलेल्या वारुळासारखाच देह पोकळ आहे. शरीरांत नाड्यांची गर्दी, नाड्यांत पोकळ वाटा, शरीर म्ह० लहान मोठ्या नाड्यांचा ए॰

॥ १० ॥ शरीरीं नाडीचा खेटा । नाडीमध्यें पोकळ वाटा । लहानथोर सगटा । दाटल्या नाडी ॥ ११ ॥ प्राणी अन्नोदक घेतो । त्याचा अन्नरस होतो । त्यास वायो प्रवर्ततो । श्वासोच्छ्वासें ॥ १२ ॥ नाडिद्वारा धांवे जीवन । जीवनामध्यें खेळे पवन । त्या पवनासरिसा जाण । आत्माहि विवरे ॥ १३ ॥ तृषेनें शोकलें शरीर । आत्म्यास कळे हा विचार । मग उठवून शरीर । चालवी उदकाकडे ॥ १४ ॥ उदक मागे शब्द बोलवी । मार्ग पाहोन शरीर चालवी । शरीर अवघेंच हालवी । प्रसंगानुसार ॥ १५ ॥ क्षुधा लागते ऐसें जाणतो । मग देहाला उठवितो । आच्यावाच्या बोलवितो । ज्यासी त्यासी ॥ १६ ॥ बायकांत म्हणे जालें जालें । देह सोवळें करून आणिलें । पायांत भरून चालविलें । तांतडीतांतडी ॥ १७ ॥ त्यासी पात्रावरी बैसविलें । नेत्रीं भरोन पात्र पाहिलें । हाताकरवीं आरंभिलें । आपोशन ॥ १८ ॥ हाताकरवीं ग्रास उचलवी । मुखीं जाऊन मुख पसरवी । दांताकरवीं चाववी । नेटें नेटें ॥ १९ ॥ आपण जिव्हेमध्यें खेळे । पाहातो परिमळसोहळे । केंस काडी खडा कळे । तत्काळ थुंकी ॥ २० ॥ आळणी कळतां मीठ मागे । बायलेसी म्हणे आगे कांगे । डोळे तात्रून पाहों लागे । रागें रागें ॥ २१ ॥ गोडी लागतांच आनंदे । गोड नस्तां परम खेदे । वांकडी गोष्टी अंतरीं भेदे । आत्मयासी ॥ २२ ॥ नाना अन्नाची गोडी । नाना रसें स्वाद निवडी । तिखट लागतां मस्तक झाडी । आणी खोंकी ॥ २३ ॥ मिरपुडी घातली फार । कायसें करितें खापर । जिव्हेकरवीं कठिणोत्तर । बोलवी रागें ॥ २४ ॥ आज्य उदंड जेविला । सवेंच तांब्या उचलिला । घळघळां घेऊं लागला । सावकास ॥ २५ ॥ देहीं सुखदुःखभोक्ता । तो येक आत्माचि पाहातां । आत्म्याविण देह वृथा । मडें होय ॥ २६ ॥ मनाच्या अनंत वृत्ति । जाणणें

जुडगाच आहे. शरीरांत अन्नरस तयार होतो, त्यास श्वासोच्छ्वासाचे द्वारें वायु खेळवितो. नाडिद्वारें उदक धांवतें व त्या उदकांत वायु खेळत असून त्याबरोबर आत्माही वावरतो. तहानेनें शरीर शुष्क झालें हें आत्म्यास कळतें, आत्मा शरीराला पाण्याकडे नेतो, पाणी मागतो, शब्द बोलवतो, मार्ग पाहून शरीर नदीकडे नेतो; तात्पर्य, प्रसंगानुसार आत्माच शरीर चालवितो. तोच आच्यावाच्या बोलवतो (१–१६). स्वयंपाक झालासें बायकोला विचारून सोवळें नेसणें, घाईघाईनें पाटावर बसणें, वाढप पाहणें, हाताकडून आपोशन घेणें, घांस उचलून तोंड उघडून खाणें, दांतांनीं चावणें, जिव्हेनें रसास्वाद घेणें, गोड लागतांच हर्ष पावणें व तिखट खारट लागतांच बायकोच्या अंगावर 'किती मिरपूड घातलीस ही, खापरी घरांत काय करीत होती' याप्रमाणें खेंकसून कठिण बोलणें, तूप फार गेल्यावर तांब्या तोंडाला लावणें व घळघळां पाणी पिणें; तात्पर्य, आरंभापासून अखेरपर्यंतचीं सर्व कर्में करणें व करविणें–हें आत्माच करितो, सुखदुःखभोक्ता आत्माच व त्यावांचून देह प्रेतच होय. मनाच्या अनंत वृत्ति जाणणें हा आत्म्याचा धर्म होय. ब्रह्मांडीं जितके प्राणी तितक्यांच्या

तेचि आत्मस्थिति । त्रैलोकीं जितुक्या व्यक्ती । तदंतरीं आत्मा ॥ २७ ॥ जगामध्यें जगदात्मा । विश्वामध्यें विश्वात्मा । सर्व चालवी सर्वात्मा । नानारूपें ॥ २८ ॥ हुंगे चाखे ऐके देखे । मृदु कठिण वोळखे । शीत उष्ण ठाउकें । तत्काळ होय ॥ २९ ॥ सावधपणें लाघवी । बहुत करी उठाठेवी । या धूर्ताच्या उगवी । धूर्तचि करी ॥ ३० ॥ वायोसरिसा परिमळ येतो । परी तो परिमळ वितळोन जातो । वायो धुळी घेउनी येतो । परी तेहि जाय ॥ ३१ ॥ शीत उष्ण वायोसरिसें । सुवासें अथवा कुवासें । असिजे परी सावकासें । तगणें न घडे ॥ ३२ ॥ वायोसरिसे रोग येती । वायोसरिसीं भूतें धांवती । धूर आणि धुकटें येती । वायोसवें ॥ ३३ ॥ वायोसवें कांहींच जगेना । आत्म्यासवें वायो तगेना । आत्म्याची चपळता जाणा । अधिक आहे ॥ ३४ ॥ वायो कठिणास आडतो । आत्मा कठिण भेदून जातो । कठिण पाहों तरी तो । छेदेचिना ॥ ३५ ॥ वायो झडझडां वाजे । आत्मा कांहींच न वाजे । मौनेंचि अंतरीं समजे । विवरोन पाहतां ॥ ३६ ॥ शरीरास बरें केलें । तें आत्मयास पावलें । शरीरयोगें जालें । समाधान ॥ ३७ ॥ देहावेगळे उपाय नाना । करितां आत्मयास पावेना । समाधान पावे वासना । देहाचेनि ॥ ३८ ॥ देहआत्मयांचें कौतुक । पाहों जातां हें अनेक । देहावेगळी आडणुक । आत्मयास होय ॥ ३९ ॥ येक अस्तां उदंड घडे । वेगळें पाहतां कांहींच न घडे । विवेकें त्रिलोकीं पवाडे । देहात्मयोगें ॥ ४० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आत्माविवरणनाम समास नवम ॥ ९ ॥

अंतरीं एक आत्मा आहे (१७–२७). जगांत वावरतो म्हणून जगदात्मा, विश्वीं खेळतो म्हणून विश्वात्मा व सर्वांघटीं नांदतो म्हणून त्याला सर्वात्मा म्हणतात. हुंगे, चाखे, ऐके, देखे, मृदुकठिण ओळखे, शीत उष्ण जाणे, सावधपणें नाना उठाठेवी करी, सर्व कांहीं आत्मा करितो. अशा धूर्त आत्म्याला ओळखणारा धूर्तच पाहिजे (२८–३०). आतां वायु अतिचपळ पण आत्म्यापुढें वायुही उणाच होय कसें तें पहा. वायु सुगंध आणतो पण लगेच सुगंध वितळून जातो ; वायु धूळ आणतो पण तीही उडून जाते ; वायु शीत उष्ण, सुगंध दुर्गंध सर्व कांहीं आणतो पण कांहींच उरत नाहीं ; वायूसंगें रोग येतात, भूतें येतात, धूर व धुकें येतात, पण कांहींही वायुबरोबर जगत नाहीं ; पण आत्म्यापुढें मात्र वायूची मात्रा चालत नाहीं, आत्मा वायूपेक्षां कितीतरी अधिक चपळ आहे. कठिण पदार्थ आड आला कीं वायु अडलाच, पण कसलाही कठिण पदार्थ भेदून आत्मा पार जातो. यावरून तो कठिण आहे म्हणाल पण तो अच्छेद्य आहे, कोणीही त्याला छेदूं शकत नाहीं. वायु स्थूल म्हणून झडझडां वाजतो, आत्मा निःशब्द आहे, म्हणून निवांत बसून विवरून पाहिल्यानें मात्र तो अंतरीं समजून जातो (३१–३६). शरिरास सुख दिलें कीं आत्मा सुखावतो. देहावेगळे कांहींही उपाय केले तरी ते आत्म्यास पावत नाहींत, वासना देहाच्या योगेंच तृप्त होते. देह व आत्मा यांचें कौतुक वर्णन करावें तितकें थोडेंच आहे, देहांवांचून आत्म्याचें अडतें. देह व आत्मा यांचा संयोग असेल तर हवें तें घडतें, वेगळेपणानें दोघांच्याही (कुडी व आत्मा) हातून कांहींच होत नाहीं. उभयसंयोगामुळें विवेकी पुरुष ब्रह्मांडाचा विचार करून मुक्त होतो (३७–४०).[द० १३, स० ९].

॥ श्रीराम ॥ पालेमाळा सुमनमाळा । फळमाळा बीजमाळा । पाषाणमाळा कवडेमाळा । सूत्रें चालती ॥ १ ॥ स्फटिकमाळा मोहरेमाळा । काष्ठमाळा गंधमाळा । धातुमाळा रत्नमाळा । जाळ्या वेली चांदोवे ॥ २ ॥ परी हें तंतूनें चालतें । तंतु नस्तां विष्कळित होतें । तैसें म्हणों आत्मयातें । तरी साहित्य न पडे ॥ ३ ॥ तंतूस मणी वोविला । तंतूमध्येंचि राहिला । आत्मा सर्वांगीं व्यापला । पाहाना कां ॥ ४ ॥ आत्मा चपळ सहजगुणें । दोरी काय चळों जाणे । म्हणोनी दृष्टांत देणें । विहित नव्हे ॥ ५ ॥ नाना वल्लींत जळांश । उसांमध्यें दाटला रस । परी तो रस आणी बाकस । येक नव्हे ॥ ६ ॥ देही आत्मा देह अनात्मा । त्याहून पर तो परमात्मा । निरंजनास उपमा । असेचिना ॥ ७ ॥ रायापासून रंकवरी । अवघ्या मनुष्यांचिया हारी । सगट समान सरी । कैसी करावी ॥ ८ ॥ देव दानव मानव । नीच योनी हीन जीव । पापी सुकृति अभिप्राव । उदंड आहे ॥ ९ ॥ येकांशें जग चाले । परी सामर्थ्य वेगळालें । येकासंगें मुक्त केलें । येकासंगें रवरव ॥ १० ॥ साकर माती पृथ्वी होय । परी ते माती खातां नये । गरळ आप नव्हे काय । परी तें खोटें ॥ ११ ॥ पुण्यात्मा आणी पापात्मा । दोहींकडे अंतरात्मा । साधु भोंदु सीमा । सांडूंच नये ॥ १२ ॥ अंतर येक तों खरें । परी सांगातें घेऊं न येती माहारें । पंडित आणि चाटें पोरें । येक कैसीं ॥ १३ ॥ मनुष्य आणि गधडे । राजहंस आणि कोंबडें । राजे आणि माकडें । येक कैसीं ॥ १४ ॥ भागीरथीचें जळ आप । मोरी संवदणी तेंहि आप । कुश्चिळ

माळांचे अनेक प्रकार आहेत. पानांच्या (तुळशीच्या वगैरे), फुलांच्या, फळांच्या, बियांच्या, पाषाणांच्या, कवड्यांच्या, तशाच स्फटिकांच्या, मोहरा नांवाच्या औषधी मण्यांच्या, काष्ठांच्या, गंधाच्या, धातूंच्या, रत्नांच्या इ० अनेक प्रकारच्या माळा, जाळ्या, वेल, चांदवे वगैरे किती तरी प्रकार आहेत, पण यांच्या आंतून जो दोरा ओंवलेला असतो त्यावर या चालतात, आंत सूत्र नसेल तर त्या विस्कळित होतात. त्याप्रमाणें पदार्थमात्राच्या आंतून आत्मतंतु आहेत. (सूत्रे मणिगणा इव). तंतु मण्याच्या आंत मात्र असतो, पण आत्मतंतु अंतर्बाह्य व्यापून असतो ; तसेंच आत्मा चपळ आहे व दोरी निर्जीव आहे म्हणून हा दृष्टांत अपूर्ण आहे. वेलींत जळांश व उंसांत रस दाट भरला असतो, पण रस व चिपाडें एक नव्हेत. देह अनात्मा व देही आत्मा पण त्याहून परमात्मा पलीकडचा आहे, त्या निरंजनाला द्यायला उपमाच नाहीं (१–७). राजापासून रंकापर्यंत सारीं माणसेंच, पण तीं सारीं काय एका पंक्तीला बसवितां येतील ? सरसगट सारखीं कशीं म्हणावीत ? देव, दानव, मानव, उंच नीच योनि ; उत्तम अधम जीव ; पापी पुण्यवंत इ० अनेक भेद आहेतच. एकांशें जग चाले हें देवाचें म्हणणें खरेंच आहे, पण सामर्थ्य वेगळालें आहे ; एकाच्या संगतीनें मोक्ष मिळतो व एकाच्या संगतीनें रौरव नरकाला जीव जातो ! साखर व माती दोनी पृथ्वीच म्हणून कांहीं कोणी माती खात नाहीं ; विष व पाणी दोन्ही आपच, पण विष पितां येत नाहीं ; पुण्यवंत व पापी या दोघांतही एकच अंतरात्मा पण साधु व भोंदू हा भेद आहेच ; ब्राह्मण व महार दोघांत एकच आत्मा, पण एक पंगत करितां येत नाहीं ; पंडित व चावट पोरें, माणसें व गाढवें, राजहंस आणि कावळे, राजे आणि माकडें (दोघे उंचावर बसतात म्हणून), गंगाजळ

उदक अल्प सेववेना ॥ १५ ॥ याकारणें आचारशुद्ध । त्याउपरी विचारशुद्ध । वीतरागी आणि सुबुद्ध । ऐसा पाहिजे ॥ १६ ॥ शूरांहून मानिलें लंडी । तरी युध्यप्रसंगीं नरकाडी । श्रीमंत सांडून बराडी । सेवितां कैसें ॥ १७ ॥ येका उदकें सकळ जालें । परी पाहोन पाहिजे सेविलें । सगट अवघेंच घेतलें । तरी तें मूर्खपण ॥ १८ ॥ जीवनाचेंच जालें अन्न । अन्नाचें जालें वमन । परी वमनाचें भोजन । करितां न ये ॥ १९ ॥ तैसें निंद्य सोडून द्यावें । वंद्य तें हृदईं धरावें । सत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ ॥ २० ॥ उत्तमासी उत्तम माने । कनिष्ठांस तें न माने । म्हणोनी करंटे देवानें । करून ठेविले ॥ २१ ॥ सांडा अवघें करंटपण । धरावें उत्तम लक्षण । हरिकथापुराणश्रवण । नीतिन्याय ॥ २२ ॥ वर्तायाचा विवेक । राजी राखणें सकळलोक । हळुहळु पुण्यश्लोक । करीत जावें ॥ २३ ॥ मुलाचे चालीनें चालावें । मुलाच्या मनोगतें बोलावें । तैसें जनासी सिकवावें । हळुहळु ॥ २४ ॥ मुख्य मनोगत राखणें । हेंचि चातुर्याचीं लक्षणें । चतुर तो चतुरांग जाणे । इतर तीं वेडीं ॥ २५ ॥ वेड्यास वेडे म्हणों नये । वर्म कदापि बोलों नये । तरीच घडे दिग्विजय । निस्पृहासी ॥ २६ ॥ उदंडस्थळीं उदंडप्रसंग । जाणोनि करणें यथासांग । प्राणिमात्रांचा अंतरंग । होऊन जावें ॥ २७ ॥ मनोगत राखोन जातां । परस्परें होय अवस्था । मनोगत तोडितां व्यवस्था । बरी नाहीं ॥ २८ ॥ याकारणें मनोगत । राखेल तो मोठा महंत । मनोगत राखतां समस्त । ओढोन येती ॥ २९ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सिकवणनिरूपणनाम समास दशम ॥ १० ॥

व मोरी-डबक्याचें पाणी हीं सारीं एक होतील काय? म्हणून आचारशुद्ध, विचार निर्मळ, वैराग्यशील व सुबुद्ध अशा थोरांची कोटी कांहीं वेगळीच होते. शूरांहून भ्याडाचा अधिक गौरव केला तर युद्धप्रसंगीं फजीतवाडा (नरकाडी) ठेवलेलाच. श्रीमत सोडून दरिद्र्याची सेवा केली तर फळ काय ? एका उदकानें सर्व झालें आहे, पण तें पाहून घेतलें पाहिजे. सरसकट दिसेल तें पिऊं लागलें तर मूर्खत्व होईल. पाण्यापासून अन्न होतें, अन्नापासून वमन होतें म्हणून कोणी वमन कांहीं खात नाहीं. त्याप्रमाणें जें जें निंद्य आहे तें सोडून वंद्य तेवढेंच घ्यावें व सत्कीर्तीनें विश्व भरावें (८–२०). उत्तमाला उत्तम आवडतें, कनिष्ठाला तें आवडत नाहीं म्हणून देवानें ह्या जगांत त्यांना करंटे केले आहेत. करंटेपण टाकून द्या, हरिकथापुराणश्रवण, न्यायनीतीनें वागणें, विवेकानें चालणें, सर्व लोक राजी राखून त्यांना हळुहळू पुण्यवंत करणें, हे उत्तम गुण घ्या. मुलांच्या चालीनें चालून त्यांच्या मनोगताप्रमाणें वागावें लागतें तेव्हांच त्यांचें मत हातीं येतें; त्याप्रमाणें लोकांनाही हळुहळू शिकवावें. मनोगत राखणें हें चातुर्याचें मुख्य लक्षण होय. चतुर पुरुष सर्वांगें जाणतो (चतुरंग म्ह० सामदामादि प्रकार), इतर वेडे बहुत आहेत. वेड्याला वेडा म्हणूं नये, कोणाचें वर्म काढून मन दुखवूं नये, तरच निस्पृहाला दिग्विजय घडतो. हजारों स्थळीं हजारों प्रसंग पडतात, ते ते जाणून सर्व प्राण्यांचा अंतरात्मा होऊन जावें म्ह० सर्वप्रिय व्हावें. मनोगत राखूं गेल्यानें परस्पर प्रेमोत्कंठा (अवस्था) वाढते; मनोगत तोडल्यानें परिणाम ठीक होत नाहीं म्हणून मनोगत राखेल तोच महंतपणाला योग्य होय, मनोगत राखतां आल्यानें सर्वांच्या चित्ताचें आकर्षण होतें (२१–२९).

[द० १३, स० १०]

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ सार्थ श्रीदासबोध ॥

॥ अखंडध्याननाम दशक चौदावा ॥ १४ ॥

॥ श्रीराम ॥ ऐका निस्पृहाची सिकवण । युक्ति बुद्धि शहाणपण । जेणें राहे समाधान । निरंतर ॥ १ ॥ सोपा मंत्र परी नेमस्त । साधें औषध गुणवंत । साधें बोलणें सप्रचीत । तैसें माझें ॥२॥ तत्काळचि अवगुण जाती । उत्तम गुणाची होय प्राप्ती । शब्दऔषध तीव्र श्रोतीं । साक्षेपें सेवावें ॥ ३ ॥ निस्पृहता धरूं नये । धरिली तरी सोडूं नये । सोडिली तरी हिंडों नये । वोळखीमध्यें ॥ ४ ॥ कांता दृष्टी राखों नये । मनास गोडी चाखवूं नये । धारिष्ट चळतां दाखवूं नये । मुख आपलें ॥ ५ ॥ येके स्थळीं राहों नये । कानकोंडें साहों नये । द्रव्य दारा पाहों नये । आळकेपणें ॥ ६ ॥ आचारभ्रष्ट होऊं नये । दिल्यां द्रव्य घेऊं नये । उणा शब्द येऊं नये । आपणावरी ॥ ७ ॥ भिक्षेविषीं लाजों नये । बहुत भिक्षा घेऊं नये । पुसतांही देऊं नये । वोळखी आपली ॥ ८ ॥ धड मळिण नेसों नये । गोड अन्न खाऊं नये । दुराग्रह करूं नये । प्रसंगें वर्तावें ॥ ९ ॥ भोगीं मन असों नये । देहदुःखें त्रासों नये । पुढें आशा धरूं नये । जीवित्वाची ॥ १० ॥ विरक्ती गळों देऊं

येथून पुढें निस्पृहाची शिकवण, युक्ति, बुद्धि, व शहाणपण कसें असायला पाहिजे तें सांगतों. तें ऐकून समाधान वाटेल. मंत्र सोपा पण हटकून सिद्धि देणारा, औषध साधें पण प्रचीतीचें, तसें माझें बोलणें साधें पण अनुभवशीर आहे. अंगांतले दुर्गुण पार झडून जातील व उत्तम गुण अंगीं बाणतील, मात्र माझें हें शब्दरूप तीव्र औषध आळस झाडून श्रोत्यांनीं घेतलें पाहिजे (१–३). निस्पृहानें या गुणांचा अभ्यास अवश्य केला पाहिजे–आधीं निस्पृहता धरूं नये, धरिली तर सोडूं नये व सोडली तर ओळखीच्या लोकांत फिरूं नये (४). कांतादृष्टी (स्त्रीविषयआळकेपणाची, लोलुपतेची दृष्टी) ठेवूं नये, स्त्रीभोग मनानेंही घेऊं नये, तद्विषयक गोडी मनाला दाखवूं नये. धैर्यानें मन आवरावें पण क्वचित पाय घसरलाच तर पुन्हां जनांत तोंड दाखवायला येऊं नये. दरी–खोऱ्यांत एकान्तांत जाऊन तोंड काळें करावें ; तात्पर्य कांताविषय पुरा जिंकलेला असेल तरच निस्पृह म्हणून पुढें यावें (५). एके ठिकाणीं (एका गांवीं किंवा एका घरीं) दीर्घ काळ कानकोंडें होऊन राहूं नये. अभिलाषबुद्धीनें कनककांता यांजकडे पाहूं नये, आचारभ्रष्ट होऊं नये, कोणी देऊं लागले तरी द्रव्य घेऊं नये (मागूं नये हे सांगणें नकोच), कोणाचाही उणा शब्द आपल्यावर येईल असें ढिलाईनें वागूं नये. भिक्षावृत्तीची लाज धरूं नये, लोभानें फार भिक्षा घेऊं नये, कोणीं विचारिलें तरी आपली ओळख देऊं नये. अगदीं परीटघडी वस्त्र किंवा मळिण वस्त्र दोन्हीं नसावींत तर साधीं व स्वच्छ वस्त्रें असावींत, गोड अन्न (पक्वान्नें) खाऊं नये ; कांकीं तेणें जीभ चटावते व विकार बळावतात, दुराग्रह धरून बसूं नये तर प्रसंगानुसार वागावें. मन भोगासक्त होऊं देऊं नये, देहकष्टाला कंटाळूं नये, जगण्याची आशा धरूं नये (व मरणासही भिऊं नये). विवेक व धैर्य अढळ ठेवावें. विवेक

नये । धारिष्ट चळों देऊं नये । ज्ञान मळिण होऊं नये । विवेकबळें ॥११॥ करुणाकीर्तन सोडूं नये । अंतर्ध्यान मोडूं नये । प्रेमतंतु तोडूं नये । सगुणमूर्तीचा ॥ १२ ॥ पोटीं चिंता धरूं नये । कष्टें खेद मानूं नये । समई धीर सांडूं नये । कांहीं केल्या ॥ १३ ॥ अपमानितां सिणो नये । निखंदितां कष्टों नये । धिःकारितां झुरों नये । कांहीं केल्या ॥ १४ ॥ लोकलाज धरूं नये । लाजवितां लाजों नये । खिजवितां खिजों नये । विरक्त पुरुषें ॥ १५ ॥ शुद्धमार्ग सोडूं नये । दुर्जनासी तंडों नये । संबंध पडों देऊं नये । चांडाळासी ॥ १६ ॥ तपीळपण धरूं नये । भांडवितां भांडों नये । उडवितां उडवूं नये । निजस्थिती आपुली ॥ १७ ॥ हांसवितां हासों नये । बोलवितां बोलों नये । चालवितां चालों नये । क्षणक्षणा ॥ १८ ॥ येक वेष धरूं नये । येक साज करूं नये । येकदेसी होऊं नये । भ्रमण करावें ॥ १९ ॥ सलगी पडो देऊं नये । प्रतिग्रह घेऊं नये । सभेमध्यें बैसों नये । सर्व काळ ॥ २० ॥ नेम अंगीं लावूं नये । भरंवसा कोणास देऊं नये । अंगिकार करूं नये । नेमस्तपणाचा ॥ २१ ॥ नित्यनेम सांडूं नये । अभ्यास बुडों देऊं नये । परतंत्र होऊं नये । कांहीं केल्या ॥ २२ ॥ स्वतंत्रता मोडूं नये । निरापेक्षा तोडूं नये । परापेक्षा होऊं नये । क्षणक्षणा ॥ २३ ॥ वैभव दृष्टीं पाहों नये । उपाधीसुखें राहों नये । येकांत मोडूं देऊं नये । स्वरूपस्थितीचा ॥ २४ ॥ अनर्गळता करूं नये । लोकलाज धरूं नये । कोठेंतरी होऊं नये । आसक्त कदा ॥ २५ ॥ परंपरा तोडूं नये । उपाधी मोडूं देऊं नये । ज्ञानमार्ग सोडूं नये । कदाकाळीं ॥ २६ ॥ कर्ममार्ग सांडूं नये । वैराग्य मोडूं देऊं

जागृत ठेवून ज्ञान मळिण होऊं देऊं नये. करुणाकीर्तन (देवाला ज्यांत आळवितों, व त्याची करुणा भाकतों असें कीर्तन) सोडूं नये, अंतरध्यान मोडूं नये व सगुण प्रेम रक्षून बोलावें (६–१२). चिंता व कष्ट पडतात म्हणून खेद करूं नये. कसलाही प्रसंग आला तरी धैर्य सोडूं नये, कोणीं अपमान निंदा किंवा धिक्कार केला तर चित्त अभंग ठेवावें. नीतिमार्गानें चालत असतां लोकलाज धरूं नये. कोणीं खिजविलें तरी विरक्तानें खिजूं नये. शुद्धमार्ग सोडूं नये. दुर्जन ओळखून जावें पण त्यांशीं वाद घालीत बसूं नये. त्यांशीं संबंधच टाळावा. रागीटपणा (तपीळपणा) नसावा. आत्मस्थितीची बैठक स्थिर ठेवावी. परप्रेरणेनें हसूं बोलूं नये. एकच वेष धरूं नये, एकाच देशांत राहूं नये, निरंतर परिभ्रमण करावें. फार सलगी नसावी, प्रतिग्रह म्ह० दान घेऊं नये, सर्वदा लोकसमूहांत (सभेंत) बसूं नये. म्ह० कांहीं काळ तरी एकान्तांत घालवावा, नित्यनेमावांचून राहूं नये, नित्यनेम सोडूं नये पण नियमाचे बंदिस्तही होऊं नये, (परमार्थाचा) अभ्यास सोडूं नये, कांहीं झालें तरी परतंत्र होऊं नये. स्वतंत्रता सोडून क्षणक्षणा दुसऱ्याची अपेक्षा करीत बसूं नये. निरपेक्षता सोडूं नये. डोळ्यांनीं वैभव पाहूं नये (वैभव प्राप्त व्हावें अशी लालसा उत्पन्न होण्याचा संभव म्हणून), उपाधीच्या सुखांत गुरफटून राहूं नये, स्वरूपस्थितीचा एकांत मोडूं नये. (स्वरूपानुसंधान अखंड राखावें). स्वच्छंदानें वागूं नये, कोठेंही आसक्त होऊं नये, परंपरा तोडूं नये, उपासनेच्या कर्माची उपाधि सोडून बसूं नये. कर्म, ज्ञान, वैराग्य, उपासना,

नये । साधन भजन खंडूं नये । कदा काळीं ॥ २७ ॥ अतिवाद करूं नये । अनीती पोटीं धरूं नये । रागें भरीं भरों नये । भलतीकडे ॥ २८ ॥ न मानी त्यास सांगों नये । कंटाळवाणें बोलों नये । बहुसाल असों नये । येके स्थळीं ॥ २९ ॥ कांहीं उपाधी करूं नये । केली तरि धरूं नये । धरिली तरी सांपडों नये । उपाधीमध्यें ॥ ३० ॥ थोरपणें असों नये । महत्व धरून बैसों नये । कांहीं मान इच्छूं नये । कोठेंतरी ॥ ३१ ॥ साधेपण सोडूं नये । सानेपण मोडूं नये । बळात्कारें जोडूं नये । अभिमान आंगीं ॥३२॥ अधिकारेंवीण सांगों नये । दाटून उपदेश देऊं नये । कानकोंडा करूं नये । परमार्थ कदा ॥३३॥ कठिण वैराग्य सोडूं नये । कठिण अभ्यास सोडूं नये । कठिणता धरूं नये । कोणेकेविषईं ॥ ३४ ॥ कठिण शब्द बोलों नये । कठिण आज्ञा करूं नये । कठिणता धरूं नये । कांहीं केल्या ॥ ३५ ॥ आपण आसक्त होऊं नये । केल्यावीण सांगों नये । बहुसाल मागों नये । शिष्यवर्गासी ॥ ३६ ॥ उद्धट शब्द बोलों नये । इंद्रियस्मरण करूं नये । शाक्तमार्गें भरों नये । मुक्तपणें भरीं ॥ ३७ ॥ नीच कृतीं लाजों नये । वैभव होतां माजों नये । क्रोधें भरीं भरों नये । जाणपणें ॥ ३८ ॥ थोरपणें चुकों नये । न्यायनीति सांडूं नये । अप्रमाण वर्तों नये । कांहीं केल्या ॥ ३९ ॥ कळल्यावीण बोलों नये । अनुमानें निश्चय करूं नये । सांगतां दुःख धरूं नये । मूर्खपणें ॥ ४० ॥ सावधपण सोडूं नये । व्यापकपण सांडूं नये । कदा सुख मानूं नये । निसुगपणाचें ॥ ४१ ॥ विकल्प पोटीं धरूं नये । स्वार्थआज्ञा करूं नये । केली तरी टाकूं नये । आपणास पुढें ॥४२॥ प्रसंगेंवीण बोलों नये । अन्वयेंवीण गाऊं नये ।

साधन-भजन सोडूं नये, दृढ धरावे. अतिवाद करूं नये. अनीति पोटीं धरूं नये, रागानें भलत्या हट्टास पेटूं नये. जो मानीत नाहीं त्यास सांगूं नये. पाल्हाळ बोलत बसूं नये. उपाधी वाढवूं नये, वाढली तरी चित्तांत उपाधीची आसक्ति धरूं नये, उपाधींत सांपडूं नये. थोरपण किंवा महत्त्व धरून बसूं नये, मानाची इच्छा बाळगूं नये, लहानपण धरून वागावें. साधेपणा असावा. अधिकार नसतां बळेंच कोणास उपदेश देऊं नये. परमार्थ कानकोंडा करूं नये म्ह० कोपऱ्यांत न टाकतां परमार्थाचें महत्त्व वाढवावें (१३–३३). वैराग्य, अभ्यास, धैर्य हे कठिण म्ह० अभंग असावेत, पण हृदय, शब्द हे कठिण नसावे. केल्याबांचून सांगूं नये, शिष्यांपाशीं फारसें कांहीं मागूं नये. इंद्रियस्मरण करूं नये कां कीं त्यामुळें कामादि विकार बळावून मन विषयी होतें. मी मुक्त अशा डौलानें शाक्तमार्ग (स्वच्छंदाचरणाचा मार्ग) धरूं नये, देवसंतसेवाप्रसंगीं नीच सेवेस लाजूं नये, वैभव आल्यास उन्मत्त होऊं नये, जाणतेपणाच्या अभिमानानें क्रोधाधीन होऊं नये, थोरपणाच्या डौलानें सज्जनरीतींत चुकूं नये, प्रमाणरहित वागूं नये, अनुमानानें निश्चय करूं नये, अनुभवानें करावा, कोणी चांगली गोष्ट सांगितल्यास दुःख मानूं नये. सावधपणा (इंद्रियविकार प्रबळ न होतील असें दक्ष असावें), व्यापकपण (ब्रह्मांडाहून विशालपण, ब्रह्मस्थिती) सोडूं नयेत. आळसाचें सुख मानूं नये. विकल्प म्ह० वाईट कल्पना धरूं नये. स्वार्थासाठीं कोणी कोणास आज्ञा करूं नये व केली तर स्वतःच्या लोभाची नसावी, लोकोपकाराची असावी, संबंधावांचून गाऊं नये. नेणपण सोडूं नये व

विचारेंवीण जाऊं नये । अविचारपंथें ॥४३॥ परोपकार सांडूं नये । परपीडा करूं नये । विकल्प पडों देऊं नये । कोणीयेकासी ॥ ४४ ॥ नेणपण सोडूं नये । महंतपण धरूं नये । द्रव्यासाठीं हिंडों नये । कीर्तन करीत ॥ ४५ ॥ संशयात्मक बोलों नये । बहुत निश्चय करूं नये । निर्वाहेंवीण धरूं नये । ग्रंथ हातीं ॥ ४६ ॥ जाणपणें पुसों नये । अहंभाव दिसों नये । सांगेन ऐसें म्हणों नये । कोणीयेकासी ॥ ४७ ॥ ज्ञानगर्व धरूं नये । सहसा छळणा करूं नये । कोठें वाद घालूं नये । कोणीयेकासी ॥ ४८ ॥ स्वार्थबुद्धी जडों नये । कारबारीं पडों नये । कार्यकर्ते होऊं नये । राजद्वारीं ॥ ४९ ॥ कोणास भरंवसा देऊं नये । जड भिक्षा मागों नये । भिक्षेसाठीं सांगों नये । परमार्थ आपुला ॥ ५० ॥ सोइरिकींत पडों नये । मध्यवर्ति घडों नये । प्रपंचाची जडों नये । उपाधी आंगीं ॥ ५१ ॥ प्रपंचहस्तीं जाऊं नये । बाष्कळ अन्न खाऊं नये । पाहुण्यासरिसें घेऊं नये । आमंत्रणें कदा ॥ ५२ ॥ श्राद्ध पक्ष सटी सामासें । शांती फळशोभन बीरसें । भोग राहाण बहुवसें । नवस व्रतें उद्यापनें ॥ ५३ ॥ तेथें निस्पृहें जाऊं नये । त्यांचें अन्न खाऊं नये । येळिलवाणें करूं नये । आपणासी ॥ ५४ ॥ लग्नमुहूर्तीं जाऊं नये । पोटासाठीं गाऊं नये । मोलें कीर्तन करूं नये । कोठेंतरी ॥ ५५ ॥ आपली भिक्षा सोडूं नये । वारें अन्न खाऊं नये । निस्पृहासि घडों नये । मोलयात्रा ॥ ५६ ॥ मोलें सुकृत करूं नये । मोलपुजारी होऊं नये । दिल्हा तरी घेऊं नये । इनाम निस्पृहें ॥ ५७ ॥ कोठें मठ करूं नये । केला तरी तो धरूं नये । मठपती होऊन बैसों नये । निस्पृह पुरुषें ॥ ५८ ॥ निस्पृहें अवघेंचि करावें । परी आपण तेथें न संपडावें । परस्परें उभारावें । भक्तिमार्गासी

महंतपण धरूं नये. द्रव्यासाठीं कथा करीत फिरूं नये, संशयाचें बोलूं नये, फार निश्चय करूं नयेत (तडीस जातील असेच करावे, किंवा आत्मनिश्चयावांचून कोणताच निश्चय करूं नये). कोणताही ग्रंथ स्पष्ट उलगडून सांगण्याची शक्ति असल्यावांचून (निर्वाहेंवीण) सांगण्यास हातीं घेऊं नये, जाणतेपणाच्या गर्वानें विचारूं नये, सांगेन असा शब्द देऊं नये (दिल्यास पाळलाच पाहिजे). कोणाची छळणा करूं नये, कोणाच्या कारभारांत पडूं नये, राजद्वारीं लोककार्य करून दाखवावयाची हांव बाळगूं नये. भरंवसा देऊं नये, जड (कठीण) वाटेल अशी भिक्षा मागूं नये. भिक्षेसाठीं मीं अमुक परमार्थ केला असें सांगूं नये. विवाहाच्या सोइरिकींत पडूं नये (दोहींकडच्या शिव्या खायचा प्रसंग यायचा !) मध्यस्त होऊं नये, प्रपंचाची उपाधि अंगीं जडूं देऊं नये (३४–५१). निस्पृहानें प्रपंचाच्या हातीं सांपडूं नये; बाष्कळ अन्न खाऊं नये; पाहुण्याबरोबर आमंत्रण घेऊं नये, श्राद्ध, पक्ष सट, षण्मासिक श्राद्धें, शांत, गर्भाधान, बारसें, मेजवान्या (भोग), राहाणें, नवस, व्रत, उद्यापनें, लग्नें, अशा ठिकाणीं जाऊं नये, तेथें जेवूं नये. दैन्य कधींच धरूं नये. पोटासाठीं गाऊं नये, मोलानें कथा करूं नये. भिक्षा सोडूं नये, वारानें जेवूं नये, मोलानें यात्रा करूं नये (५२–५६). निस्पृहानें पुजारीपण किंवा कोणतेंच पुण्यकर्म मोलानें करूं नये, व कोणी इनाम दिलें तरी घेऊं नये, मठ करून मठपति होऊन बसूं नये, सर्व करून त्यांत सांपडूं नये, परस्पर भक्तिमार्ग उभारावा. प्रयत्न (उद्योग) सोडूं नये, आळस डोळ्यापुढें येऊं देऊं नये. देहांतापर्यंत

॥ ५९ ॥ प्रेत्नेविण राहों नये । आळस दृष्टीस आणूं नये । देह अस्तां पाहों नये । वियोग उपासनेचा ॥ ६० ॥ उपाधीमध्यें पडों नये । उपाधी आंगीं जडों नये । भजनमार्ग मोडूं नये । निसंगपणें ॥ ६१ ॥ बहु उपाधी करूं नये । उपाधीविण कामा नये । सगुणभक्ति सोडूं नये । विभक्ति खोटी ॥ ६२ ॥ बहुसाल धांवों नये । बहुसाल राहों नये । बहुत कष्ट करूं नये । असुदें खोटें ॥ ६३ ॥ बहुसाल बोलों नये । अबोलण कामा नये । बहुत अन्न खाऊं नये । उपवास खोटा ॥ ६४ ॥ बहुसाल निजों नये । बहुत निद्रा मोडूं नये । बहु नेम धरूं नये । बाष्कळ खोटें ॥ ६५ ॥ बहु जनीं असों नये । बहु आरण्य सेवूं नये । बहु देह पाळूं नये । आत्महत्त्या खोटी ॥ ६६ ॥ बहु संग धरूं नये । संतसंग सांडूं नये । कर्मठपण कामा नये । अनाचार खोटा ॥६७॥ बहु लोकिक कामा नये । लोकाधेन होऊं नये । बहु प्रीती कामा नये । निष्ठुरता खोटी ॥ ६८ ॥ बहु संशय धरूं नये । मुक्तमार्ग कामा नये । बहु साधनीं पडों नये । साधनेंवीण खोटें ॥ ६९ ॥ बहु विषय भोगूं नये । विषयत्याग करितां नये । देहलोभ धरूं नये । बहु त्रास खोटा ॥ ७० ॥ वेगळा अनुभव घेऊं नये । अनुभवेंवीण कामा नये । आत्मस्थिती बोलों नये । स्तब्धता खोटी ॥ ७१ ॥ मन उरों देऊं नये । मनेंवीण कामा नये । अलक्ष वस्तु लक्षूं नये । लक्षेंवीण खोटें ॥ ७२ ॥ मनबुद्धीअगोचर । बुद्धीवीण अंधकार । जाणिवेचा पडो विसर । नेणीव खोटी ॥ ७३ ॥ ज्ञातेपण धरूं नये । ज्ञानेंवीण कामा नये । अतर्क्य वस्तु

उपासनेला विसंबूं नये. उपाधि अंगाला जडूं देऊं नये, निःसंग झालों या अभिमानानें सगुणभक्ति सोडूं नये पण विभक्तपणें म्ह० वेगळेपणानेंही राहूं नये. फार उपाधि वाढवूं नये पण उपाधीवीणही राहूं नये, अतिसर्वत्र वर्जावें ; फार धांवूं नये पण बसूनही राहूं नये. अतिकष्ट करूं नयेत पण आयदीपणाही नसावा, अतिभाषण व अबोला दोन्ही नसावींत, अत्याहार व उपवास दोन्ही नकोत, अतिनिद्रा व अनिद्रा दोन्ही वाईट, अतिनेम करूं नयेत पण नियमरहित (बाष्कळ) नसावें. एकसारखें जनांत किंवा वनांत नसावें, देहाचे फार लाड करूं नयेत. पण आत्महत्याही निंद्य, बहुसंग नसावा पण सत्संग निरंतर असावा, कर्मठ व कर्मनष्ट दोन्ही नसावें, लौकिक सोडूं नये व लोकांच्या अतिशय आधीनही असूं नये, अतिप्रीति व निष्ठुरपणा दोन्हीं नसावींत. अतिसंशय किंवा अतिमोकाट नसावें, बहुसाधनांच्या जाळ्यांत गुरफटूं नये पण साधणाविण राहणेंही अयोग्य. अतिविषय भोगूं नये व विषयत्यागही करितां येत नाहीं. देहाचा लोभ व कंटाळा दोन्ही नकोत (५७–७०). वेगळेपणानें अनुभव घेऊं नये, व अनुभवावांचूनही राहूं नये. आत्मानुभव बोलूं नये, पण मुकेपणही उपयोगाचें नाहीं. मनाच्या साह्यावांचून कांहीं व्हायचें नाहीं. पण मन मनपणें राहूं न देतां उन्मन झालें पाहिजे. परमात्मवस्तु लक्षितां येत नाहीं पण लक्षिल्यावांचून सोय नाहीं, ती मनबुद्धीच्या पलीकडे आहे ; पण बुद्धीच्या साह्यावांचून अंधार दूर होत नाहीं व स्वरूपानुभव होत नाहीं. जाणीव नाहींशी होते पण नेणीवही कामाची नाहीं ; ज्ञातेपण धरूं नये, पण ज्ञानावीण कामा नये ; वस्तु तर्कातीत आहे पण तर्क चालविलाच पाहिजे, हृयाचें स्मरण

तर्का नये । तर्केवीण खोटें ॥ ७४ ॥ दृश्यस्मरण कामा नये । विस्मरण पडों नये । कांहीं चर्चा करूं नये । केलियावीण न चले ॥ ७५ ॥ जगीं भेद कामा नये । वर्णसंकर करूं नये । आपला धर्म उडवूं नये । अभिमान खोटा ॥ ७६ ॥ आशाबद्धक बोलों नये । विवेकेंवीण चालों नये । समाधान हालों नये । कांहीं केल्या ॥ ७७ ॥ अबद्ध पोथी लेहों नये । पोथीवीण कामा नये । अबद्ध वाचूं नये । वाचिल्यावीण खोटें ॥ ७८ ॥ निस्पृहें वक्तृत्व सांडूं नये । आशंका घेतां भांडों नये । श्रोतयांचा मानूं नये । वीट कदा ॥ ७९ ॥ हे सिकवण धरितां चित्तीं । सकळ सुखें वोळंगती । आंगीं बाणे महंती । अकस्मात ॥ ८० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे निस्पृहलक्षणनाम समास प्रथम ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥ ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भिक्षा । ॐभवति या पक्षा । रक्षिलें पाहिजे ॥ १ ॥ भिक्षा मागोन जो जेविला । तो निराहारी बोलिला । प्रतिग्रहावेगळा जाला । भिक्षा मागतां ॥ २ ॥ संतासंत जे जन । तेथें कोरान्न मागोन करी भोजन । तेणें केलें अमृतप्राशन । प्रतिदिनीं ॥ ३ ॥

॥ श्लोक ॥ भिक्षाहारी निराहारी भिक्षा नैव प्रतिग्रहः । असंतो वापि संतो वा सोमपानं दिने दिने ॥ १ ॥

ऐसा भिक्षेचा महिमा । भिक्षा माने सर्वोत्तमा । ईश्वराचा अगाध महिमा । तोहि भिक्षा मागे ॥ ४ ॥ दत्त गोरक्ष आदिकरुनी । सिद्ध भिक्षा मागती जनीं । निस्पृहता भिक्षेपासुनी । प्रगट होय ॥ ५ ॥ वार लावून बैसला । तरी तो पराधीन जाला । तैसीच नित्यावळीला । स्वतंत्रता कैंची ॥६॥ आठां दिवसां धान्य मेळ-

---

नसावें व स्वरूपाचें विस्मरण नसावें. अतिचर्चा करूं नये, चर्चेवांचून चालत नाहीं. समाजांत भेद नसावेत पण वर्णसंकरही उपयोगाचा नाहीं. आपले जात्याश्रमादी धर्म उडवूं नयेत, त्यांचा अभिमानही नसावा. आशाबद्ध बोलूं नये, विवेकावांचून चालूं नये, समाधान अढळ असावें. अशुद्ध पोथी लिहूं नये पण पोथीविण कामा नये. अबद्ध वाचूं नये, वाचल्यावीण व्यर्थ. निस्पृहानें वक्तृत्व सोडूं नये, कोणीं शंका काढल्या तर भांडूं नये, श्रोत्यांना कंटाळूं नये (७१–७९). ही शिकवण निस्पृहानें चित्तीं धरावी म्ह. सर्वसुखें प्राप्त होतील व नको म्हणतांही महंतपणा अंगीं बाणेल (८०). [द० १४, स० १]

ब्राह्मणाची मुख्य दीक्षा म्ह० भिक्षाशन होय. 'ॐभवति भिक्षां देहि' हें व्रत त्याला मौजीबंधनाचे वेळीं दिलेलें असतें, त्याचें त्यानें जतन केलें पाहिजे. भिक्षान्न हें निराहाराच्या तोडीचेंच आहे. भिक्षा मागणारा प्रतिग्रहापासून मोकळा होतो. म्ह० दानग्रहणाचा दोष त्याला लागत नाहीं. भल्याबुऱ्या लोकांच्या घरीं सिद्ध अन्न मागून जो जेवतो त्यानें अमृतप्राशन केलें आहे असें जाणावें. भिक्षा शंकराला प्रिय आहे, भिक्षेचा महिमा शंकर जाणतात, तेही भिक्षा मागतात. दत्त, गोरक्ष इ० सिद्ध सिद्धान्न भिक्षाच मागतात. भिक्षेपासून निस्पृहता वाढते. वार लावून किंवा नित्य पंक्तीला जेवणारा पराधीन होतो; त्याला स्वतंत्रता राहत नाहीं. आठ दिवसांनीं एकदम भिक्षा मागून सांठवून ठेवणेंही त्रासदायकच खरें,

विलें। तरी तें कंटाळवाणें जालें। प्राणी येकायेकीं चेवले। नित्य नूतनतेपासुनी ॥७॥ नित्य नूतन हिंडावें। उदंड देशाटन करावें। तरीच भिक्षा मागतां बरवें। श्लाघ्यवाणें ॥ ८ ॥ अखंड भिक्षेचा अभ्यास। तयास वाटेना परदेश। जिकडे तिकडे स्वदेश। लोकत्रयीं ॥ ९ ॥ भिक्षा मागतां किरकों नये। भिक्षा मागतां लाजों नये। भिक्षा मागतां भागों नये। परिभ्रमण करावें ॥ १० ॥ भिक्षा आणि चमत्कार। चाकाटती लाहानथोर। कीर्ती वर्णी निरंतर। भगवंताची ॥ ११ ॥ भिक्षा म्हणजे कामधेनु। सदा फळ नव्हे सामान्यु। भिक्षेस करी जो अमान्यु। तो करंटा जो ॥ १२ ॥ भिक्षेनें वोळखी होती। भिक्षेनें भ्रम चुकती। सामान्य भिक्षा मान्य करिती। सकळ प्राणी ॥ १३ ॥ भिक्षा म्हणिजे निर्भय स्थिती। भिक्षेनें प्रगटे महंती। स्वतंत्रता ईश्वरप्राप्ती। भिक्षागुणें ॥ १४ ॥ भिक्षेस नाहीं अडताळा। भिक्षाहारी तो मोकळा। भिक्षेकरितां सार्थक वेळा। काळ जातो ॥ १५ ॥ भिक्षा म्हणिजे अमरवल्ली। जिकडे तिकडे लगडली। अवकाळीं फळदायिनी जाली। निर्लज्जासी ॥ १६ ॥ पृथ्वीमध्यें देश नाना। फिरतां उपवासी मरेना। कोणे येके ठाईं जना। जड नव्हे ॥ १७ ॥ गोरज्य वाणिज्य कृषी। त्याहून प्रतिष्ठा भिक्षेसी। विसंभों नये झोळिसी। कदाकाळीं ॥ १८ ॥ भिक्षेऐसें नाहीं वैराग्य। वैराग्यापरतें नाहीं भाग्य। वैराग्य नस्तां अभाग्य। येकदेसी ॥ १९ ॥ कांहीं भिक्षा आहे म्हणावें। अल्पसंतोषी असावें। बहुत आणितां घ्यावें। मुष्टी येक ॥ २० ॥ सुखरूप भिक्षा मागणें। ऐसीं

त्यांत नित्य नवीनपणाची मौज नाहीं (१–७). नित्य नव्या नव्या प्रांतांत, गांवांत किंवा घरांत भिक्षा मागण्यांत निस्पृहता, स्वतंत्रता व देशाटनाचा उल्हास असतो. असें केलें तरच भिक्षा मागणें श्रेयस्कर आहे. निरंतर भिक्षेचा अभ्यास असेल तर तो जाईल तिकडे त्याला स्वदेशच आहे, परदेश कोठेंच वाटत नाहीं. भिक्षेचा त्रास, लज्जा किंवा थकवा मानूं नये, परिभ्रमण ठेवावें. भिक्षा मागून निरंतर भगवंताचे गुणानुवाद गात जावे, नाना चमत्कार घडत आहेत अशा पुरुषाला पाहून लहान थोर चकित होतात, त्याला पाहून पूज्यता वाटते. भिक्षा सामान्य समजूं नका, ही नित्यामृत देणारी कामधेनु आहे. भिक्षा ज्याला मान्य नाहीं, तो जोगी करंटा होय (८–१२). भिक्षेनें अनेकांच्या ओळखी होतात, कित्येक भ्रम दूर होतात, व सामान्य भिक्षा घालायला कोणी कंटाळतही नाहीं. भिक्षेनें निर्भयता, स्वतंत्रता राहून महंती प्रगट होते व भिक्षागुणें भगवत्प्राप्ति होते. भिक्षेस कोठेंच अडथळा नाहीं. भिक्षेवर राहणारा स्वतंत्र असतो, त्याचा सर्व काळ सार्थकीं लागतो. भिक्षा ही अमृतवल्ली आहे, नानाफळांनीं ती लगटली आहे म्ह० तिच्या योगें अनेक लाभ होतात. निर्लज्ज म्ह० लज्जारहित मोकळा जो आहे त्याला ती कठिण प्रसंगीं तारक होते. पृथ्वीच्या पाठीवर अनेक देश आहेत, फिरणारा उपाशीं राहत नाहीं. बरें कोणत्याही एके स्थळीं ती घालणाऱ्याला जड वाटत नाहीं. कृषी (शेतकी), गोरक्ष (गवळ्याचा धंदा), व वाणिज्य (व्यापार) यांपेक्षांही भिक्षेची प्रतिष्ठा मोठी आहे; म्हणून ब्राह्मणानें हातची झोळी सोडूं नये. भिक्षेसारखें वैराग्य नाहीं व वैराग्यासारखें भाग्य नाहीं. वैराग्य नाहीं तो एकलकोंडा अभागीच होय. भिक्षा मागतां लोभ बिलकूल नसावा. भिक्षा आहे काय असें विचारून मिळाल्यास घ्यावी, नाहीं तर पुढें चालूं लागावें, अल्पसंतुष्ट असावें, पुष्कळ भिक्षा वाढायला आणली तरी आपण घेऊं नये, मूठभरच घ्यावी. सुखरूप

निस्पृहतेचीं लक्षणें । मृद वाग्विळास करणें । परम सौख्यकारी ॥ २१ ॥ ऐसी भिक्षेची स्थिती । अल्प बोलिलें यथामती । भिक्षा वांचवी विपत्ती । होणार काळीं ॥ २२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे भिक्षानिरूपणनाम समास द्वितीय ॥ २ ॥

॥ श्रीराम ॥ कवित्व शब्दसुमनमाळा । अर्थ परिमळ आगळा । तेणें संतषट्पदकुळा । आनंद होय ॥ १ ॥ ऐसी माळा अंतःकरणीं । गुंफून पूजा रामचरणीं । वोंकारतंत अखंडपणीं । खंडूंची नये ॥ २ ॥ परोपकाराकारणें । कवित्व अगत्य करणें । तया कवित्वाचीं लक्षणें । बोलिजेती ॥ ३ ॥ जेणें घडे भगवद्भक्ती । जेणें घडे विरक्ती । ऐसी कवित्वाची युक्ती । आधीं वाढवावी ॥ ४ ॥ क्रियेवीण शब्दज्ञान । तया न मानिती सज्जन । म्हणोनि देव प्रसन्न । अनुतापें करावा ॥ ५ ॥ देवाचेन प्रसन्नपणें । जें जें घडे बोलणें । तें तें अत्यंत श्लाघ्यवाणें । या नांव प्रासादिक ॥ ६ ॥ धीट पाठ प्रासादिक । ऐसें बोलती अनेक । तरी हा त्रिविध विवेक । बोलिजेल ॥ ७ ॥ धीट म्हणिजे धीटपणें केलें । जें जें आपुल्या मनास आलें । बळेंचि कवित्व रचिलें । या नांव धीट बोलिजे ॥ ८ ॥ पाठ म्हणिजे पाठांतर । बहुत पाहिलें ग्रंथांतर । तयासारिखा उतार । आपणहि केला ॥ ९ ॥ सीघ्रचि कवित्व जोडिलें । दृष्टीं पडिलें तेंचि वर्णिलें । भक्तीवांचून जें केलें । त्या नांव धीटपाठ ॥ १० ॥ कामिक रसिक शृंगारिक । वीर हास्य प्रस्ताविक । कौतुक विनोद अनेक । या नांव धीटपाठ ॥ ११ ॥ मन जालें कामाकार । तैसेचि निघती उद्गार । धीटपाठें परपार । पाविजेत नाहीं ॥ १२ ॥ व्हावया

राहून आनंदानें भिक्षा मागावी, लोकांच्या जीवाला सुख वाटेल असें मृदु व मधुर बोलावें – हें निस्पृहाचें लक्षण होय. भिक्षेची महती थोडक्यांत सांगितली आहे. विपत्ती येणार असेल तर ती भिक्षेपासून टळते (१३–२२). [द० १४, स० २]

कवित्वशब्दसुमनांच्या माळा अर्थसुगंधानें भरलेल्या पाहून संतभ्रमरांना आनंद होतो. अशी माळा अंतःकरणांत गुंफून रामचरणीं समर्पण करावी म्हणजे रामाची पूजा होते, मात्र माळा ओंकारतंतूनीं गुंफलेली असून तंतु अखंड असावा, तुटूं नये (१–२). परोपकारासाठीं कवित्व करावें, तशा कवित्वाचीं लक्षणें या समासांत सांगतों (३). भक्ति व वैराग्य जेणेंकडून वाढेल असें कवित्व करण्यापूर्वी युक्ति म्ह. योग, अधिकार वाढवून ठेवावा. तो अधिकार मिळवायाचा कसा ? क्रियेवांचून नुस्त्या शब्दांना सज्जन मानीत नाहींत. म्हणून अनुतापानें देव प्रसन्न करावा. देवाच्या प्रसादानें जे जे शब्द स्फुरतात ते ते योग्यच असतात, यालाच प्रासादिक कविता म्हणतात (४–६). कवित्वांत धीट, पाठ व प्रासादिक असे तीन भेद आहेत. जें जें मनांत येईल तें तें बळानें रचणें याचें नांव धीट कवित्व. बहुत ग्रंथ पाहून पाठांतर करणें व पाठशक्तीच्या बळें तसेंच कांहीं आपणही करणें याचें नांव पाठकवित्व. दृष्टीस पडेल त्यावर शीघ्र कवित्व करणें याचें नांव धीटपाठ. शृंगार, वीर, हास्य, विनोद इ० नवरसात्मक कवित्व तें धीटपाठ कवित्व. मन कामाकार झालें असतां शृंगाराचे उद्गार निघणें,

उदरशांती । करणें लागे नरस्तुती । तेथें केली जे व्युत्पत्ती । या नांव धीटपाठ ॥ १३ ॥ कवित्व नसावें धीटपाठ । कवित्व नसावें खटपट । कवित्व नसावें उद्धट । पाषांड मत ॥ १४ ॥ कवित्व नसावें वादांग । कवित्व नसावें रसभंग । कवित्व नसावें रंगभंग । दृष्टांतहीन ॥ १५ ॥ कवित्व नसावें पाल्हाळ । कवित्व नसावें बाष्कळ । कवित्व नसावें कुटीळ । लक्षुनियां ॥ १६ ॥ हीन कवित्व नसावें । बोलिलेंचि न बोलावें । छंदभंग न करावे । मुद्राहीन ॥ १७ ॥ व्युत्पत्तीहीन तर्कहीन । कळाहीन शब्दहीन । भक्तिज्ञानवैराग्यहीन । कवित्व नसावें ॥ १८ ॥ भक्तिहीन जें कवित्व । तेंचि जाणावें ठोंबें मत । आवडीहीन वक्तृत्व । कंटाळवाणें ॥ १९ ॥ भक्तिवीण जो अनुवाद । तोचि जाणावा विनोद । प्रीतीविण संवाद । घडे केवी ॥ २० ॥ असो धीट पाठ ते ऐसे । नाथिलें अहंतेचें पिसें । आतां प्रासादिक तें कैसें । सांगिजेल ॥ २१ ॥ वैभव कांता कांचन । जयास वाटे हें वमन । अंतरीं लागलें ध्यान । सर्वोत्तमाचें ॥ २२ ॥ जयास घडीनें घडी । लागे भगवंतीं आवडी । चढती वाढती गोडी । भगवद्भजनाची ॥ २३ ॥ जो भगवद्भजनेंवीण । जाऊं नेदी येक क्षण । सर्वकाळ अंतःकरण । भक्तिरंगें रंगलें ॥ २४ ॥ जया अंतरीं भगवंत । अचळ राहिला निवांत । तो स्वभावें जें बोलत । तें ब्रह्मनिरूपण ॥ २५ ॥ अंतरीं बैसला गोविंद । तेणें लागला भक्तिछंद । भक्तीवीण अनुवाद । आणीक नाहीं ॥ २६ ॥ आवडी लागली अंतरीं । तैसीच वदे वैखरी । भावें करुणा-कीर्तन करी । प्रेमभरें नाचतु ॥ २७ ॥ भगवंतीं लागलें मन । तेणें नाठवे देहभान । शंका लज्जा पळोन । दुरी ठेली ॥ २८ ॥ तो प्रेमरंगें रंगला । तो भक्तिमदें मातला । तेणें अहंभाव घातला । पायांतळीं ॥ २९ ॥ गात नाचत

पोटासाठीं व्युत्पत्ति खर्च करून नरस्तुति करणें इ० प्रकार या धीटपाठ कवित्वांत मोडतात. हें कवित्व भवमोचक नाहीं (७–१३). कवित्व धीटपाठ नसावें, शब्द जुळवून खटपटीनें केलेलें नसावें, पाखांडादि मतांचें प्रवर्तक नसावें, वादांग वाढविणारें किंवा रसभंग करणारें, दृष्टांतहीन, रुक्ष असें नसावें. बाष्कळ कोट्याकल्पनांनीं भरलेलें, पाल्हाळिक, कुटिल मतांचें, हीन, छंदोभंगादि दोषयुक्त, कवित्वलक्षणविरहित, ज्ञान, कळा व तर्क यांना दूर सारणारें, कंटाळवाणें, भक्तिज्ञानवैराग्यहीन असें कवित्व नसावें. भक्तिहीन कवित्व तो केवळ विनोद होय. प्रेमप्रीतीवांचून कवित्व कसचें ? अहंकाराच्या भूमिकेवर रचलेलें हें धीटपाठ कवित्व (१४–२१). आतां प्रासादिक कवित्वाचें लक्षण सांगतों. इहलोकींचें वैभव, कांता व कांचन हें ज्याला वमनप्राय झालें आहे, मन भगवद्भजनांत रंगून गेलें आहे, घडीनें घडी भक्तीची आवड चंद्रकलेप्रमाणें वाढत आहे, सर्वकाळ अंतःकरण भक्तिरंगानें रंगलें आहे, ज्याचे अंतरीं भगवंत ठाण मांडून निवांत राहिले आहेत, तो सहज जें बोलेल तें ब्रह्मनिरूपण होय. भक्तिछंद लागल्यामुळें भक्तीवांचून इतर गोष्टी करीत नाहीं, अंतरींच्या आवडीप्रमाणेंच वाणींतून प्रेमधारा स्त्रवतात, करुणाकीर्तनाच्या रंगांत देहभानविवर्जित होऊन निर्लज्जपणें प्रेमभरानें गातनाचत आहे, अहंभाव पायातळीं घातला आहे, डोळ्यांना जग दिसत नसून जनार्दन भरला आहे,

निशंक। तयास कैंचे दिसती लोक। दृष्टीं त्रैलोक्यनायक। वसोन ठेला ॥ ३० ॥ ऐसा भगवंतीं रंगला। आणीक कांहीं नलगे त्याला। स्वइच्छा वर्णूं लागला। ध्यान कीर्ती प्रताप ॥ ३१ ॥ नाना ध्यानें नाना मूर्ती। नाना प्रताप नाना कीर्ती। तयापुढें नरस्तुती। तृणतुल्य वाटे ॥ ३२ ॥ असो ऐसा भगवद्भक्त। जो ये संसारीं विरक्त। तयास मानिती मुक्त। साधुजन ॥ ३३ ॥ त्याचे भक्तीचें कौतुक। तया नांव प्रासादिक। सहज बोलतां विवेक। प्रगट होय ॥ ३४ ॥ ऐका कवित्वलक्षण। केलेंच करूं निरूपण। जेणें निवे अंतःकरण। श्रोतयांचें ॥ ३५ ॥ कवित्व असावें निर्मळ। कवित्व असावें सरळ। कवित्व असावें प्रांजळ। अन्वयाचें ॥३६॥ कवित्व असावें भक्तिबळें। कवित्व असावें अर्थागळें। कवित्व असावें वेगळें। अहंतेसी ॥ ३७ ॥ कवित्व असावें कीर्तिवाड। कवित्व असावें रम्य गोड। कवित्व असावें जाड। प्रतापविषई ॥ ३८ ॥ कवित्व असावें सोपें। कवित्व असावें अल्परूपें। कवित्व असावें सुलभ। चरणबंद ॥ ३९ ॥ मृदु मंजुळ कोमळ। भव्य अद्भुत विशाळ। गौल्य माधुर्य रसाळ। भक्तिरसें ॥ ४० ॥ अक्षरबंद पदबंद। नाना चातुर्य प्रबंद। नाना कौशल्यता छंदबंद। धाटी मुद्रा अनेक ॥ ४१ ॥ नाना युक्ती नाना बुद्धी। नाना कळा नाना सिद्धी। नाना अन्वय साधी। नाना कवित्व ॥ ४२ ॥ नाना साहित्य दृष्टांत। नाना तर्क धात मात। नाना संमति सिद्धांत। पूर्वपक्षेंसी ॥ ४३ ॥ नाना गती नाना व्युत्पत्ती। नाना मती नाना स्फूर्ति। नाना धारणा नाना धृती। या नांव कवित्व ॥ ४४ ॥ शंका आशंका प्रत्योत्तरें। नाना काव्यें शास्त्राधारें। तुटे संशयो निर्धारें। निर्धारितां ॥ ४५ ॥ नाना प्रसंग नाना विचार। नाना योग नाना विवर। नाना तत्वचर्चासार। या

ज्याच्या चित्तांत व दृष्टींत भगवंत भरून राहिले आहेत, स्वेच्छेनें भगवंताचीं नाना रूपें, नाना ध्यानें, यशकीर्तिप्रताप गात आहे असा वैराग्यसंपन्न व भुक्तिसुख भोगणारा भक्त सहज बोलतां बोलतां ज्या वैराग्यभक्तीच्या गोष्टी बोलेल ती प्रासादिक कविता होय (२३–३३). कवित्व निर्मळ, सरळ व अन्वयाला प्रांजळ असावें (दूरान्वय नसावा). कवित्वांत अहंभाव नसावा, त्यांत अर्थगौरव चांगला असावा. त्यांत हरिकीर्ति पुष्कळ (वाड) गायिलेली असावी. तें रम्य, मधुर, सोपें, अल्परूप म्ह० अल्पाक्षररमणीय, चरणबंद (यमकांकित), कोमळ, कौशल्यपूर्ण, भक्तिभावयुक्त रसाळ असावें. अक्षरबंध, पदबंध, चातुर्य, कलाकुसरी, नाना छंद, धाटी, मुद्रा यांनीं युक्त असावें. युक्तिबुद्धिसिद्धींनीं युक्त असून अनेक अन्वय म्ह० संबंध साधणारें अर्थात् समन्वयपूर्ण असें असावें. नाना तर्क, धातमात, पूर्वपक्ष व सिद्धांत, नाना गति व व्युत्पत्ति, नाना मति, नाना रसांच्या स्फूर्ति, धृतिधारण, शंकासमाधानें, साहित्यदृष्टांत, निःसंदेह ज्ञान इ० सर्व त्यांत यथोचित असावें. अनेक सुविचार, योग, विवरणें, तत्त्वचर्चा, संशयछेद, पुरश्चरणें व तीर्थाटणें यांचीं वर्णनें इ० कवित्वांत

नांव कवित्व ॥ ४६ ॥ नाना साधनें पुरश्चरणें। नाना तपें तीर्थाटणें । नाना संदेह फेडणें । या नांव कवित्व ॥ ४७ ॥ जेणें अनुताप उपजे । जेणें लोकिक लाजे । जेणें ज्ञान उमजे । या नांव कवित्व ॥ ४८ ॥ जेणें ज्ञान हें प्रबळे । जेणें वृत्ती हे मावळे । जेणें भक्तिमार्ग कळे । या नांव कवित्व ॥४९॥ जेणें देहबुद्धी तुटे । जेणें भवसिंधु आटे । जेणें भगवंत प्रगटे । या नांव कवित्व ॥ ५० ॥ जेणें सद्बुद्धि लागे । जेणें पाषांड भंगे । जेणें विवेक जागे । या नांव कवित्व ॥ ५१ ॥ जेणें सद्वस्तु भासे । जेणें भास हा निरसे । जेणें भिन्नत्व नासे । या नांव कवित्व ॥ ५२ ॥ जेणें होय समाधान । जेणें तुटे संसारबंधन । जया मानिती सज्जन । तया नांव कवित्व ॥ ५३ ॥ ऐसें कवित्वलक्षण । सांगतां तें असाधारण । परंतु कांहींयेक निरूपण । बुझावया केलें ॥ ५४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे कवित्वकळा-निरूपणनाम समास तृतीय ॥ ३ ॥

॥ श्रीराम ॥ कलियुगीं कीर्तन करावें । केवळ कोमळ कुशळ गावें । कठीण कर्कश कुटें सांडावें । येकीकडे ॥ १ ॥ खटखट खुंटून टाकावी । खळखळ खळांसीं न करावी । खरें खोटें खवळों नेदावी । वृत्ती आपुली ॥ २ ॥ गर्वगाणें गाऊं नये । गातां गातां गळों नये । गोप्य गुज गर्जों नये । गुण गावे ॥ ३ ॥ घष्टणी घिसणी घस्मरपणें । घसर घसरूं घसा खाणें । घुमघुमोंचि घुमणें । योग्य नव्हे ॥ ४ ॥ नाना नामें भगवंताचीं । नाना ध्यानें सगुणाचीं । नाना कीर्तनें कीर्तीचीं । अद्भुत करावीं ॥ ५ ॥ चकचक चुकावेना । चाट चावट चळावेना । चरचर चुरचुर लागेना । ऐसें

असावींत (३४–४७). जेणेंकरून अनुताप उत्पन्न होईल, लौकिक हटेल, अज्ञानवृत्ति मावळून ज्ञान प्रबळेल, भक्तिमार्ग कळेल, देहबुद्धि तुटून भवसिंधु आटेल व भगवंत भेटेल तें कवित्व होय. उत्तम कवित्वाच्या परिशीलनानें पाखांड मोडावें, सद्‌बुद्धि व विवेक जागृत व्हावे, दृश्यभास मावळून सद्वस्तु प्रकाशावी, अभेदभाव उपजावा, संसारबंध सुटून आत्मसमाधान वाढावें व तें सज्जनांना पसंत असावें. कवित्वाचीं लक्षणें कळणें कठिण आहे पण समजण्यासाठीं कांहीं सांगितलीं आहेत (४८–५४). [द० १४, स० ३].

(ह्या कीर्तनलक्षणाच्या समासांत 'क' पासून 'क्ष' पर्यंतच्या बाराखड्यांच्या एकेक अक्षरांत एकेक ओंवी याप्रमाणें ३५ ओव्यांत शब्दचमत्काराची थोडी मौज केली आहे). कलियुगीं कीर्तन करावें, केवळ कोमळ कुशळ गावें, कठिण, कर्कश, कुटें (मनोभेदक, क्षुद्रवृत्तीचें) एकीकडे सांडावें. तंटेबखेडे (खटखट) खुंटून टाकावी, खळाशीं खळखळ करूं नये. खऱ्याखोट्यानें मन क्षुब्ध होऊं (खवळों) देऊं नये. गातांना गळों नये म्ह० धैर्यहीन न व्हावें. रहस्य (गोप्यगुज) मोठ्यानें सांगूं नये (गर्जों नये), गोड गुणानुवाद गावे. घिसघिस घांसाघांसी करूं नये, घसर घसर हवें त्या विषयावर किंवा व्यक्तीवर घसरूं नये. घुमूं नये. भगवंताचीं नामें, सगुणाचीं ध्यानें, व देवाच्या लोकोत्तर कीर्तीचीं इ० लीलांचीं कीर्तनें गावींत (१–५). चकवूं नये, चुकूं नये, चावटपणा करूं नये, चळल्यासारखें भकूं नये, कोणाच्या

करावें ॥ ६ ॥ छळछळ छळणा करूं नये । छळितां छळितां छळों नये । छळणें छळणा करूं नये । कोणीयेकाची ॥ ७ ॥ जी जी जी जी म्हणावेना । जो जो जागे तो तो पावना । जपाजपों जनींजनार्दना । संतुष्ट करावें ॥ ८ ॥ झिरपे झरे पाझरे जळ । झळके दुरुनी झळाळ । झडझडां झळकती सकळ । प्राणी तेथें ॥ ९ ॥ या या या या म्हणावें नलगे । या या या या उपाव नलगे । या या या या कांहींच नलगे । सुबुद्धासी ॥ १० ॥ टक टक टक करूं नये । टाळाटाळी टिकों नये । टम टम टम टम लावूं नये । कंटाळवाणी ॥ ११ ॥ ठस ठोंबस ठाकावेना । ठक ठक ठक करावेना । ठाकें ठमकें ठसावेना । मूर्तिध्यान ॥ १२ ॥ डळमळ डळमळ डळों नये । डगमग डगमग कामा नये । डंडळ डंडळ चुकों नये । हेंकाडपणें ॥ १३ ॥ ढिसाळ ढाला ढळती कुंचे । ढोबळा ढसकण डुले नाचे । ढळेचिना ढिग ढिगांचे । कंटाळवाणे ॥ १४ ॥ नाना नेटक नागर । नाना नम्र गुणागर । नाना नेमक मधुर । तंतगाणें ॥ १५ ॥ ताळ तुंबरे तानमानें । ताळबद्ध तंतगाणें । तूर्त तार्किक तनें मनें । तल्लीन होती ॥ १६ ॥ थर्थरां थरकती रोमांच । थै थै थै स्वरें उंच । थिरथिर थिरावे नाच । प्रेमळ भक्तांचा ॥ १७ ॥ दक्षदाक्षण्य दाटलें । बंदें प्रबंदें कोंदाटलें । दमदम दुमदुमों लागलें । जगदांतर ॥ १८ ॥ धूर्त तूर्त धावोन आला । धिंगबुद्धीनें धिंग जाला ।

मनाला लागेल असें चुरचुर बोलूं नये. कोणाची छळछळ छळणा करूं नये. जी जी जी जी म्हणूं नये म्ह० कोणाची हांजी हांजी करूं नये. जो जो कीर्तनीं जागतो तो तो पावनच होतो. जपून जपून जनीं जनार्दनाला संतुष्ट करावें. जेथें हरिदासाच्या नेत्रांतून अश्रुजळ झिरपत असतें, व पूजावस्त्रादि ज्याचें सर्व झळझळित असतें, तेथें झडझडां प्राणीमात्र धापा टाकीत येतात. तेथें श्रोत्यांना या या या या म्हणून त्यांचें आर्जव करावें लागत नाहीं, लोकांचीं मनें आपोआप खेंचलीं जाऊन ते येतच असतात, सुबुद्ध किंवा जाणते यांना बोलावणें पाठवावें लागत नाहीं (६–१०). सारखी टकटक टकळी लावूं नये, टाळाटाळी टिकूं देऊं नये म्ह० मनापासून कीर्तन करावें, कंटाळवाणी टमटम करूं नये. ठस ठोंबस ठोंबें असूं नये म्ह० आधींच शिकून मग कीर्तनास उभें ठाकावें, कोणास ठकवूं नये. ठाक्यानें व ठमक्यानें म्ह. बाह्य सोंगाढोंगानें ध्यान ठसत नाहीं. डळमळूं नये, डगमगूं नये, डंडळूं नये म्ह० आत्मविश्वासपूर्वक निश्चयाचें भाषण करावें, हट्टवादीपणा (हेकाडपणा) करूं नये. मोठ्या (ढिसाळ) ढाळानें (मंद सौम्यपणानें) श्रोते जरी चवऱ्या, पंखे (कुंचे) ढाळायला उत्सुक असले, किंवा मोठमोठ्या (ढोबळे) धसकट उड्या मारल्या किंवा कीर्तनांत नाचला, जागेवरून न ढळतां ढिगासारखा उभा राहिला तरी (प्रेमरंग नसेल तर) कीर्तन कंटाळवाणेंच होतें. नीटनेटकेपणा, नागरपणा म्ह० चतुराई, नम्रता इ० गुणांचा आगर, व मधुरभाषी, नेमस्त गायनाचा उपयोग करणारा कीर्तनकार असावा (११–१५). ताळ, तंबुरे, तानमान, सतारसारंगीचें सुस्वर तंतुगायन, यांनीं तत्काळ (तूर्त) बुद्धिवंत श्रोते (तार्किक) तनमनप्रसन्नता पावून तल्लीन होतात. प्रेमळ भक्तांच्या अंगावर कीर्तनांत रोमांच किंवा अष्टसात्त्विकभाव सारेच उभे राहातात, उंच स्वरानें ते थै थै थै नाचतात व त्यांचें नाचणें मंदमंद (थिरथिर) होत होत सहज थांबतें. हरिदासांची दक्षता व सभ्यपणा म्ह० दाक्षिण्य दाटून राहतें (सर्वांच्या प्रत्ययास येतें). बंदप्रबंधांनीं म्ह० चातुर्ययुक्त काव्यांनीं सभास्थान भरून जातें. व श्रोत्यांचीं अंतःकरणें हेलावूं लागतात. धूर्त तेथें तत्काळ धांवून येतात व त्यांची मति दंग (धिंग) होऊन जाते व धाकाधाकानें

धाकें धाकें धोकला । रंग अवघा ॥ १९ ॥ नाना नाटक नेटकें । नाना मानें तुकें कौतुकें । नाना नेमक अनेकें । विद्यापात्रें ॥ २० ॥ पाप पळोन गेलें दुरी । पुण्य पुष्कळ प्रगटे वरी । परतरतो परे अंतरीं । चटक लागे ॥ २१ ॥ फुकट फाकट फटवणें नाहीं । फटकळ फुगडी पिंगा नाहीं । फिकें फसकट फोल नाहीं । भकाध्या निंदा ॥ २२ ॥ बरें बरें बरें म्हणती । बाबा बाबा उदंड करिती । बळें बळेंचि बळाविती । कथेलागीं ॥ २३ ॥ भला भला भला लोकीं । भक्तिभावें भव्य अनेकीं । भूषण भाविक लोकीं । परोपकारें ॥ २४ ॥ मानले तरी मानावें मनें । मत्त न व्हावें ममतेनें । मी मी मी मी बहुत जनें । म्हणिजेत आहे ॥ २५ ॥ येक येक येकांपासीं । येऊं येऊं येती झडेसी । या या या या असें तयासी । म्हणावें नलगे ॥ २६ ॥ राग रंग रसाळ सुरंगें । रत अंतर संगित रागें । रत्नपरीक्षा रत्नामागें । धांवती लोक ॥ २७ ॥ लवलवां लवती लोचन । लकलकां लकलें मन । लपलपों लपती जन । आवडीनें ॥ २८ ॥ वचनें वाउगीं वदेना । वावरे-विवरें वसेना । वक्तृत्वें निववी जना । विनित होउनी ॥ २९ ॥ सारासार समस्तांला । सिकवूं सिकवूं जनाला । साहित संगित सज्जनाला । बरें वाटे ॥ ३० ॥ खरेंखोटें खरें वाटलें । खर्खर खुर्खुर खुंटलें । खोटें खोटेपणें गेलें । खोटें म्हणोनियां ॥ ३१ ॥ शाहाणें शोधितां शोधेना । शास्त्रार्थ श्रुती

(आपल्या अपात्रतेचें भय बाळगून सुद्धां) ते रंगांत दंग होतात. अशीं अनेक नीटनीटकेपणानें व नियमितपणानें वागणारीं विद्यापात्रें म्ह. विद्वान् तेथें गोळा होतात (१६–२०). अशा कीर्तनीं अनेक पातकें दूर पळून जातात, व पुष्कळ पुण्य प्रगट होतें, श्रोता पुनः पुन्हां कीर्तनास येतो व परावाणीच्या आंत त्याला चटका लागून राहतो. व्यर्थ कोणाची फसवणूक नाहीं, फटकळपणाचा नाच व फेर धरणें नाहीं, रसहीन (फिकें) फोल (फसकट) बोलणें, बहकणें (भकाध्या) व निंदा नाहींत त्याला लोक बरें बरें म्हणतात, बाबा बाबा म्हणून आदर करितात, मोठ्या आग्रह करून आपापल्या घरीं व गांवीं कीर्तनाला बोलावितात. लोक त्याची भलाई गातात, तो आपल्या भक्तिभावबळानें अनेकांत महत्त्व पावतो, भाविकांत परोपकारामुळें भूषणीभूत होतो. अशा उत्कृष्ट कीर्तनकाराला मनीं पूज्य मानावें. द्रव्यादिकांच्या ममतेनें उन्मत्त होऊं नये. मी मी मी मी सर्व लोक म्हणतच असतात (२१–२५). कित्येक (पोटार्थी हरिदास) दुसऱ्यापाशीं आम्ही तुमच्याकडे कीर्तन करायला येऊं असें म्हणत मागें लागतात (झडेसी येतात). आणि 'या या' असें म्हणायची ते वाटही पाहत नाहींत–बळेंच गळीं पडतात. कीर्तनांत रागरंग सुरंग, रसाळ व अंतरंगवाणी संगीत रागरागिणी इ० गुण ज्या हरिदासरत्नापाशीं आहेत त्यांच्या मागें रत्नपारखी म्ह० गुणग्राही श्रोते धांवत येतात. त्यांचे नेत्र लवलव लवतात व मन चकित होतें (लकतें) व ते आवडीनें लपत लपत म्ह० नम्रपणें कीर्तनास येतात. चांगला हरिदास तोंडांतून व्यर्थ शब्द काढीत नाहीं, त्याच्या चित्तांत भलतें सलतें किंवा अमंगळ गोष्टी (वावरें विवरें) शिरत नाहींत, तो आपल्या वक्तृत्वानें सर्वांस समाधान देतो आणि (इतके गुण अंगीं असून) स्वतः नम्र असतो. तो समस्तांना सारासारविचार पुनः पुन्हां समजावून देतो. साहित्य (काव्यशास्त्र) व संगीत सज्जनांना आवडतें. खरेंखोटें खऱ्या रीतीनें समजलें म्हणजे खरखर खुरखुर (साऱ्या कटकटी) खुंटून जातात, खोटें तें खोटें म्हणूनच खोटें पडतें. शाहाणे शोधून सांपडत नाहींत म्ह० दुर्मिळ आहेत,

बोधेना । शुक शारिका शमेना । शब्द तयाचा ॥ ३२ ॥ हरुषें हरुषें हासिला । हाहाहोहोनें भुलला । हित होइना तयाला । परत्रीचें ॥ ३३ ॥ लक्षावें लक्षितां अलक्षीं । लक्षिलें लोचनातें लक्षी । लंगलें लयेतें अलक्षीं । विहंगममार्गे ॥ ३४ ॥ क्षेत्र क्षेत्रज्ञ क्षोभतो । क्षमेनें क्षमून क्षमवितो । क्षमणें क्षोभणें क्षेत्रज्ञ तो । सर्वां ठायीं ॥ ३५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे कीर्तनलक्षणनाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥ मागां हरिकथेचें लक्षण । श्रोतीं केला होता प्रश्न । सावध होऊन विचक्षण । परिसोत आतां ॥ १ ॥ हरिकथा कैसी करावी । रंगें कैसी भरावी । जेणें पाविजे पदवी । रघुनाथकृपेची ॥ २ ॥ सोनें आणी परिमळें । इक्षुदंडा लागती फळें । गौल्य माधुर्य रसाळें । तरी ते अपूर्वता ॥ ३ ॥ तैसा हरिदास आणी विरक्त । ज्ञाता आणी प्रेमळ भक्त । व्युत्पन्न आणी वादरहित । तरी हेही अपूर्वता ॥ ४ ॥ रागज्ञानी ताळज्ञानी । सकळकळा ब्रह्मज्ञानी । निरभिमानें वर्ते जनीं । तरी हेही अपूर्वता ॥ ५ ॥ मत्सर नाहीं जयासी । जो अत्यंत प्रिय सज्जनासी । चतुरंग जाणे मानसीं । अंतरनिष्ठ ॥ ६ ॥ जयंत्यादिकें नाना पर्वें । तीर्थें क्षेत्रें जें अपूर्वें । जेथें वसिजे देवाधिदेवें । सामर्थ्यरूपें ॥ ७ ॥ तया तीर्थांतें जे न मानिती । शब्दज्ञानें मिथ्या म्हणती । तया पामरां श्रीपती । जोडेल कैंचा ॥ ८ ॥ निर्गुण नेलें संदेहानें । सगुण नेलें ब्रह्मज्ञानें । दोहींकडे अभिमानें । वोस केलें ॥ ९ ॥ पुढें असतां सगुणमूर्ती । निर्गुणकथा जे

श्रुतिशास्त्रालाही त्यांच्या खऱ्या योग्यतेचा अंत (बोध) लागत नाहीं व शुकसारिकांनाही त्यांच्या शब्दमाधुर्याची बरोबरी करवत नाहीं. जो आचरटपणानें हांसहांस हांसतो, हाहा होहोनें भरतो म्ह० टवाळ्या–विनोद करितो त्याला परलोकींचें हित साधत नाहीं. अलक्ष्य ब्रह्मवस्तूंकडे लक्ष लावून पाहावें. पाहणाऱ्या नेत्रांना हा पाहतो (लक्षी), अलक्ष्याच्या ठिकाणीं विहंगममार्गानें म्ह० त्वरितगतीनें हा लय लावतो. देहांत (क्षेत्र) राहणारा आत्मा (क्षेत्रज्ञ) जागृत होतो, क्षमाशीलतेनें क्षमा करितो व करवितो. सर्वांठायीं असणाऱ्या आत्म्याच्या ठिकाणीं क्षमणें व क्षोभणें हे दोन्ही धर्म आहेत (२६–३५). [द. १४, स. ४]

हरिकथेचीं लक्षणें चतुर श्रोत्यांनीं आतां ऐकावींत. हरिकथा कशी करावी, रघुनाथ कृपापात्र कसें व्हावें हें सांगतों (१–२). सोन्याला सुगंध यावा किंवा इक्षुदंडाला (उंसाच्या कांड्याला) मृदु, मधुर व रसभरित फळें यावींत, त्याप्रमाणें हरिदास असून विरक्त, ज्ञाता असून प्रेमळ भक्त, व्युत्पन्न असून वादरहित पुरुष मिळावा ही मोठी नवलाची गोष्ट आहे. गायनावादनाची माहिती असून ब्रह्मज्ञानी व त्यांत पुन्हां निरभिमानी, निर्मत्सर, संतप्रिय, चतुरस्त्र व अंतर्निष्ठ असा पुरुष किती दुर्मिळ आहे ! (३–६) रामकृष्णजयंत्यादि पर्वें व मोठमोठीं तीर्थक्षेत्रें–या ठिकाणीं परमात्मा सामर्थ्यरूपानें वसतो. तीर्थांना न मानणारे व मिथ्या म्हणणाऱ्या पामरांना देव कसा मिळावा ? निर्गुण ज्ञान संशयानें आच्छादिलें व सगुण प्रेम शाब्दिक ब्रह्मज्ञानानें नाहींसें केलें. याप्रमाणें अभिमानाच्या पायीं ना निर्गुण ना सगुण अशी स्थिति या पामरांची

करिती । प्रदिपादून उच्छेदिती । तेचि पढतमूर्ख ॥ १० ॥ ऐसी न कीजे हरिकथा । अंतर पडे उभय पंथा । परिस लक्षणें आतां । हरिकथेचीं ॥ ११ ॥ सगुणमूर्तीपुढें भावें । करुणाकीर्तन करावें । नाना ध्यानें वर्णावें । प्रताप-कीर्तीतें ॥ १२ ॥ ऐसें गातां स्वभावें । रसाळ कथा वोढवे । सर्वांतरीं हेलावे । प्रेमसुख ॥ १३ ॥ कथा रचायाची खूण । सगुणीं नाणावें निर्गुण । न बोलावे दोष गुण । पुढिलांचे कदा ॥ १४ ॥ देवाचें वर्णावें वैभव । नाना प्रकारें महत्व । सगुणीं ठेवूनियां भाव । हरिकथा करावी ॥ १५ ॥ लाज सांडूनियां जनांची । आस्था सांडून धनाची । नीच नवी कीर्तनाची । आवडी धरावी ॥ १६ ॥ नम्र होऊन राजांगणीं । निःशंक जावें लोटांगणीं । करताळिका नृत्य वाणी । नामघोषें गर्जावें ॥ १७ ॥ येकांची कीर्ति येकांपुढें । वर्णितां साहित्य न पडे । म्हणोनियां निवाडे । जेथील तेथें ॥१८॥ मूर्ती नस्तां सगुण । श्रवणीं बैसले साधुजन । तरी अद्वैतनिरूपण । अवश्य करावें ॥ १९ ॥ नाहीं मूर्ती नाहीं सज्जन । श्रवणीं बैसले भाविक जन । तरी करावें कीर्तन । प्रस्ताविक वैराग्य ॥ २० ॥ शृंगारिक नवरसिक । यांमधें सांडावें येक । स्त्रियांदिकांचें कौतुक । वर्णू नये कीं ॥ २१ ॥ लावण्य स्त्रियांचें वर्णितां । विकार बाधिजे तत्वता । धारिष्टापासून श्रोता । चळे तत्काळ ॥२२॥ म्हणोनी तें त्यजावें । जें बाधक साधकां स्वभावें । घेतां अंतरीं ठसावें । ध्यान स्त्रियांचें ॥ २३ ॥ लावण्य स्त्रियांचें ध्यान । कामाकार जालें मन । कैचें आठवेल ध्यान । ईश्वराचें ॥ २४ ॥ स्त्री वर्णितां सुखावला । लावण्याचे भरीं भरला । तो स्वयें जाणावा चेवला । ईश्वरापासुनी ॥ २५ ॥ हरिकथेसी भावबळें । गेला रंग तो तुंबळे । निमिष येक जरी आकळे ।

होत असते. सगुणमूर्ति सन्मुख असतां सगुण मोडून जे निर्गुण प्रतिपादितात ते पढतमूर्ख होत. असें करूं नये. दोन्ही मार्ग दुरावतील अशी कथा करूं नये. सगुणमूर्तीपुढें करुणाकीर्तन करावें, ध्यान वर्णून देवाची प्रतापकीर्ति वाखाणावी, व प्रेमरसानें श्रोत्यांच्या हृदयांत प्रेमसुखाचें आंदोलन उत्पन्न करावें. सगुणांत निर्गुण आणूं नये, दुसऱ्यांच्या गुणदोषांची चर्चा करूं नये, देवाचें वैभव, महत्त्व व प्रेम वर्णावें, लोकलज्जा व धनलोभ सोडून नित्य कीर्तनाची नवी नवी गोडी धरावी. हरिमंदिरांत देवासमोर निःशंकपणें साष्टांग नमस्कार घालावे, टाळ्या वाजवून गात नाचत निःशंक नामघोष करावा. एका देवतेची कीर्ति दुसऱ्या देवतेपुढें गाऊं नये, गायिली तर रंग उठत नाहीं, जेथल्या तेथें असावें. सगुणमूर्ति पुढें नसून साधु-जन श्रवणास बसले असतील तर अद्वैताचें निरूपण करावें; भाविकांना अनुतापवैराग्याचें महत्त्व सांगावें. नवरसांपैकीं स्त्रियांदिकांचें कौतुक वर्णूं नये. स्त्रियांचें लावण्य वर्णितां श्रोता मनोधैर्यापासून चळण्याचा व विकारवंत होण्याचा संभव असतो. स्त्रियांचें ध्यान अंतरीं ठसून मन कामाकार झालें तर ईश्वराचें ध्यान कसें ठसेल? स्त्रीवर्णनानें श्रोता सुखावला व मन सकाम झालें म्हणजे तो देवापासून दूर झाला. क्षणभर जरी परमात्म्याचें ध्यान लागेल तरी भावबळानें कोणत्याही कारणानें रंग

ध्यानीं परमात्मा ॥ २६ ॥ ध्यानीं गुंतलें मन । कैचें आठवेल जन । निशंक निर्लज्ज कीर्तन । करितां रंग माजे ॥ २७ ॥ रागज्ञान ताळज्ञान । स्वरज्ञानेंसी व्युत्पन्न । अर्थान्वयाचें कीर्तन । करूं जाणे ॥ २८ ॥ छपन्न भाषा नाना कळा । कंठमाधुर्य कोकिळा । परी तो भक्तिमार्ग वेगळा । भक्त जाणती ॥ २९ ॥ भक्तांस देवाचें ध्यान । देवावांचून नेणे अन्न । कळावंतांचें जें मन । तें कळाकार जालें ॥ ३० ॥ श्रीहरिवीण जे कळा । तेचि जाणावी अवकळा । देवास सांडून वेगळा । प्रत्यक्ष पडिला ॥ ३१ ॥ सर्पी वेढिलें चंदनासी । निधानाआड विवसी । नाना कळा देवासी । आड तैशा ॥ ३२ ॥ सांडून देव सर्वज्ञ । नादामध्यें व्हावें मग्न । तें प्रत्यक्ष विघ्न । आडवें आलें ॥ ३३ ॥ येक मन तें गुंतलें स्वरीं । कोणें चिंतावा श्रीहरी । बळेंचि धरूनियां चोरीं । शुश्रूषा घेतली ॥ ३४ ॥ करितां देवाचें दर्शन । आडवें आलें रागज्ञान । तेणें धरूनियां मन । स्वरामागें नेलें ॥ ३५ ॥ भेटों जातां राजद्वारीं । बळेंचि धरिला बेगारी । कळावंतां तैसी परी । कळेनें केली ॥ ३६ ॥ मन ठेवून ईश्वरीं । जो कोणी हरिकथा करी । तोचि ये संसारीं । धन्य जाला ॥ ३७ ॥ जयास हरिकथेची गोडी । उठे नीच नवी आवडी । तयास जोडली जोडी । सर्वोत्तमाची ॥ ३८ ॥ हरिकथा मांडली जेथें । सर्व सांडून धावे तेथें । आलस्य निद्रा दवडून स्वार्थें । हरिकथेसि सादर ॥ ३९ ॥ हरिभक्तांचिये घरीं । नीच कृत्य अंगिकारी । साहेभूत सर्वांपरी । साक्षपें होये ॥ ४० ॥ या नांव हरिदास । जयांसि नामीं विश्वास । येथून हा समास । संपूर्ण जाला ॥ ४१ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे हरिकथालक्षणनिश्चय नाम समास पंचम ॥५॥

गेला असला तरी तो पुन्हां भरेल. ध्यानमग्न झाल्यावर जन कोठून आठवतील म्हणून निःशंक व निर्लज्ज कीर्तन करावें म्ह० हरिप्रेमाचा रंग भरतो. राग, ताल, स्वर यांचें ज्ञान असून अर्थान्वय बरोबर सांगणारा, कोकिळेसारखा मधुर कंठ असलेला, नाना भाषा व नाना कळा यांत निष्णात असा हरिदास भेटेल, पण भक्तिमार्गाचा रंग भक्त मात्र भरूं शकतात. भक्तांना देवाचें ध्यान प्रिय असतें, कळाप्रिय जनांचें मन आलापादि बाह्य गोष्टींतच रमतें ; देवावांचून ज्या कळा त्या अवकळाच होत, कां कीं त्यामुळें श्रोतेवक्ते देवापासून वेगळे पडतात. चंदनाभोंवतीं सर्प, निधानाआड जशीं पिशाचें त्याप्रमाणें कळा या देवाच्या आड येतात. देव सोडून नादांत मग्न झाला कीं नाद हें उघडच विघ्न झालें. एक मन तें जर स्वरांत गुंतलें तर मग श्रीहरीचें चिंतन करायला मन कोठें उरलें ? चोरानें बळेंच धरून वेठीला लावावें त्याप्रमाणें याचें मन स्वराकडे असून हा मुखानें हरिकीर्तन करीत असतो. देवाचें दर्शन घेतां रागज्ञान आडवें येतें व मनाला स्वरामागें नेतें. राजाला भेटायला जावें व मध्येंच कोणी बेगारी म्हणून धरावें, त्याप्रमाणें कळावंतांची दशा होते. देव दूर राहून बाह्यकलेंतच ते मग्न होतात. श्रीहरीच्या ठिकाणीं मन ठेवून जो हरिकीर्तन करील तोच या संसारांत धन्य होय. ज्याला हरिकथेची वाढती आवड आहे त्याला सर्वोत्तमाची प्राप्ती होते. तो सर्व उद्योग सोडून व आळस आणि निद्रा टाकून कथेला धांवत जातो, हरिभक्तांच्या घरीं हलकीं कामें करून त्यांना सर्व प्रकारचें साह्य करितो. तात्पर्य, ज्याला हरि प्रिय असून ज्याचा नामीं विश्वास आहे तो हरिदास (७–४१). [द० १४, स० ५]

॥ श्रीराम ॥ रूप लावण्य अभ्यासितां न ये । सहजगुणासी न चले उपाय । कांहीं तरी धरावी सोय । अगांतुक गुणाची ॥ १ ॥ काळें माणुस गोरें होयेना । वनाळास यत्न चालेना । मुक्यास वाचा फुटेना । हा सहजगुण ॥ २ ॥ आंधळें डोळस होयेना । बधिर तें ऐकेना । पांगुळ पाय घेईना । कांहीं केल्या ॥ ३ ॥ कुरूपतेचीं लक्षणें । किती म्हणोनी सांगणें । रूप लावण्य याकारणें । पालटेना ॥ ४ ॥ अवगुण सोडितां जाती । उत्तम गुण अभ्यासितां येती । कुविद्या सांडून सिकती । शाहाणे विद्या ॥ ५ ॥ मूर्खपण सांडितां जातें । शाहाणपण सिकतां येतें । कारभार करितां उमजतें । सकळ कांहीं ॥ ६ ॥ मान्यता आवडे जीवीं । तरी कां उपेक्षा करावी । चातुर्येंविण उंच पदवी । कदापी नाहीं ॥ ७ ॥ ऐसी प्रचित येते मना । तरी कां स्वहित कराना । सन्मार्गें चालतां जना । सज्जना माने ॥ ८ ॥ देह नेटकें शृंगारिलें । परी चातुर्येंविण नासलें । गुणेंविण साजिरें केलें । बाष्कळ जैसें ॥ ९ ॥ अंतर्कळा शृंगारावी । नानापरी उमजवावी । संपदा मेळवून भोगावी । सावकास ॥ १० ॥ प्रेत्न करीना सिकेना । शरीर तेंहि कष्टवीना । उत्तम गुण घेईना । सदाकोपी ॥ ११ ॥ आपण दुसऱ्यास करावें । तें उसिणें सवेंचि घ्यावें । जना कष्टवितां कष्टावें । लागेल बहु ॥ १२ ॥ न्यायें वर्तेल तो शाहाणा । अन्याइ तो दैन्यवाणा । नाना चातुर्याच्या खुणा । चतुर जाणे ॥ १३ ॥ जें बहुतांस मानलें । तें बहुतीं मान्य केलें । येर तें व्यर्थचि गेलें । जगनिंद्य ॥ १४ ॥ लोक आपणासि वोळावे । किंवा आवघेच

बाह्यरूप किंवा लावण्य पालटतां येत नाहीं, सहजगुणांस उपाय चालत नाहीं, म्हणून कांहीं तरी नवीन गुण अंगीं आणण्याचा अभ्यास करावा. काळें माणूस गोरें करितां येत नाहीं, देतोंडावर वीचे वगैरे वण असल्यास ते घालवितां येत नाहींत, मुक्याला वाचा फुटत नाहीं. आंधळ्याला डोळे, बहिऱ्याला कान, पांगळ्याला पाय म्ह० त्यांची शक्ती देतां येत नाहीं. कुरूपतेचीं सहज चिन्हें कांहीं दूर करतां येत नाहींत तथापि स्वभावदोष घालवितां येतात, चांगले गुण शिकतां येतात, शहाणे लोक कुविद्या टाकून सद्विद्या शिकतांना आपण पाहतोंच. मूर्खपण टाकतां येतें, शहाणपण शिकतां येतें, काम करायला लागलें कीं सर्व कांहीं समजतें (१-६). लोकांत मान्यता पाहिजे तर गुणसंपादनाची हेळसांड कां करावी ? चातुर्यावांचून श्रेष्ठपण मिळत नसतें. हें जाणून तुम्हीं स्वहित कां करीत नाहीं ? सन्मार्गानें चालावें म्हणजे सज्जन मानतात. वस्त्रालंकारांनीं देह नटविला तरी चातुर्यावांचून फुकट आहे. गुण नसतां बाष्कळाला सजविणें उपहास्य होतें. चातुर्यानें अंतरंग शृंगारावें, नाना परीनें बुद्धि वाढवावी, ऐश्वर्य मिळवून भोगावें (७–१०). प्रयत्न करायला नको, कांहीं शिकायला नको, शरीरकष्ट नकोत, वाणी उत्तम नाहीं, सदांचा कोपिष्ट अशा मूर्खास काय म्हणावें ? आपण दुसऱ्याला करावें तसेंच दुसरे आपणांस करितात. लोकांस दुःख दिलें तर दुःखच मिळतें व सुख दिलें तर लोकहि आपणांस सुखी करितात. न्यायानें वागतो तो शहाणा, अन्यायानें वागतो तो करंटा, चातुर्याचीं अनेक लक्षणें आहेत, तीं चतुरच जाणतो. जें बहुत लोकांस रुचतें तेंच लोकांत मान्य होतें ; बाकीचें जगनिंद्य सारें व्यर्थ होय. लोक आपणांस वश व्हावेत असें तुम्हांला वाटतें का सारे उलटून

कोंसळावे । आपणास समाधान फावे । ऐसें करावें ॥ १५ ॥ समाधानें समाधान वाढे । मित्रीनें मित्री जोडे । मोडितां क्षणमात्रें मोडे । बरेंपण ॥ १६ ॥ अहो कांहो अरे कांरे । जनीं ऐकिजेतें कीं रे । कळत असतांच कां रे । निकामीपण ॥ १७ ॥ चातुर्यें शृंगारे अंतर । वस्त्रें शृंगारे शरीर । दोहींमध्यें कोण थोर । बरें पाहा ॥ १८ ॥ बाह्याकार शृंगारिलें । तेणें लोकांच्या हातासी काय आलें । चातुर्यें बहुतांसी रक्षिलें । नाना प्रकारें ॥ १९ ॥ बरें खावें बरें जेवावें । बरें ल्यावें बरें नेसावें । समस्तीं बरें म्हणावें । ऐसी वासना ॥ २० ॥ तनें मनें झिजावें । तेणें भलें म्हणोनी घ्यावें । उगेंचि कल्पितां सिणावें । लागेल पुढें ॥ २१ ॥ लोकीं कार्यभाग आडे । तो कार्यभाग जेथें घडे । लोक सहजचि वोढे । कामासाठीं ॥ २२ ॥ म्हणोनी दुसऱ्यांस सुखी करावें । तेणें आपण सुखी व्हावें । दुसऱ्यांसी कष्टवितां कष्टावें । लागेल स्वयें ॥ २३ ॥ हें तों प्रगटचि आहे । पाहिल्यावीण कामा नये । समजणें हा उपाय । प्राणिमात्रांसी ॥२४॥ समजले आणी वर्तले । तेचि भाग्यपुरुष जाले । यावेगळे उरले । ते करंटे पुरुष ॥ २५ ॥ जितुका व्याप तितुकें वैभव । वैभवासारिखा हावभाव । समजलें पाहिजे उपाव । प्रगटचि आहे ॥ २६ ॥ आळसें कार्यभाग नासतो । आक्षेप होत होत होतो । दिसते गोष्टी कळेना तो । शाहाणा कैसा ॥ २७ ॥ मित्री करितां होतें कृत्य । वैर करितां होतो मृत्य । बोलिलें हें सत्य कीं असत्य । वोळखावें ॥ २८ ॥

पडावेत असें वाटतें ? आपणांस समाधान सुख मिळेल तेंच करणें योग्य होय. समाधान दिलें तर आपलें समाधान. वाढतें. स्नेहानें स्नेह जोडतो, बरेपण काय एका क्षणांतही मोडतें ! ' अहो तर कां हो व अरे तर कांरे ' असें जन म्हणतांना आपण ऐकतों ; हें जाणत असून आळसटपणानें (चातुर्याचा अभ्यास न करतां) अरे कां म्हणावें ? चातुर्य हें अंतरंगाचें भूषण आहे, व वस्त्र हें बाह्य शरिराचें भूषण आहे, दोहोंत श्रेष्ठ भूषण कोणतें तें पहा तर खरें. देह शृंगारिले तर लोकांना त्याचा काय लाभ ? चातुर्याच्या योगानें अनेकांचें अनेक प्रकारें रक्षण करितां येतें (११–१९). खाणेंपिणें, वस्त्रालंकार सर्व यथास्थित असावें व सर्वांनीं भलें म्हणावें अशी इच्छा असेल तर शरीर व मन यांना कष्ट दिलें पाहिजेत, श्रमसाहस केले पाहिजेत, नुस्त्या कल्पना करीत आळशी राहिल्यास शेवटीं दुःखच भोगावें लागणार ! लोकांचा कार्यभाग जेथें अडून राहतो तेथें तो होण्याचा जो उपाय सुचवितो त्याच्याकडे लोक सहजच वळतात. म्हणून दुसऱ्यांला सुखी करण्यानेंच आपण सुखी होतों, व दुसऱ्यास कष्टविल्यानें (त्यांचे कष्ट दूर न केल्यानें) आपणांस कष्ट भोगावे लागतात हें स्पष्टच आहे, विचार केल्यावांचून उपाय काय ? समजणें हाच (स्वोद्धाराचा व समाधानाचा) सर्वांस एक उपाय आहे (२०–२४). समजतात व त्याप्रमाणें वागतात तेच पुरुष भाग्य भोगतात, यांवाचून बाकीचे करंटे होत. जितके श्रमसाहस (व्याप) अधिक तितकें भाग्य अधिक या भाग्यानुसार माणसें व्याप म्ह० उद्योगहि करितात, हें समजून वागलें पाहिजे. भाग्याचा उपाय म्ह० उद्योग हें उघडच आहे (२५–२६). आळसानें कामें नासतात, उद्योगानें (साक्षेप)-कामें यथाक्रम सिद्धीला जातात हें स्पष्ट असून ज्याला कळत नाहीं त्याला शाहणें कसें म्हणावें ? स्नेह वाढविल्यानें (मित्रसाह्यानें) कार्यें सफल होतात. व वैरानें तीं फसतात, हें खरें कीं खोटें विचार करून पहा (२७–२८). शहाणपण शिकून जनांत मैत्री वाढवीत नाहींत व द्वेषभाव

आपणास शाहाणें करूं नेणे । आपलें हित आपण नेणे । जनीं मैत्री राखों नेणे । वैर करी ॥ २९ ॥ ऐसे प्रकारींचे जन । त्यासी म्हणावें अज्ञान । तयापासीं समाधान । कोण पावे ? ॥ ३० ॥ आपण येकायेकी येकला । सृष्टींत भांडत चालिला । बहुतांमध्यें येकल्याला । यश कैंचें ॥ ३१ ॥ बहुतांचे मुखीं उरावें । बहुतांचे अंतरीं भरावें । उत्तम गुणीं विवरावें । प्राणिमात्रांसी ॥ ३२ ॥ शाहाणे करावे जन । पतित करावे पावन । सृष्टिमध्यें भगवद्भजन । वाढवावें ॥ ३३ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चातुर्यलक्षणनाम समास षष्ठ ॥ ६ ॥

॥ श्रीराम ॥ नाना वेष नाना आश्रम । सर्वांचें मूळ गृहस्थाश्रम । जेथें पावती विश्राम । त्रैलोक्यवासी ॥ १ ॥ देव ऋषी मुनी योगी । नाना तापसी वीतरागी । पितृआदिकरून विभागी । अतीत अभ्यागत ॥ २ ॥ गृहस्थाश्रमीं निर्माण जाले । आपला आश्रम टाकून गेले । परंतु गृहस्थगृहीं हिंडों लागले । कीर्तिरूपें ॥ ३ ॥ याकारणें गृहस्थाश्रम । सकळांमध्यें उत्तमोत्तम । परंतु पाहिजे स्वधर्म । आणि भूतदया ॥ ४ ॥ जेथें षट्कर्में चालती । विध्युक्त क्रिया आचरती । वाग्माधुर्यें बोलती । प्राणिमात्रांसी ॥ ५ ॥ सर्वप्रकारें नेमक । शास्त्रोक्त करणें कांहींयेक । त्याहीमध्यें अलोकिक । तो हा भक्तिमार्ग ॥ ६ ॥ पुरश्चरणीं काया क्लेसी । दृढव्रती परम सायासी । जगदीशावेगळें जयासी । थोर नाहीं ॥ ७ ॥ काया वाचा जीवें प्राणें । कष्टे भगवंताकारणें । मनें घेतलें धरणें । भजनमार्गी ॥ ८ ॥ ऐसा भगवंताचा भक्त । विशेष अंतरीं विरक्त । संसार सोडून जाला मुक्त । देवाकारणें ॥ ९ ॥

वाढवितात, त्या मूर्खापाशीं समाधान कोणांस मिळेल ? ज्याचें लोकांशीं पटत नाहीं व जो सगळ्यांशीं भांडत चालला त्याला यश कसचें मिळणार ? बहुतांस मान्य व प्रिय व्हावें, प्राणिमात्रांचे गुण घ्यावेत व ऐक्य वाढवावें. लोक शाहणे करावे, पतितपावन करावे व लोकांत भगवद्भक्ति वाढवावी (२९–३३). [द० १४, स० ६]

अनेक वेष व अनेक आश्रम आहेत पण सर्वांचें मूळ गृहस्थाश्रम आहे. त्रैलोक्यांतील सर्व प्राणी तेथें विश्रांति पावतात. देव, ऋषी, मुनी, योगी, तपस्वी, वैराग्यवंत, अतीत, अभ्यागत, ज्यांचा भाग आहे असे पितर वगैरे सर्व मूळ गृहस्थाश्रमींच जन्म पावले व आश्रमांतर करून गेले तरी कीर्तिरूपानें गृहस्थांच्या घरींच पुनः फिरत असतात. यासाठीं सर्व आश्रमांत स्वधर्माचरण आणि भूतदया हें संभाळून राहिलें पाहिजे (१–४). जेथें यजन याजन, अध्ययन, अध्यापन, दान व प्रतिग्रह हीं षट्कर्में चालतात, जेथें विधियुक्त सर्व कर्में होत असतात, जेथें प्राणिमात्रांशीं मधुर वाणीनें बोलतात, जेथें सर्व आचार शास्त्रांप्रमाणें नियमितपणानें पाळले जातात, जेथे मुख्यतः भक्तिमार्गाप्रमाणें घरची सर्व मंडळी वागते, जेथें गायत्र्यादि पुरश्चरणें दृढव्रतानें शरीरकष्ट सोसून करितात, जेथें परमात्म्यावांचून श्रेष्ठ दुसरें कांहींच जाणत नाहींत व काया, वाचा, जीव, प्राण वेंचून भगवंताच्या उपासनेंत सर्व कालक्षेप होतो असा गृहस्थाश्रम परम धन्य होय (५–८). गृहस्थाश्रम याप्रमाणें चालविणारा भगवद्भक्त अंतरीं विशेष वैराग्य बळावल्यामुळें संसार सोडून देवासाठीं घराबाहेर पडला तर हें त्याचें

अंतरापासून वैराग्य । तेंचि जाणावें महद्भाग्य । लोलंगतेयेवढें अभाग्य । आणीक नाहीं ॥ १० ॥ राजे राज्य सांडून गेले । भगवंताकारणें हिंडले । कीर्तिरूपें पावन जाले । भूमंडळीं ॥ ११ ॥ ऐसा जो कां योगेश्वर । अंतरीं प्रत्ययाचा विचार । उकलूं जाणे अंतर । प्राणिमात्रांचें ॥ १२ ॥ ऐसी वृत्ति उदासीन । त्याहिवरी विशेष आत्मज्ञान । दर्शनमात्रें समाधान । पावती लोक ॥ १३ ॥ बहुतांसी करी उपाय । तो जनाच्या वाट्या न ये । अखंड जयाचें हृदय । भगवद्रूप ॥ १४ ॥ जनांस दिसे हा दुश्चित । परी तो आहे सावचित । अखंड जयाचें चित्त । परमेश्वरीं ॥ १५ ॥ उपासनामूर्ति ध्यानीं । अथवा आत्मानुसंधानीं । नाहीं तरी श्रवणमननीं । निरंतर ॥ १६ ॥ पूर्वजांच्या पुण्य कोटी । संग्रह असिल्यां गांठीं । तरीच ऐसियाची भेटी । होय जनासी ॥ १७ ॥ प्रचीतीविण जें ज्ञान । तो आवघाचि अनुमान । तेथें कैचें परत्रसाधन । प्राणियांसी ॥ १८ ॥ याकारणें मुख्य प्रत्यय । प्रचीतिवीण कामा नये । उपायासारिखा अपाय । शाहाणे जाणती ॥ १९ ॥ वेडें संसार सांडून गेलें । तरी तें कष्टकष्टोंचि मेलें । दोहींकडे अंतरलें । इहलोक परत्रीं ॥ २० ॥ रागें रागें निघोन गेला । तरी तो भांडभांडोंचि मेला । बहुत लोक कष्टी केला । आपणहि कष्टी ॥ २१ ॥ निघोन गेला परी अज्ञान । त्याचे संगती लागले जन । गुरु शिष्य दोघे समान । अज्ञानरूपें ॥ २२ ॥ आशाबद्ध अनाचारी । निघोनि गेला देशांतरीं । तरी तो अनाचारचि करी । जनामध्यें ॥ २३ ॥ गृहीं पोटेंवीण कष्टती । कष्टी होऊन निघोन जाती । त्यास ठाईं ठाईं मारिती ।

खरें व पूर्ण वैराग्य, हेंच महद्भाग्य होय. विषयसुखाच्या आसक्तीसारखें अभाग्य दुसरें कोणतेंच नाहीं. (जनकभर्तृहरीसारखे) अनेक राजे राज्य सोडून भगवत्प्राप्तीसाठीं हिंडले व त्रैलोक्यांत कीर्तिरूपानें पावन झाले आहेत. असा वैराग्यसंपन्न योगेश्वर, कीं ज्यापाशीं स्वानुभव जागृत आहे, त्याला प्राणिमात्रांचें अंतःकरण विवकानें खोलतां येतें. उदासीन निःस्वार्थ वृत्ति, त्यावर विशेष आत्मज्ञान अशा पुरुषाच्या दर्शनानेंच लोक समाधान पावतात. तो बहुतांस उद्धाराचा मार्ग दाखवितो, सर्वांच्या वांट्यालाच तो कुठें येतो? तो निरंतर हरिरूपीं रंगलेला असतो. इतरांस दुश्चित वाटला तरी तो अंतरीं फार सावध असतो. त्याचें चित्त उपास्यमूर्तीच्या ध्यानांत मग्न असतें, किंवा तो स्वस्वरूपानुसंधानांत तन्मय असतो, नाहींतर श्रवण मननांत गर्क असतो. पूर्वजांचें थोर पुण्य वांट्याला आलें असलें तर संसारांतल्या जीवांस अशा विभूतींची संगति मिळते (९–१७). प्रचीतीवीण नुसतें अनुमानाचें शब्दज्ञान ज्यांपाशीं असतें त्यांपासून परलोकींचें साधन लोकांस नाहीं, म्हणून आत्मप्रत्यय हा मुख्य आहे. अनुभवावांचून ज्ञान काय कामाचें? जाणत्यांना उपाय (प्रत्ययाचें ज्ञान) व अपाय (शब्दज्ञान) यांतील तारतम्य कळत असतें (१८–१९). खरें वैराग्य होऊन देवासाठीं संसार सोडणारे सत्पुरुष कसे धन्य होतात व जगाच्या उपयोगीं पडतात हें वर सांगितलें, आतां अर्धवट लोक संसार सोडून गेले तर कष्टांतच राहून इहपर लोकांस कसे आंचवतात तें पहा–वेडा बायकांपोरांवर रुसून (वैराग्य होऊन नव्हे) घराबाहेर पडला तरी तो (इंद्रियजय न झाल्यामुळें) भांडभांडून स्वतःस व दुसऱ्यांस त्यानें दुःखी केलें. निघोन गेला तरी अज्ञानीच राहिला व त्याच्या संगतीला त्याच्याच सारखीं दोन अडाणी माणसें मिळालीं. हा गुरु व ते चेले ! आशाळभूत व अनाचारी पहिलाच होता तशाचा तसाच राहिला. घरचीं बायकापोरें पोटाचे हाल भोगीत गृहत्याग करून भटकूं लागलीं व चोरालबाडांनीं

चोरी भरतां ॥ २४ ॥ संसार मिथ्या ऐसा कळला । ज्ञान समजोन निघोन गेला । तेणें जन पावन केला । आपणाऐसा ॥ २५ ॥ येके संगतीनें तरती । येके संगतीनें बुडती । याकारणें सत्संगती । बरी पाहावी ॥ २६ ॥ जेथें नाहीं विवेकपरीक्षा । तेथें कैंची असेल दीक्षा । घरोघरीं मागतां भिक्षा । कोठेंहि मिळेना ॥ २७ ॥ जो दुसऱ्याचें अंतर जाणे । देश काळ प्रसंग जाणे । तया पुरुषा काय उणें । भूमंडळीं ॥ २८ ॥ नीच प्राणी गुरुत्व पावला । तेथें आचारचि बुडाला । वेदशास्त्रब्राह्मणाला । कोण पुसे ॥ २९ ॥ ब्रह्मज्ञानाचा विचारु । त्याचा ब्राह्मणासीच अधिकारु । वर्णानां ब्राह्मणो गुरुः । ऐसें वचन ॥३०॥ ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले । गुरुत्व सांडून जाले । शिष्य शिष्यांचे ॥ ३१ ॥ कित्येक दावलमलकास जाती । कित्येक पीरासीच भजती । कित्येक तुरुक होती । आपले इच्छेनें ॥३२॥ ऐसा कलियुगींचा आचार । कोठें राहिला विचार । पुढें पुढें वर्णसंकर । होणार आहे ॥ ३३ ॥ गुरुत्व आलें नीचयाती । कांहींयेक वाढली महंती । शूद्र आचार बुडविती । ब्राह्मणांचा ॥३४॥ हें ब्राह्मणांस कळेना । त्यांची वृत्तिच वळेना । मिथ्या अभिमान गळेना । मूर्खपणाचा ॥३५॥ राज्य नेलें म्लेच्छ क्षेत्रीं । गुरुत्व नेलें कुपात्रीं । आपण अरत्रीं ना परत्रीं । कांहींच नाहीं ॥ ३६ ॥ ब्राह्मणास ग्रामणीनें बुडविलें । विष्णूनें श्रीवत्स मिरविलें । त्याच विष्णूनें श्रापिलें । परशरामें ॥ ३७ ॥ आम्हीहि

बुडविलें. संसार मिथ्या असें पुरें कळून व ज्ञानविचार दृढ समजून जर मनुष्य घरदार सोडून बाहेर पडेल तर तो आपणासारख्या लोकांचाही उद्धार करील. भल्या संगतीनें लोक तरतात व वाईट संगतीनें बुडतात म्हणून सज्जनांची संगति करावी. विवेक विचार नाहीं तेथें परमार्थदीक्षा म्हणजे सोंग आहे. अशा सोंगानें माणसें वश होत नाहींत. याला धड खायलाही मिळत नाहीं मग परमार्थाचें नांव कशाला पाहिजे ? जो दुसऱ्यांचें अंतर जाणून त्यांना वेध लावूं शकतो व देशकालप्रसंग जाणून वर्तूं शकतो त्याला भूमंडळावर काय कमी आहे ? (२०–२८). देशकाळ प्रसंग कसा आहे तें पहा–नीच प्राण्यांकडे गुरुत्व गेलें, त्यामुळें आचारमार्ग बुडाला आहे. अशा समयीं वेदांना, शास्त्रांना व ब्राह्मणांना पुसतो कोण ? ब्रह्मज्ञानाचा विचार सांगण्याचा ब्राह्मणांसच अधिकार आहे. चारी वर्णांचे गुरु ब्राह्मण असें शास्त्रवचन आहे. बरें ब्राह्मणांकडे पाहावें तर त्यांनीं आचारविचार सोडला आहे ! ब्राह्मण बुद्धिभ्रष्ट व आचारशून्य झाले आहेत. आपली गुरुत्वाची पायरी सोडून ज्यांना यांनीं शिकवावें अशांचें हे शिष्यत्व पत्करीत आहेत. कित्येक ब्राह्मण दावलमलकाला जातात, कित्येक पिरांना भजतात, कित्येक तर आपखुषीनें परधर्मीय झाले आहेत. कलियुगाच्या प्राबल्यामुळें याप्रमाणें आचारच मुळीं सुटला, मग विचार कोठें राहील ? असो. हळूहळू वर्णसंकर व्हायचाच आहे ! गुरुत्व नीच यातींकडे जाऊन त्यांची चढती कमान झाली आहे व शूद्रांनीं ब्राह्मणांचा आचार बुडविला आहे. पण आश्चर्य हें कीं आपली अधोगती किती झाली याचा ब्राह्मण विचार करीत नाहींत, त्यांना अनुताप होत नाहीं, ते मूर्खपणाचा अभिमान धरून बसले आहेत. म्लेंच्छ लोकांनीं राज्य नेलें, हीन यातींनीं गुरुत्व नेलें, ब्राह्मणांना प्रपंचांत किंवा परमार्थांत कोठेंच महत्त्व राहिलें नाहीं. ब्राह्मणांना ग्रामणीनें (गांवगुंडपणानें, परस्पर चढाओढीनें, मत्सरानें) सत्वशून्य केलें आहे ; ज्या विष्णूनें ब्राह्मणाच्या आदरप्रेमानें श्रीवत्स (भृगूनें लाथ मारिली त्याचें चिन्ह) मिरविलें त्याच विष्णूनें

तेचि ब्राह्मण । दुःखें बोलिलें हें वचन । वडिल गेले ग्रामणी करून । आम्हांभोंवते ॥ ३८ ॥ आतांचे ब्राह्मणीं काय केलें । अन्न मिळेना ऐसें जालें । तुम्हा बहुतांचे प्रचीतीस आलें । किंवा नाहीं ॥ ३९ ॥ बरें वडिलांस काय म्हणावें । ब्राह्मणाचें अदृष्ट जाणावें । प्रसंगें बोलिलें स्वभावें । क्षमा केलें पाहिजे ॥ ४० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे युगधर्मनिरूपणनाम समास सप्तम ॥ ७ ॥

॥ श्रीराम ॥ बरें ऐसा प्रसंग जाला । जाला तो होऊन गेला । आतां तरी ब्राह्मणीं आपणांला । शाहाणे करावें ॥ १ ॥ देव पूजावा विमळहस्तीं । तेणें भाग्य पाविजे समस्तीं । मूर्ख अभक्त वेस्ती । दरिद्र भोगिजे ॥ २ ॥ आधीं देवास वोळखावें । मग अनन्यभावें भजावें । अखंड ध्यानाचि धरावें । सर्वोत्तमाचें ॥३॥ सर्वांमध्यें जो उत्तम । तया नांव सर्वोत्तम । आत्मानात्मविवेकवर्म । ठाईं पाडावें ॥ ४ ॥ जाणजाणों देह रक्षी । आत्मा द्रष्टा अंतरसाक्षी । पदार्थमात्रांस परीक्षी । जाणपणें ॥ ५ ॥ तो सकळ देहांमध्यें वर्तती । इंद्रियग्राम चेष्टविती । प्रचितीनें प्रत्यया येतो । प्राणिमात्रीं ॥ ६ ॥ प्राणिमात्रीं जगदंतरें । म्हणोनि राखावीं अंतरें । दाता भोक्ता परस्परें । सकळ कांहीं ॥ ७ ॥ देव वर्ततो जगदंतरीं । तोचि आपुले अंतरीं । त्रैलोकींचे प्राणिमात्रीं । बरें पाहा ॥ ८ ॥ मुळीं पाहाणार तो येकला । सकळां ठाईं विभागला । देहप्रकृतीनें जाला । भिन्न भिन्न ॥ ९ ॥ भिन्न भासे देहाकारें । प्रस्तुत येकचि अंतरें । बोलणें चालणें निर्धारें । त्यासीच घडे ॥ १० ॥ आपुले पारिखे सकळ

परशुरामावतारीं ब्राह्मणांस शाप दिला! आम्हींही त्याच ब्राह्मणजातीचें व हें दुःखानें बोलत आहोंत पण वडील (पूर्वीचे ब्राह्मण, मागच्या पिढ्या) जो गोंधळ करून गेले तो आम्हांस निस्तरावा लागत आहे. प्रत्यक्षच पहा कीं ब्राह्मण अन्नालाही महाग झाले आहेत. ब्राह्मणांचें नशीब. दुसरें काय? (२९–४०). [द० १४, स० ७]

असो. असा प्रसंग तर येऊन ठेपला आहे. मागें झालें तें झालें, आतां तरी ब्राह्मणांनीं शहाणपण शिकावें (१). पवित्र हातांनीं देवाची पूजाअर्चा करावी म्हणज सर्वांचें भाग्य उदय पावेल; मूर्ख पाखांडो व अव्यवस्थित असतात तेच दारिद्र्यांत खितपत पडतात. देवाला आधीं ओळखावें आणि मग एकनिष्ठेनें भजावें, सर्वोत्तमाचें अखंड ध्यान धरावें (२–३). तो सर्वांत उत्तम म्ह. सर्वोत्तम आहे. आत्मा कोण व अनात्मा कोण याचा विचार करावा. सर्व जाणून देहाचें रक्षण करणारा, द्रष्टा, अंतरसाक्षी, पदार्थमात्रांस जाणून त्याची परीक्षा करणारा तो आत्मा. आत्मा सर्व देहांत असतो, इंद्रियसमुदाय वर्तवितो, सर्वांभूतीं तो आहे अशी प्रचीति येते. जगदात्मा प्राणोमात्रांच्या अंतरीं राहतो, म्हणून सर्वांचीं अंतरें राखावींत (हीच वस्तुतः त्याची पूजा होय). दाता भोक्ता सर्व कांहीं तो आहे. तो देव जगदंतरीं आहे. व तोच आपले अंतरीं आहे. त्रैलोक्यांतील यच्चावत् प्राण्यांच्या अंतरीं आहे. पाहाणारा द्रष्टा. तो, तो देहप्रकृतीमुळें भिन्न भिन्न भासतो, पण सर्वांठायीं तोच एकटा आहे. देहाचे आकार वेगळाले पण अंतर (आत्मा) एकच. बोलणें, चालणें तोच करितो. आपले व पारखे (परके) सारे लोक, पशु, पक्षी, कीटक, किडामुंगी लहानथोर सर्व प्राणी; खेचर (आकाशांत फिरणारे,)

लोक । पक्षी श्वापद पश्वादिक । किडा मुंगी देहधारक । सकळ प्राणी ॥११॥ खेचर भूचर वनचर । नाना प्रकारें जळचर । चत्वार खाणी विस्तार । किती म्हणोन सांगावा ॥ १२ ॥ समस्त जाणीवेनें वर्तती । रोकडी पाहावी प्रचिती । त्याची आपुली संगती । अखंड आहे ॥ १३ ॥ जगदंतरें वोळला धणी । किती येकवटील प्राणी । परी ते वोळायाची करणी । आपणापासीं ॥ १४ ॥ हें आपणाकडेच येतें । राजी राखिजे समस्तांतें । देहासी बरें करावें तें । आत्मयास पावे ॥ १५ ॥ दुर्जन प्राणी त्यांतील देव । त्याचा लाताड स्वभाव । रागास आला जरी राव । तरी तंडों नये कीं ॥ १६ ॥ प्रसंगीं सांडीच करणें । पुढें विवेक विवरणें । विवेकें सज्जनचि होणें । सकळ लोकीं ॥ १७ ॥ आत्मत्वीं दिसतो भेद । हा अवघाचि देहसमंध । येका जीवनें नाना स्वाद । औषधीभेदें ॥ १८ ॥ गरळ आणि अमृत जालें । परि आपपण नाहीं गेलें । साक्षत्वें आत्मयास पाहिलें । पाहिजे तैसें ॥ १९ ॥ अंतरनिष्ठ जो पुरुष । तो अंतरनिष्ठेनें विशेष । जगामध्यें जो जगदीश । तो तयास वोळखे ॥ २० ॥ नयनेंचि पाहावा नयन । मनें शोधावें मन । तैसाचि हा भगवान । सकळां घटीं ॥ २१ ॥ तेणेंविण कार्यभाग आडे । सकळ कांहीं तेणेंचि घडे । प्राणी विवेकें पवाडे । तेणेंचि योगें ॥ २२ ॥ जागृतीस व्यापार घडतो । समंध तयासीच पडतो । स्वप्नामध्यें घडे जोतो । येणेंचि न्यायें ॥ २३ ॥ अखंड ध्यानाचें लक्षण । अखंड देवाचें स्मरण । याचें कळतां विवरण । सहजचि घडे ॥ २४ ॥ सहज सांडून सायास । हाचि कोणीयेक दोष । आत्मा सांडून

वनचर (वनांत हिंडणारे) व भूचर (पृथ्वीवर राहणारे), जलचर (मत्स्यादि पाण्यांत वावरणारे), तात्पर्य चारी खाणीचे सर्व प्राणी जाणिवेनें वर्ततात. जाणीव म्ह० अंतरात्मा. त्याचा प्रत्यय आपणांस आहे. त्याची आपली अखंड संगति आहे (४–१३). तो साऱ्या जगाच्या अंतरीं एकला एक वसत असल्यामुळें तो वळला कीं साऱ्या प्राण्यांचीं अंतरें वश झालीं म्हणून समजावें, नाहींतर मनुष्य किती प्राणी एकवटील ? (कितीकांना वश करील ?) पण सर्वांना वश करण्याची युक्ती आपणापाशीं आहे, ती ही कीं आपण त्याला वश करून घ्यावें (१४). हें आपल्याकडे आहे. समस्तांना राजी राखावें, सर्वांच्या देहांला बरें केलें कीं आत्माराम प्रसन्न होतो. दुर्जन प्राण्यांतही देव आहे. तेथें त्याचा स्वभाव तिरसट दिसला तरी त्या प्रभूला ओळखून तंडूं नये. तो संतापला तर थोडा काळ दूर सरावें, नंतर विवेकानें पाहावें, विवेकानें सर्वांशीं आपलें सौजन्य संभाळावें. आत्मत्वीं भेद दिसतो पण देह भिन्न आहेत त्यांतील आत्मा एकच आहे. नाना रसास्वाद देणाऱ्या औषधी अनेक पण त्या सर्वांतील जीवन एकच आहे. विष आणि अमृत यांत आपपण एकच, तसेंच साक्षित्वानें सुष्ट व दुष्ट यांत आत्मा एकच आहे हें पाहावें. अंतर्निष्ठ पुरुष साऱ्या जगांत जो एक अंतरात्मा आहे त्याला–त्या जगदीशाला–पाहतो. नयनानें नयन पाहावा किंवा मनानें मन शोधावें तसा हा अंतरात्मा अंतरात्म्यानें (तो आपण होऊन) पाहावा. त्यामुळेंच सारीं कार्यें होतात व त्यावांचून सारीं अडतात, त्याच्या द्वारेंच मनुष्याला विवेक सुचतो, जागृतींतले व स्वप्नांतले सारे व्यापार त्याच्यामुळेंच होतात–तोच करितो. त्या सकलांतर्यामीं देवाचें अखंड स्मरण म्हणजेच देवाचें अखंड ध्यान होय. याचें विवरण कळतां कळतां तें ध्यान सहजच घडतें (१५–२४). हें सहजध्यान सोडून सायासानें ध्यानास बसणें म्ह० आत्मा

अनात्म्यास । ध्यानीं धरिती ॥ २५ ॥ परी तें धरितांहि धरेना । ध्यानीं
येति व्यक्ति नाना । उगेंचि कष्टविती मना । कासाविस करूनी ॥ २६ ॥
मूर्तिध्यान करितां सायासें । तेथें येकाचें येकचि दिसे । भासों नये तेंचि
भासे । विलक्षण ॥ २७ ॥ ध्यान देवाचें करावें । किंवा देवालयाचें करावें ।
हेंचि बरें विवरावें । आपुले ठाईं ॥ २८ ॥ देह देउळ आत्मा देव । कोठें
धरूं पाहातां भाव । देव वोळखोन जीव । तेथेंचि लावावा ॥ २९ ॥ अंतर-
निष्ठा ध्यान ऐसें । दंडकध्यान अनारिसें । प्रत्ययेंविण सकळ पिसें ।
अनुमानध्यान ॥ ३० ॥ अनुमानें अनुमान वाढे । ध्यान धरितां सर्वेचि मोडे ।
उगेचि कष्टती बापुडे । स्थूळध्यानें ॥ ३१ ॥ देवास देहधारी कल्पिती । तेथें
नाना विकल्प उठती । भोगणें त्यागणें विपत्ति । देहयोगें ॥ ३२ ॥ ऐसें मनीं
आठवतें । विचारितां भलतेंचि होतें । दिसों नये तें दिसतें । नाना स्वप्नीं
॥ ३३ ॥ दिसतें तें सांगतां नये । बळें भावार्थ धरितां नये । साधक कासाविस
होय । अंतर्यामीं ॥ ३४ ॥ सांगोपांग घडे ध्यान । त्यास साक्ष आपुलें मन ।
मनामध्यें विकल्पदर्शन । होऊंच नये ॥ ३५ ॥ फुटक मन येकवटिलें । तेणें तुटक
ध्यान केलें । तेथें कोण सार्थक जालें । पाहाना कां ॥ ३६ ॥ अखंड ध्यानें न
घडे हित । तरी तो जाणावा पतित । हाचि अर्थ सावचित । बरा पाहावा
॥ ३७ ॥ ध्यान धरितें तें कोण । ध्यानीं आठवतें तें कोण । दोनींमध्यें अनन्य-
लक्षण । असिलें पाहिजे ॥ ३८ ॥ अनन्य सहजचि आहे । साधक शोधून न
पाहे । ज्ञानी तो विवरोन राहे । समाधानें ॥ ३९ ॥ ऐसीं हीं प्रत्ययाचीं कामें ।

सोडून अनात्म्यास भजणें होय. आणि अनात्म्याचें ध्यानही साधत नाहीं, मनांत अनेक रूपें येतात व मनाला उगीच कष्ट होतात. मूर्तीचें ध्यान करावयास सायासानें बसावें तों एकाला धरायला जावें तर दुसरेंच मनापुढें येतें, व भासूं नये तें नाना प्रकारें भासतें. ध्यान देवाचें करायचें का देवालयाचें करायचें याचा मनाशीं नीट विचार करावा. याला अंतर्निष्ठा ध्यान म्हणतात; दंडक ध्यान तें वेगळें आहे. लोकीं जो दंडक (रीत, रूढी) पडला त्याप्रमाणें तें करितात. तें अनुमान ध्यान होय. प्रत्ययावांचून सारा वेडेपणा आहे. कल्पनेनें कल्पना वाढते ध्यान धरितां धरितांच तें मोडतें. वेडे लोक स्थूलाचें ध्यान करून वृथा कष्ट पावतात. देवाला देहधारी कल्पितात त्यामुळें मन नाना विकारांनीं भरून जातें, देह घेतला कीं भोग, त्याग व विपत्ति त्यामागें आहेत (तशाच या देवाला असतील) इ० विकल्प मनांत येऊन, दिसूं नये तें स्वप्नीं दिसूं लागतें. दिसतें तें सगळें सांगतां येत नाहीं, हट्टानें कृत्रिम भाव धरवत नाहीं, व याप्रमाणें साधक मनांत कष्टी होतो. भाग्यानें सांगोपांग ध्यान ज्याला घडतें त्याचें मनच साक्षी असतें व त्याला समाधानसुख मिळतें, त्याला स्वप्नांतही विकल्प येत नाहीं. फुटकें मन एक करून तुटकें ध्यान केलें तर त्याचा उपयोग काय ? अखंड ध्यानानें देव जोडला नाहीं तर भजक पतित (अपात्र) आहे असें समजावें (२५–३७). ध्यान धरतें तें कोण व ध्यानीं आठवतें तें कोण या दोहोंत (ध्याता व ध्येय यांत) अनन्यता (एकपण) पाहिजे. अनन्यता (एकरूपता) मूळचीच आहे. साधक शोधून पाहत नाहीं म्हणून संभ्रमांत पडतो, ज्ञानी विवरून (एकरूपता ओळखून) समाधान पावतो (३८–३९). हीं अनुभवाचीं कामें आहेत, त्यावीण

प्रत्ययेंविण बाधिजे भ्रमें। लोकदंडकसंभ्रमें। चालती प्राणी ॥ ४० ॥ दंडकध्यानाचें लक्षण। धरून बैसलें अवलक्षण। प्रमाण आणि अप्रमाण। बाजारी नेणती ॥ ४१ ॥ मिथ्या समाचार उठविती। वाउग्याच बोंबा घालिती। मनास आणितां अंतीं। अवघेंचि मिथ्या ॥ ४२ ॥ कोणीयेक ध्यानस्थ बैसला। कोणीयेक सिकवी त्याला। मुकुट काढूनि माळ घाला। म्हणिजे बरें ॥ ४३ ॥ मनाचेथें काय दुष्काळ। जे आंखुड कल्पिली माळ। सांगते ऐकते केवळ। मूर्ख जाणावे ॥ ४४ ॥ प्रत्यक्ष कष्ट करावे न लगती। दोरे फुलें गुंफावीं न लगती। कल्पनेची माळ थिटी। कायनिमित्य ॥ ४५ ॥ बुद्धीविण प्राणी सकळ। ते अवघेचि बाष्कळ। तया मूर्खांसीं खळखळ। कोणें करावी ॥ ४६ ॥ जेणें जैसा परमार्थ केला। तैसाच पृथ्वीवरी दंडक चालिला। साता पांचाचा बळावला। साभिमान ॥ ४७ ॥ प्रत्ययेंविण साभिमान। रोगी मारिले झांकून। तेथें अवघाचि अनुमान। ज्ञान कैचें ॥ ४८ ॥ सर्व साभिमान सांडावा। प्रत्ययें विवेक मांडावा। मायापूर्वपक्ष खंडावा। विवेकबळें ॥ ४९ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अखंडध्याननिरूपणनाम समास अष्टम ॥ ८ ॥

॥ श्रीराम ॥ पिंडाचें पाहिलें कौतुक। शोधिला आत्मानात्मविवेक। पिंड अनात्मा आत्मा येक। सकळ कर्ता ॥ १ ॥ आत्म्यास अनन्यता बोलिली। ते विवेकें प्रत्यया आली। आतां पाहिजे समजली। ब्रह्मांडरचना ॥ २ ॥ आत्मानात्मविवेक पिंडीं। सारासारविचार ब्रह्मांडीं। विवरविवरों हे

भ्रमाचा खेळ आहे. कोण पाहतो ? लोक गतानुगतिकत्वानें म्ह० लौकिक दंडकानें (रूढीनें) चालतात. दंडक ध्यानानें मन सदोषता पावतें, (व अखंड ध्यानानें समाधान पावतें). पण प्रमाण काय व अप्रमाण काय. हें बाजारी लोकांना काय ठाऊक ? खोट्या गप्पा उठवितात, उगाच धामधुम करितात, विवेकानें शोधूं गेल्यास सारें मिथ्या ठरतें. उदाहरण— कोणी एक ध्यानस्थ बसला व दुसरा त्यास शिकवितो कीं, ' अहो ! ध्येयमूर्तीच्या मस्तकावरील मुकूट काढून घ्या म्हणजे माळ गळ्यांत जाईल.' मनाच्या घरीं कल्पनांना काय तोटा ? आंखूड माळेची कल्पनाच कां केली ? तात्पर्य, अशा गोष्टी सांगणारे व ऐकणारे दोघेही मूर्खच समजा. कल्पनेची माळ मग ती तोकडी कां करावी ? तेथें कांहीं फुलें आणावीं लागत नाहींत, माळ गुंफावी लागत नाहीं, कांहींच कष्ट नाहींत. असो. बुद्धीवांचून प्राणी बाष्कळ होतात, त्या मूर्खांच्या नादीं लागूं नये. ज्यानें जितका परमार्थ केला तितक्याचा एक संप्रदाय रूढ होऊन दहा पांच अनुयायी मिळून तो रूढ होतो. प्रत्यय नसून अभिमानानें उपदेश देत सुटणें म्हणजे रोगी झांकून मारण्यासारखें आहे. त्यांत ज्ञान कोठलें ? सारा अभिमान सोडून विवेकानें प्रत्यय घ्यावा. मायेचा पूर्वपक्ष—त्याचें खंडन करून आत्मा सिद्धांत स्वीकारावा (४०–४९). [द० १४, स० ८]

आत्मानात्मविवेक पिंडीं व सारासार विचार ब्रह्मांडीं नित्य करीत असावें. पिंड अनात्मा व सकळकर्ता एक आत्मा असा आत्मानात्मविवेक करून त्याचा प्रत्यय पाहावा. आतां सारासारविवेक कसा करावा तें पहा. असार

गोडी। घेतली पाहिजे ॥ ३ ॥ पिंड कार्य ब्रह्मांड कारण। याचें करावें विवरण। हेंचि पुढें निरूपण। बोलिलें असे ॥ ४ ॥ असार म्हणिजे नासिवंत। सार म्हणिजे तें शाश्वत। जयास होईल कल्पांत। तें सार नव्हे ॥ ५ ॥ पृथ्वी जळापासून जाली। पुढें ते जळीं मिळाली। जळाची उत्पत्ति वाढली। तेजापासूनी ॥ ६ ॥ तें जळ तेजें शोषिलें। महत्तेजें आटोन गेलें। पुढें तेजचि उरलें। सावकाश ॥ ७ ॥ तेज जालें वायोपासुनी। वायो झडपी तया लागुनी। तेज जाउनी दाटणी। वायोचीच जाली ॥ ८ ॥ वायो गगनापासूनि जाला। मागुतां तेथेंचि विराला। ऐसा हा कल्पांत बोलिला। वेदांतशास्त्रीं ॥ ९ ॥ गुणमाया मूळमाया। परब्रह्मीं पावती लया। तें परब्रह्म विवराया। विवेक पाहिजे ॥ १० ॥ सर्व उपाधीचा सेवट। तेथें नाहीं दृश्य खटपट। निर्गुण ब्रह्म घनदाट। सकळां ठाईं ॥ ११ ॥ उदंड कल्पांत जाला। तरी नाश नाहीं तयाला। मायात्यागें शाश्वताला। वोळखावें ॥ १२ ॥ देव अंतरात्मा सगुण। सगुणें पाविजे निर्गुण। निर्गुणज्ञानें विज्ञान। होत असे ॥ १३ ॥ कल्पनेतीत जें निर्मळ। तेथें नाहीं मायामळ। मिथ्यत्वें दृश्य सकळ। होत जातें ॥ १४ ॥ जें होतें आणी सर्वेचि जातें। तें तें प्रत्ययास येतें। जेथें होणें जाणें नाहीं तें। विवेकें ओळखावें ॥ १५ ॥ येक ज्ञान येक अज्ञान। येक जाणावें विपरीत ज्ञान। हे त्रिपुटी होय क्षीण। तेंचि विज्ञान ॥ १६ ॥ वेदांत सिद्धांत धादांत। याची पाहावी प्रचीत। निर्विकार सदोदित।

म्ह० नाशवंत, ज्याला कल्पांत आहे तें, पंचभूतात्मक ब्रह्मांड व पिंडही – कारण ब्रह्मांडकारणापासून पिंड हें कार्य होतें – याला नाश आहे, कल्पांत आहे. सार म्ह० ज्याला नाश नाहीं तें, शाश्वत (१–५). पृथ्वी जळापासून होते व शेवटीं जळांतच विरून जाते, जळ तेजापासून होतें व पुन्हां तेजांतच आटून जातें, तेज वायूपासून होतें व वायूकडूनच झडपलें जातें, वायु आकाशापासून होतो व त्यांतच विरतो. याप्रमाणें भूतें ज्या ज्यापासून उत्पन्न होतात, त्या त्यी तत्त्वांतच लय पावतात. शेवटीं गुणमाया व मूळमाया सुद्धां परब्रह्मीं लय पावतात. याला वेदांत-शास्त्रांत कल्पांत म्हणतात. (मूळमायेचा – कल्पनेचा जेथें अंत होतो तो कल्पांत). मूळमायेच्या सगट सर्व उपाधींचा जेथें अंत होतो, जेथें दृश्याची खटपट नाहीं तें सर्वव्यापी त्रिगुण ब्रह्म सार म्ह० शाश्वत होय. निर्गुण ब्रह्मावेगळें मूळमायेसगट सर्व असार होय. याचें नांव सारासार विचार. मायेला कल्पांत आहे. तिचा विवेकानें त्याग करून शाश्वत ओळखावें (६–१२). अंतरात्मा देव सगुण, त्या गुणाच्या द्वारें निर्गुणाला पावावें, व निर्गुणज्ञानानें ज्ञानाचें विज्ञान (अपरोक्षानुभव) होतें. निर्गुण निर्मळ ब्रह्म तेथें कल्पना माया नाहीं, तेथें दृश्य होतें व जातें ही वार्ताही नाहीं. होतें आणि जातें तें दृश्य नाशवंत, होणें जाणें नाहीं तें ब्रह्म. ज्ञान, अज्ञान, विपरीत ज्ञान हीं तीनही जाऊन विज्ञान झालें पाहिजे. विपरीत ज्ञान म्ह० एकाचें एक देखणें, अज्ञान म्ह० नेणणें, ज्ञान म्ह० जाणणें. आत्मा नेणणें हें अज्ञान, आत्मा जाणणें हें ज्ञान व पंचभूतात्मक पसारा हें ज्ञान नव्हे व अज्ञान नव्हे, तर विपरीत ज्ञान. कां कीं तेथें आहे एक व दिसतें भलतेंच. म्हणून तिन्ही वृत्ति समान करून निवृत्तिरूपानें विज्ञान व्हावें. (हें पुन्हां द० २० स० १ मध्यें सांगितलें आहे. ओंवी २१ ते ३० पहा.) वृत्तिशून्यता हें विज्ञान वेदांत (शास्त्रप्रचीति), सिद्धांत (गुरुप्रचीति) व धादांत (आत्मप्रचीति) या तिहींचा अनुभव पहावा – तो हा कीं

जेथें तेथें ॥ १७ ॥ तें ज्ञानदृष्टीनें पाहावें। पाहोन अनन्य राहावें। मुख्य आत्मनिवेदन जाणावें। याचें नांव ॥ १८ ॥ दृश्यास दिसे तें दृश्य। मनास भासे तो भास। दृश्यभासातीत अविनाश। परब्रह्म तें ॥ १९ ॥ पाहों जातां दुरीच्या दुरी। परब्रह्म सबाह्यअंतरीं। अंतचि नाहीं अनंत सरी। कोणास द्यावी ॥ २० ॥ चंचळ तें स्थिरावेना। निश्चळ तें कदापी चळेना। आभाळ येतें जातें गगना। चळण नाहीं ॥ २१ ॥ जें विकारें वाढे मोडे। तेथें शाश्वतता कैंची घडे। कल्पांत होतांच विघडे। सकळ कांहीं ॥ २२ ॥ जें अंतरींच भ्रमलें। मायासंभ्रमें संभ्रमलें। तयास हें कैसें उकले। अव्हाट चक्र ॥ २३ ॥ भिडेनें वेव्हार निवडेना। भिडेनें सिद्धांत कळेना। भिडेनें देव आकळेना। अंतर्यामीं ॥ २४ ॥ वैद्याची प्रचीत येईना। आणि भीडहि उलंघेना। तरी मग रोगी वांचेना। ऐसें जाणावें ॥ २५ ॥ जेणें राजा वोळखिला। तो राव म्हणेना भलत्याला। जेणें देव वोळखिला। तो देवरूपी ॥ २६ ॥ जयास माईकाची भीड। तें काय बोलेल द्वाड। विचार पाहातां उघड। सकळ कांहीं ॥ २७ ॥ भीड मायेऐलीकडे। परब्रह्म तें पैलीकडे। पैलीकडे ऐलीकडे। सदोदित ॥ २८ ॥ लटिक्याची भीड धरणें। भ्रमें भलतेंचि करणें। ऐसीं नव्हेत कीं लक्षणें। विवेकाचीं ॥ २९ ॥ खोटें आवघेंचि सांडावें। खरें प्रत्ययें वोळखावें। मायात्यागें समजावें। परब्रह्म ॥ ३० ॥ ते मायेचें जें लक्षण। तेंचि पुढें निरूपण। सुचितपणें विवरण। केलें पाहिजे ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे शाश्वतनिरूपणनाम समास नवम ॥ ९ ॥

निर्विकार ब्रह्म सर्वत्र संचलें आहे. तें ज्ञानचक्षूनें पाहून त्याच्याशीं अनन्य राहावें — याचें नांव आत्मनिवेदन. दृश्यास दृश्य दिसतें, मनास भास भासतो. दृश्य आणि भास यांहून वेगळें तें परब्रह्म. तें पाहूं जावें तर जितकें दूर जावें त्यापेक्षां तें दूरच आहे, पण सर्वांच्या आंत बाहेर तेंच आहे, त्याला अंत नाहीं. त्या अनंताची बरोबरी कोणीं करावी ? चंचल तें स्थिर होत नाहीं (जसी माया) व निश्चळ तें चळत नाहीं (जसें ब्रह्म). चंचल आभाळ येतें जातें पण गगन निश्चळ आहे. जें विकारानें वाढतें तें मोडतें, तेथें शाश्वतता कसची ? सर्व कांहीं वाढणारें मोडणारें कल्पांतीं नाहींसें होतें (१३–२२). जें अंतरीं भ्रमलें व मायाजाळीं गुंडाळलें त्यांना हें अफाट किंवा उलटसुलट फिरणारें (अव्हाट) चक्र उकलावें कसें ? भिडेनें व्यवहार होत नाहीं, सिद्धांत कळत नाहीं, अंतर्यामींचा देव आकळत नाहीं. वैद्याची प्रचीति येत नाहीं, व भीडही मोडवत नाहीं, तर मग रोगी खास मरतो असें समजावें. ज्यानें राजा ओळखला तो भलत्याला राजा म्हणणार नाहीं, ज्यानें देव ओळखला तो देवच झाला. ज्याला मायिकांची भीड सुटत नाहीं तो मूर्ख खरें काय बोलणार तें दिसतच आहे. भीड मायेच्या अलीकडची व ब्रह्म मायेपलीकडचें—तें अलीकडे व पलीकडेही आहे. लटक्याची भीड धरून भ्रमानें भलतेंच करणें हें कांहीं विवेकाचें काम नाहीं. खोटें (मायिक) सर्व सोडावें, सत्य, (ब्रह्म) प्रत्ययानें समजावें. मायात्यागानेंच ब्रह्म समजतें. ती माया कितपत खरी आहे तें पाहूं (२३–३१). [द० १४, स० ९]